

# संवादिनी

२००३

00
2003

ग्रंथमोजणी
2004-05: 29/214
2006-07: 20/218
2007-08: 12/128
2008-10
2010-11: 10/211
2011-12
2012-13
2013-14
2014-15
2015-16
2016-17
23 JAN 2007

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
**मराठी साहित्य पुरस्कार योजनेसाठी**
चित्रकार षांताराम पवार यांनी
तयार केलेले बोधचिन्ह

जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी
महाराष्ट्राच्या मातीला, मराठी मायबोलीला
जो विसरला नाही, त्या मराठी माणसाच्या
'मम'त्वाचे हे सुचिन्ह!

**संवादिनी २००३ ची मुखपृष्ठ संकल्पना**
मराठी सारस्वताच्या अस्मितेचा
दहावा 'संवादिनी' सन्मानसोहळा

7351
28.12.03

ग्रंथमोजणी
२००३-४: २८.३.४
२००४-५: १४.२.६

**संपादक**
दिगंबर पाध्ये

**संपादन साहाय्य**
अरुणा दुभाषी

**छायाचित्रे**
विठोबा पांचाळ

**मुखपृष्ठ/मांडणी**
षांताराम पवार

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई, ४०००२५

**प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई, ४०००६२



७२५१

**केशव गोरे स्मारक ट्रस्ट**
*आयोजित*
महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
मराठी साहित्य
पुरस्कार प्रदान समारंभ

**अध्यक्ष**
प्रा. रा. ग. जाधव

**प्रमुख पाहुणे**
कमलेश्वर

**सुत्रसंचालन**
अशोक नायगावकर

शनिवार
दिनांक २७ डिसेंबर २००३
सायंकाळी ६ वाजता
एकवीरा विद्यालय, चारकोप
कांदिवली (प.)
मुंबई ४०० ०६७

## समारंभाचे प्रमुख पाहुणे

# कमलेश्वर

कमलेश्वर (कमलेश्वर प्रसाद सक्सेना) यांचा जन्म ६ जानेवारी १९३२चा. म्हणजे आता जवळपास वय वर्षे बहात्तर. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांची पहिली कथा 'कामरेड' प्रसिद्ध झाली आणि तेव्हापासून आजवरच्या पंचावन्न वर्षांच्या आयुष्यात शंभराहून अधिक ग्रंथ, विविध नियतकालिकांचे संपादन, जवळपास शंभराहून अधिक चित्रपटांच्या कथा आणि संवाद-लेखनातला सहभाग, वर्तमानपत्रांचे संपादन आणि आकाशवाणी व दूरदर्शनच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांतून श्रोत्यांशी आणि प्रेक्षकांशी संवाद असा विपुल आणि कसदार निर्मितिशील लेखनाचा विशाल पट त्यांनी उभा केला आहे. मराठी वाचकांना ते त्यांच्या कथा-कादंबऱ्यांच्या अनेक अनुवादांतून परिचित आहेत. अगदी आत्ता आत्ता त्यांच्या 'कितने पाकिस्तान' या कादंबरीचा मराठीत अनुवाद झाला आहे.



एका साधारण मध्यमवर्गीय घरातला जन्म. साहजिकच त्यांच्यासमोर दैनंदिन जगण्याचे प्रश्न शिक्षणाच्या काळात आणि शिक्षण संपताच उभे होते. ग्रंथांचे आणि अंकांचे मुद्रितशोधन, कागदांच्या डब्यांवर चित्रकारी, शिकवण्या, पुस्तकांचे विक्री-वितरण आणि सर्वांत विलक्षण म्हणजे ब्रुक बाँड चहाच्या कोठारावर रात्रपाळीची चौकीदारी अशा विविध श्रमांतून त्यांनी हा संघर्ष केला. हा सगळा गाळलेला घाम त्यांनी आपल्या सृजनशील लेखनासाठीची पूर्वतयारी म्हणून उपयोगात आणला.

त्यांचे लेखन आरंभापासून आजवर नेहमीच सामाजिक बांधिलकी स्वीकारत झाले आहे. ते आपल्या आयुष्याविषयी बोलताना फक्त स्वत:चे जन्मापासून आजवरचे आयुष्य मोजत नाहीत, तर भारतीय उपखंडाच्या पाच हजार वर्षांच्या सांस्कृतिक उभारणीचे, भाषा आणि कलांच्या दीर्घकालीन विकासाचे आणि सतत गतिशील असणाऱ्या आपल्या समाजाचे योगदानही आपल्या आयुष्याशी जोडून घेतात.

या प्रदीर्घ कालखंडातून अव्याहत पुढे सरकणारी या उपखंडाची सांस्कृतिक परंपरा हा आपणासाठी फार महत्त्वाचा ठेवा आहे. हा ठेवा आपण आपल्या आजच्या वास्तवाचे वाचन करताना सतत आधारासाठी ठेवणे फार गरजेचे आहे. त्यांचे आजवरचे सर्वच लेखन सर्वसाधारण माणसांची सुखदु:खे, त्यांच्या इच्छा आणि इच्छांचा होणारा विच्छेद, आयुष्यातली अभावग्रस्तता आणि त्यासाठीचा संघर्ष, त्याची हताशा आणि जिगीषा यांना त्यातल्या सगळ्या गुंतवळीसह कवेत घेणारे आहे. शक्य असल्यास त्यांच्या विपुल लेखनातले किमान हे तरी वाचावेच असे लेखन म्हणजे 'मांस का दरिया', 'राजा निरबंसिया', 'चर्चित कहानियाँ' हे कथासंग्रह'; 'एक सड़क सत्तावन गलियाँ', 'समुद्र में खोया हुआ आदमी', 'काली आँधी' आणि 'कितने पाकिस्तान' या कादंबऱ्या; शिवाय 'गर्दिश के दिन', 'मेरा पन्ना : समांतर सोच' आणि आत्मचरित्रात्मक लेखनाची तीन पुस्तके — 'जो मैंने जिया', 'यादों के चिराग', 'जलती हुई नदी'.

जवळपास १९६५ पासून वीसएक वर्षे त्यांचा निवास मुंबईतच होता. 'सारिका' या हिंदी नियतकालिकाचे संपादन, चित्रपटसृष्टीशी संबंधित काम आणि दूरदर्शनच्या आरंभकाळातील 'परिक्रमा' या विलक्षण लोकप्रिय मालिकेचा तो काळ होता. आजच्यासारखी दूरदर्शन वाहिन्यांची चंगळ नसणारा कृष्णधवल प्रसारणाचा तो काळ. त्या काळातली त्यांची दूरदर्शनवरची कामगिरी आजही आठवते. समाजाच्या तळागाळांतल्या माणसांना त्यांनी बोलते केले. प्रेक्षकांसमोर सतत नवे आणि अनोळखी जग उलगडत नेले. समाजाच्या या थराचा परिचय तोवर तरी त्यांच्याइतक्या सहृदयतेने प्रेक्षकांसमोर आला नव्हता. 'परिक्रमा' या त्यांच्या दूरदर्शनवरल्या कार्यक्रमाला 'युनेस्को'ने जगातल्या दहा कार्यक्रमांतला एक, असा सन्मान दिला होता.



सत्तरचे दशक हे सगळ्याच अंगांनी एक महत्त्वाचे दशक आहे. कमलेश्वर फक्त लिहीत आणि बोलतच नव्हते तर सगळ्या सांस्कृतिक-सामाजिक आंदोलनात पूर्ण जीव ओतून वावरत होते. विशेषत: 'सारिका'च्या संपादनाचा उपयोग करीत त्यांनी त्या काळात नव्याने लिहिणाऱ्या भारतभरच्या लेखकांना संघटित करण्यात मोठा वाटा उचलला. 'समांतर साहित्य'च्या अवतीभवती हे सगळे लिहिणारे आणि विविध संघर्षांत सहभागी असणारे तरुण लेखक एकत्र आले. 'समांतर'ची संमेलने कच्छच्या रणापासून राजगीरच्या दलितांपर्यंत, छिंदवाड्याच्या कोळसाखाणीपासून मुंबईच्या महानगरापर्यंत अशी तरुण लेखकांना जोडत गेली. दिवसभराच्या अथक कामानंतर रात्री दोन-दोन वाजेपर्यंत चर्चा, ठराव आणि पुन्हा स्वत:चे लेखन, असा सगळा भार पेलून नेणाऱ्या त्या काळातल्या कमलेश्वर यांना पाहणे विलक्षण सुंदर होते.

मराठी साहित्य तर त्यांचे अधिकच ऋणी आहे. दलित साहित्याला मराठीतून हिंदीत आणि नंतर हिंदीतून भारतातल्या आणि विदेशातल्या अनेक भाषांत पोहोचवायचे महत्त्वाचे काम त्यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'सारिका'चे आहे. पुढे जाऊन दलित साहित्याचा नवा हुंकार मराठीसारखाच तीव्र उन्मेषाने अनेक भारतीय भाषांतून पाहता आला. बाबुराव बागूल, प्र. श्री. नेरुरकर, नारायण सुर्वे या त्या काळातल्या ज्येष्ठांपासून दया पवार, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, प्र. ई. सोनकांबळे, केशव मेश्राम, नामदेव ढसाळ अशा अनेकांना त्यांनी भारतीय साहित्याच्या विशाल पटावर उभे केले.

अगदी आत्ता आत्ता गेल्या वर्षी ११ एप्रिलला हैदराबादला प्रगतिशील लेखक संघाच्या अधिवेशनासमोर बोलताना पुन्हा आपला सूर आजच्या भीषण समाजवास्तवावर रोखत त्यांनी लेखकांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली. त्यांचे ते भाषण मराठी वर्तमानपत्रांतून अनुवादरूपाने आले आहे.

कमलेश्वर यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा आलेख खूपच मोठा आहे. त्यात कथा, कादंबऱ्या, नाटक, प्रवासवृत्त, निबंध आणि आत्मचरित्रात्मक लेखन अशा विविध गद्याचा समावेश आहे. त्यांच्या कथांवर आधारलेले 'आँधी', 'मौसम', 'डाक बंगला', 'बदनाम बस्ती' असे अनेक चित्रपट आपल्या परिचयाचे आहेत. आरंभापासून निरंतर केलेले विविध नियतकालिकांचे, साप्ताहिकांचे संपादन आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरचे अजोड कार्यक्रम आहेत. ते आजही थांबलेले नाहीत. दिल्लीत असले तरी आपल्या या मुंबई महानगराशी त्यांचे संबंध आजही जिवंत विजेच्या तारेसारखे गुंतून आहेत.

# संवादिनी २००३

**दिगंबर पाध्ये**

महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कारांचे हे दहावे वर्ष आहे. १९९४चे पुरस्कार मे १९९५ मध्ये जाहीर झाले होते. तेव्हापासून आजपर्यंत या पुरस्कारांचे मराठी साहित्यक्षेत्रात जे स्वागत झाले ते पाहता आजच्या मराठी साहित्याभिरुचीला योग्य वाटेल असेच हे कार्य झाले आहे, असे म्हणावेसे वाटते.

१९९४ साली ही पुरस्कार योजना जाहीर झाली तेव्ही मराठी साहित्यक्षेत्रात पुरस्कारांचे नावीन्य नव्हते. तेथे अनेक साहित्य पुरस्कार आधीच प्रतिष्ठित झाले होते. अशा परिस्थितीत मराठी साहित्य पुरस्कारांत आणखी एक भर एवढेच न राहता 'महाराष्ट्र फाउण्डेशन पुरस्कारां'नी मराठी साहित्यक्षेत्रात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. ललित व वैचारिक साहित्य, प्रकाशक, नियतकालिके यांसाठी पुरस्कार व सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या वाटणाऱ्या कामांसाठी शिष्यवृत्त्या व अनुदाने यांची योजना करून साहित्याशी संबंधित व्यापक क्षेत्र सामावून घेण्याचे औचित्य व्यक्त केल्याने 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' ही एक वैशिष्ट्यपूर्ण योजना ठरली. आपले हे वैशिष्ट्य या पुरस्कारांनी सातत्याने कायम ठेवले आणि म्हणूनच प्रत्येक वर्षी मराठी साहित्यक्षेत्रात या पुरस्कारांचे उत्तम स्वागत झाले, ही गोष्ट निश्चितच समाधान देणारी आहे.

मराठी साहित्यक्षेत्रात आज अनेक पुरस्कार प्रतिष्ठित असले तरी ते प्रामुख्याने ललित साहित्यासाठी आहेत. सर्जनशीलतेचा असा सन्मान होणे हे उचित मानले तरी साहित्य म्हणजे केवळ ललित साहित्य नव्हे. सांस्कृतिकदृष्ट्या कथा, कादंबरी, कविता, नाटक अशा सर्जनशील साहित्याबरोबर वैचारिक साहित्याचे महत्त्व ध्यानात घेणे केव्हाही महत्त्वाचे असते. हे लक्षात घेऊन सुरुवातीपासून ललित साहित्याच्या बरोबरीने वैचारिक साहित्याला योग्य ते स्थान देण्याची दृष्टी या पुरस्कार योजनेत ठेवण्यात आली आहे. म्हणूनच सुरुवातीची पाच वर्षे या पुरस्कार योजनेत दोन गौरव पुरस्कार ठेवण्यात आले होते; एक ललित साहित्याच्या क्षेत्रातील आयुष्यभराच्या कार्यासाठी व दुसरा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रातील कार्यासाठी. पुरस्कार योजनेतील या तरतुदीमुळेच मे. पुं. रेगे, य. दि. फडके, डॉ. वि. भि. कोलते, श्री. वसंत पळशीकर व डॉ. रा. भा. पाटणकर यासारख्या वैचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवर व्यक्तींचा गौरव करण्याची संधी आम्हाला मिळाली. या मान्यवरांचे सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य पाहता ही गोष्ट योग्य होती यात शंका नाही. सहाव्या वर्षापासून या पुरस्कार योजनेत एकच गौरव पुरस्कार दिला जात असला तरी हे पुरस्कार देताना ललित साहित्य व वैचारिकता या दोहोंचेही भान ठेवून ते दिले गेले आहेत हे जाणकारांना जाणवल्यावाचून राहणार नाही. पु. ल. देशपांडे, रा. चिं. ढेरे, भालचंद्र नेमाडे, ग. प्र. प्रधान आणि या वर्षीच्या गौरव पुरस्काराचे मानकरी श्री. मारुती चितमपल्ली ही नावे येथे लक्षात घेण्याजोगी आहेत.

मराठी कथा, कविता, नाटक, कादंबरी या क्षेत्रांना समृद्ध करणाऱ्या महान साहित्यिकांबरोबरच तत्त्वज्ञान, इतिहास, संशोधन प्राचीन साहित्य संशोधन, सौंदर्यशास्त्र येथपासून लोकसाहित्य व अरण्यविद्येपर्यंत विविध क्षेत्रांत आयुष्यभर निष्ठेने कार्य करून मराठी सांस्कृतिक क्षेत्र ज्यांनी श्रीमंत केले त्यांच्याविषयीची कृतज्ञताच या गौरव पुरस्कारांमधून व्यक्त झाली. वैचारिकतेला स्थान देऊन मराठी सांस्कृतिक क्षेत्राला स्पर्श करण्यामध्ये या पुरस्कारांचे एक वैशिष्ट्य जाणवण्यासारखे आहे.

या पुरस्कार योजनेत साहित्याशी संबंधित व्यापक क्षेत्र सामावून घेत असताना ही पुरस्कार योजना साचेबंद व बंदिस्त राहिली नाही. आपल्या पुरस्कारांमध्ये तोच तोपणा येऊ नये, त्यातील गुणवत्तेचे भान कायम राहावे, साहित्याशी संबंधित नवी नवी क्षेत्रे या योजनेत सामावली जावीत या दृष्टीने या योजनेत वेळोवेळी केलेले बदलही पाहण्यासारखे आहेत. पाच वर्षांनंतर प्रकाशन पुरस्कार दिले नाहीत. पहिल्या दोन वर्षांत प्रत्येक वर्षी तीन तीन नियतकालिकांना पुरस्कार दिल्यानंतर तिसऱ्या वर्षी एक नियतकालिक कमी करून तेथे 'विशेष पुरस्काराची' योजना करण्यात आली. या पुरस्कारामुळे बाल साहित्य, भाषांतर, विज्ञान प्रसार, मराठी भाषा-समीक्षा व संशोधन, लोकसाहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य अशा साहित्याच्या विविध क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची संधी आम्हाला उपलब्ध झाली. साहित्यक्षेत्रातील पुरस्कार योजनेत सहसा समाविष्ट न होणाऱ्या व उपेक्षि
राहणाऱ्या क्षेत्रांचा पुरस्कार योजनेतील समावेश
'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार' योजने
आणखी एक वैशिष्ट्य राहिले आहे.

साहित्यक्षेत्राशी संबंधित व्यापक क्षेत्र सामावून घेणाऱ
या पुरस्कार योजनेतील पुरस्कारांची निवड करणे सो
नाही याची सुरुवातीपासून जाणीव होती. म्हणून प्रथ
सर्व पुरस्कारांचे निकष निश्चित करून ते प्रसिद्ध करण्या
प्रथा या पुरस्कार योजनेने ठेवली आहे. असे निश्चि
निकष असणे हे या योजनेचे एक वैशिष्ट्यच आ
असे म्हणता येईल.

अशा निकषांच्या आधारे पुरस्कारांसाठी व्यक्ती, संस्थ
ग्रंथ यांची निवड करण्याचे कार्यही दोन-चार व्यक्तीं
न सोपविता गौरव पुरस्कार, विशेष पुरस्कार व ग्रं
पुरस्कार यासाठी मराठी साहित्यक्षेत्राशी संबंधित २०
२५० व्यक्तींकडून शिफारशी मागविण्याची पद्ध
येथे सुरुवातीपासून अवलंबिली गेली आहे.
शिफारशींमधून निवड निश्चित करण्यासाठी नियु
केलेल्या समितीत साहित्याविषयी उदार आस्था
साहित्यक्षेत्राशी व्यापक संबंध असणाऱ्या व्यक्त
असाव्यात अशी काळजीही सुरुवातीपासून घेत




आहे. गेल्या दहा वर्षांत जाहीर झालेल्या 'महा
फाउण्डेशन साहित्य पुरस्कारां'त निवड समिती
आस्थेचे प्रतिबिंब उमटले आहे असे म्हटले त
वावगे ठरू नये. 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी सा
पुरस्कारां'ची ही कार्यपद्धती व व्यापक निवड स
हेही या पुरस्कार योजनेचे वैशिष्ट्य आहे.

याशिवाय वेळोवेळी सामाजिक-सांस्कृतिकदृ
महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी अनुदाने देण्याची या योजने
तरतूद पाहिली तर ही योजना म्हणजे मराठी भा
साहित्य यांच्याविषयीच्या आस्थेतून निर्माण झा
व्यापक उपक्रम आहे, हे लक्षात आल्यावाचून राहत
अशा वैशिष्ट्यपूर्णतेमुळेच गेल्या दहा वर्षांत म
साहित्यक्षेत्रात या पुरस्कारांचे सतत स्वागत झाले
म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

या वर्षाच्या 'संवादिनी'त गेल्या दहा वर्षांतील
पुरस्कारांची माहिती छायाचित्रांसह दिली आहे
छायाचित्रे एकत्र पाहत असताना आजच्या म
साहित्यक्षेत्राचे कालोचित दर्शन घडल्यासारखे व
हेच या पुरस्कारांचे खरे महत्त्व व वैशिष्ट्य अ
आमच्या या प्रयत्नात सुरुवातीपासून ज्यांनी मना
सहकार्य केले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहो

7351



महाराष्ट्र फाउण्डेशन
गौरव पुरस्कार
**मारुती चितमपल्ली**



विशेष पुरस्कार
**रा. र. बोराडे**



विशेष पुरस्कार
**भास्कर चंदनशिव**

महाराष्ट्र फाउंडेशन (USA) मराठी साहित्य पुरस्कार योजना २००३चे मानकरी

६
















ग्रंथ
**वकिल्या पारधी**
लक्ष्मण गायकवाड
**जीवनायन**
यशवंत मनोहर
**येरवडा विद्यापीठातील दिवस**
डॉ. कुमार सप्तर्षी
**राहीच्या स्वप्नांचा उलगडा**
भारत सासणे
**साहित्य प्रत्यय**
भास्कर भोळे

रा. शं. दातार नाट्यपुरस्कार
**ढोलताशे**
चं. प्र. देशपांडे

# मारुती चितमपल्ली

## मराठी साहित्यात निसर्गचित्रणाची हिरवी वाट निर्माण करणारे

मराठी साहित्यात निसर्गाचे अनेकांगी चित्रण झाले आहे. असे चित्रण करणाऱ्या लेखकांत मारुती चितमपल्ली हे नाव अग्रक्रमाने घेतले पाहिजे. निसर्गालाही त्याचे असे स्वतंत्र व्यक्तित्व आहे, तो चैतन्यमय आहे, म्हणून केवळ भावदर्शनासाठी, पार्श्वभूमीसाठी अथवा प्रतीकात्मक चित्रणासाठी निसर्गाकडे वळण्यापेक्षा त्याच्या वैविध्यपूर्णतेचे, रूपवैभवाचे दर्शन घडवावे, त्याचा शोध घ्यावा या प्रेरणेतून चितमपल्ली यांनी लेखन केले आहे. निसर्गाविषयीचे हे व्यापक भान त्यांच्या निसर्गपर लेखनाला वाङ्मयीन निराळेपण मिळवून देते. निसर्ग हा भीतीचा, श्रद्धेचा, कौतुकाचा आणि सलगीचा विषय म्हणून साहित्यात येत होता. परंतु तो निसर्गनिरीक्षणाचा, अभ्यासाचा विषय म्हणूनही आला पाहिजे. परिणामद्रव्य म्हणून नव्हे तर मूलद्रव्य म्हणून आपण त्याचे साहित्यातील स्थान त्याला दिले पाहिजे, ही जाणीव चितमपल्ली यांच्या निसर्गलेखनामागे आहे. निसर्ग त्यांच्या साहित्यात नायक बनून येतो. त्यामुळे त्यांच्या लेखनाने निसर्गचित्रणाची एक 'हिरवी वाट' मराठी साहित्यात निर्माण झाली आहे.

दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र', श्रीनिवास कुलकर्णी यांच्या 'डोह' आणि व्यंकटेश माडगूळकरांच्या 'नागझिरा'ने निसर्गानुभवाच्या या नांगरल्याविण राहिलेल्या भूमीकडे लक्ष वेधलेले होते. या अलक्षित अनुभवसृष्टीची ओळख त्यांनी ललितरम्य स्वरूपात करून दिली होती. पुढे मारुती चितमपल्ली यांच्या रूपाने एक सच्चा 'सनदी-शेतकरी' या अनुभवविश्वाला मिळाला आणि निसर्गपर ललित लेखनाचे 'हिरवे जग' मराठी साहित्यात अनेकांगाने येऊ लागले. 'पक्षी जाय दिगंतरा', 'जंगलाचं देणं', 'रानवाटा', 'शब्दांचं धन', 'रातवा', 'मृगपक्षिशास्त्र', 'घरट्यापलीकडे', 'पाखरमाया', 'निसर्गवाचन', 'सुवर्णगरूड', 'आपल्या भारतातील साप', 'पक्षिकोश', 'आनंददायी बगळे', 'निळावंती', 'चकवाचांदण' यांसारख्या त्यांच्या साहित्यातून समृद्ध निसर्गानुभवांचे, निसर्गज्ञानाचे दर्शन घडते. या निसर्गलेखनाला प्रत्यक्ष अनुभवाचे, वनविद्येच्या अभ्यासवृत्तीचे, बहुश्रुततेचे, व्यासंगाचे आणि अभिजात रसिकतेचे वरदान लाभले आहे.

चितमपल्ली यांच्या लेखनात अनुभवाची अस्सलता आणि समृद्धता आहे. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांना दीर्घकाळ वनवास भोगायला मिळाला. हा वनवास म्हणजे आपणासाठी वरदान आहे असे मानून त्यांनी निसर्गाशी आंतरिक सख्य साधले; निसर्गसायुज्य अनुभवले. त्यामुळे त्यांचे निसर्गपर लेखन अनुभवसंपृक्ततेतून उमललेले आहे. आपल्या व्यवसायाचा सांधा त्यांनी वनविद्येच्या अभ्यासवृत्तीशी जोडून घेतला असल्याने त्यांचे लेखन नाविन्यपूर्ण आशय पुरवणारे आणि स्वभावत:च ललितसुंदर रूप धारण करणारे झाले आहे. वनसृष्टीच्या माहितगाराने आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे हे लेखन केलेले असल्याने आणि या लेखनाला विशुद्ध रसिकतेचा व अभ्यासाचा स्पर्श झाल्याने त्याचे वाङ्मय-मूल्य दुणावले आहे, यात शंका नाही.




सृष्टीचा साजशृंगार, बदलती ऋतुचित्रे,
वैविध्यपूर्ण वृक्षविश्व, विलोभनीय पक्षिजगत, प
पक्ष्यांचे शांततामय सहजीवन, त्यांच्यातील सत्तासंघ
अद्भुतरम्य अशी कीटकसृष्टी, गूढरम्य जलाशये अ
तेथे स्पंदन पावणारे जलीय जीवन, गूढगंभीर त
सर्जनशील अशी अरण्यशांतता, निसर्गाइतकीच निरा
आणि निसर्गनिर्भर जीवन जगणारी धरतीची लेक
त्यांची अरण्यविद्या, सृष्टीतील जनन-मरणाचे सोह
असा बहुपदरी निसर्ग त्यांच्या लेखनांतून उलगडत ज
या सर्वच अनुभवचित्रणातून चितमपल्ली यां
ललितलेखनातील निराळेपण अधोरेखित होते.

दुर्गा भागवतांनी आपल्या अवतीभवतीच्या निसर्गनाट्य
ऋतुचक्राचे दर्शन घडवले; व्यंकटेश माडगूळक
मराठी अनुभवविश्वाला जंगलाची वाट दाखवि
माणसाप्रमाणेच प्राणिविश्वाचे अनिवार आकर्षण त्य
प्रतिभेला होते. त्यामुळे प्रामुख्याने जंगलातील प्राण
वेधक चित्रे त्यांच्या साहित्यातून आली. चितमप
यांच्या लेखनाची पहिली प्रेरणा आहे निसर्ग. त्य
निसर्गवेड्या मनाला जंगलातील मातीची ओढ अ
आभाळाच्या स्पर्शाचे आकर्षण आहे. वारुळाप
आभाळापर्यंतचा कोणताही निसर्गविषय त्यांना
नाही. तो त्यांच्या ललितप्रतिभेला साद घालत रा
जलाशये, आकाश, छाया-प्रकाश अशा वि
निसर्गघटकांचे त्यांनी चित्रण केले आहे. त्यांनी सृ
विविध रहस्ये जाणून घेतली आणि त्यांना शब्द ि
त्यामुळे मराठी साहित्यसृष्टीला निसर्गानुभवाचे
नवे असे आभाळ मिळाले.

निसर्गाचे सर्वांगीण चित्रण करणे हा चितमपल्ली य
निसर्गलेखनाचा एक प्रकृतिविशेष आहे. निसर्गघट

7351

चित्रण करीत असताना त्यांची प्रतिभा त्या विशिष्ट निसर्गघटकापुरती मर्यादित राहत नाही. त्या निसर्गघटकाच्या निमित्ताने त्याच्या अवतीभवतीचा संपूर्ण निसर्ग ते चित्रित करतात. एखाद्या वृक्षाचे रूपचित्र रेखाटत असताना त्या वृक्षाला सोबत करणारे पशु-पक्षी, वन्यजीव यांचे चित्रण केल्याखेरीज त्यांचे वृक्षगान पूर्ण होत नाही. आकाशाचं सौंदर्य न्याहाळत असतानाही वृक्षवेलींवरचं त्यांचं लक्ष हटत नाही. त्याचा हा एक सुंदर नमुना पाहा, ''पानगळीच्या दिवसांत सारे वृक्ष पर्णहीन झालेले असत. फक्त त्यांच्या फांद्या, डहाळ्या यांची नक्षी आभाळाच्या पार्श्वभूमीवर कोरलेली दिसायची. क्षणात असा भास होई की, ग्रह-नक्षत्रांची पानंफुलं लेवून ही अलंकृत झालेली झाडं उभी आहेत. काळ्याशार डोहातील पाण्यात काठावरच्या झाडांचं देखणं, कंप पावणारं प्रतिबिंब पडलेलं असायचं.' (पाखरमाया, पृ. ७७). चितमपल्लींचा निसर्गानुभव असा एकात्म प्रत्यय देतो.



निसर्गातील विविधतेचे त्यांना आकर्षण असले तरीही त्यांच्या विशेष आस्थेचे, हृदयीच्या अंतर्हृदयीचे काही विषय आहेत. पक्षिवर्णन हा त्यांपैकीच एक. 'पक्षिवेडा माणूस' अशी त्यांची ख्याती आहे. हे पक्षिवेड त्यांच्या साहित्यातून प्रकर्षाने व्यक्त होताना दिसते. त्यांच्या ललित गद्याचे आभाळ पक्ष्यांच्या विहाराने, कलरवाने गजबजलेले आहे. पक्ष्यांचे रंगीबेरंगी विश्व मराठी साहित्यात कमालीच्या रसिकतेने आणले ते मारुती चितमपल्ली यांनीच. दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर यांनीही पक्ष्यांची चित्रणे वैशिष्ट्यपूर्ण रीतीने केली आहेत. श्रीनिवास कुलकर्णी यांनाही पक्ष्यांचे वेड आहे. त्यांनीही काही अंशी पक्षिजगत चित्रित केले आहे. पक्षिजगतातील उपेक्षितांचे अंतरंगही त्यांनी उलगडून दाखविले. हे अपवाद सोडले तर मराठी साहित्यातील पक्षिगान हे कोकीळ, दयाळ, कांचन, भारद्वाज, पोपट, कावळा, चिमणी असे मर्यादितच होते. चितमपल्लींनी आपल्या ललित गद्यातून पक्ष्यांचे हे क्षितिज विस्तारले. वनवास्तव्यात त्यांनी केलेली अगणित पक्ष्यांची निरीक्षणे, त्यांच्या घेतलेल्या नोंदी, पक्षिजगतातील रहस्ये जाणून घेण्याचा त्यांनी केलेला प्रयास आणि कलावंत मनाने केलेली पक्ष्यांची वर्णने, याचा मनोज्ञ संगम त्यांच्या ललितलेखनात झालेला आहे. पक्ष्यांचे रूपसौंदर्य, प्रणयाराधन, त्यांची वीण, जीवनचक्र, त्यांच्या सवयी, आहार-विहार, त्यांची घरटी, कुटुंबजीवन यांचे अत्यंत संवेदनशील मनाने परंतु अभ्यासपूर्ण दृष्टिकोणातून केलेले चित्रण त्यांच्या ललित लेखनात येते. पक्ष्यांचे अनुनयनृत्य, त्यांचे विविध भावस्वर नोंदवत ते पक्ष्यांची सर्वांगीण ओळख करून देतात.

पक्ष्यांप्रमाणेच वृक्षवर्णनात चितमपल्ली यांची ललित प्रतिभा रमते. जवळच्या मित्राचा परिचय करून द्यावा अशी आत्मीयता त्यांच्या वृक्षवर्णनात असते. वृक्षांविषयीच्या आठवणी, संदर्भांनी त्यांची वृक्षचित्रे जंगलातील झाडांप्रमाणे मुक्तपणे विस्तारत जातात. झाडाचे रूप, त्याचा आकार, त्याचे रंगवैभव, त्याचे फुलणे, फळणे, पानगळणे, त्याचे कूळ, त्याचा इतिहास, त्याची शास्त्रीय नावे, त्याची उपयुक्तता, त्याच्याविषयीच्या लोककथा, लोकसमज, साहित्यातून येणारे त्याचे संदर्भ हे सर्व या वृक्षचित्रणाच्या विस्तारकथेत येते. संपूर्ण वृक्षचरित्रच त्यातून साकारले जाते. चितमपल्लींच्याच शब्दांत सांगायचे झाले तर 'एखादा सुंदर चेहरा पाहावा आणि तो आयुष्यभर सहज लक्षात राहावा' तसे या वृक्षांबाबत घडते. जंगलातील एखाद्या डेरेदार वृक्षाच्या सावलीत बसून त्याच्याकडूनच हे वृक्षगान आपण ऐकत आहोत की काय असा भास व्हावा इतका जिवंतपणा, नेमकेपणा त्यांच्या वृक्षवर्णनात आढळतो. वृक्षा-वृक्षांतील प्रेमाचे, दुराव्याचे, नम्रतेचे, ताठरपणाचे, समाधानाचे, साफल्याचे असणारे नाते ते दाखवतात. वृक्षवृत्तीत त्यांना संतवृत्ती दिसते. चितमपल्ली असे वृक्षांच्या हिरव्या बोलीचा शब्द होतात.




दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर, श्रीनिवास कुलकर्णी, शरदिनी डहाणूकर यांनीही वृक्षवर्णने केली आहेत. परंतु चितमपल्लींनी वनातील वृक्षवैभव आणि वृक्षवैविध्य खऱ्या अर्थाने मराठी साहित्यात आणले. चितमपल्ली हेच मुळात एखाद्या वृक्षकोशासारखे आहेत, परंतु हा वृक्षकोश शास्त्रीय माहितीबरोबरच ललितरम्य शैलीत वृक्षदर्शन घडविणारा आहे, हे विशेष!

चितमपल्ली यांच्या निसर्गचित्रणात समग्रता असते. वृक्ष, पशू, पक्षी, जलाशये व अन्य निसर्गघटकांची चित्रणे करताना त्याच्या रूपसौंदर्याबरोबरच त्याच्या अंतरंगाचे दर्शनही ते घडवितात. उदाहरणार्थ, सागवान वृक्षाविषयी लिहिताना त्याला जवळपास येरागबाळ वृक्षाचे अस्तित्व कसे मानवत नाही, अंतर्बाह्य कठीण असणारा हा वृक्ष गंभीर स्वभावाचा कसा आहे, हे सांगत त्याची विविधांगाने ते ओळख करून देतात.

आपल्या प्रदीर्घ अशा वनजीवनात नानाविध स्वरूपाचे जे वन्यजीव चितमपल्ली यांनी पाहिले त्यांची त्यांनी निरीक्षणे केली; शोध घेतला आणि या विलक्षण जगाची ओळख त्यांनी ललित गद्यातून करून दिली. त्यात प्राणिसृष्टी आहे, अद्भुतरम्य कीटकसृष्टी आहे. नानाविध स्वरूपाची जीवसृष्टी आहे. अशा जीवांची ते तपशीलवार माहिती पुरवितात. ही माहिती प्रत्यक्ष अनुभवावर, निरीक्षणावर आधारलेली असते किंवा अरण्यपुत्रांकडून त्यांना ती मिळालेली असते. शास्त्रीय ग्रंथांच्या चौफेर अभ्यासातूनही त्यांनी ती मिळविलेली असते. त्यामुळे त्यांच्या निसर्गानुभवांना विश्वासार्हतेचे बळ लाभते.





त्यात कृत्रिमता, स्वप्नरंजन नसते तर एका वनविद्येच्या अभ्यासकामाचा सच्चा अनुभव असतो. अशा अनुभवांना त्यांच्या सूक्ष्म सौंदर्यदृष्टीचा, मानवी संदर्भांचा फुलपंखी स्पर्श होतो आणि ते निसर्गानुभव उजळून निघतात. उदाहरणार्थ, ''कांचन पक्षी त्या फुलातील मध प्राशन करताना पाहून फुलांच्या आरशात कांचन पक्ष्याचं प्रतिबिंब पडलं आहे, असा भास होई.'' (रानवाटा, पृ. १०३). अशी सौंदर्यवेडी रसिकता त्यातून डोकावते. मानवी संदर्भांनी युक्त अशी त्यांची लेखनकळाही या निसर्गानुभवांची रोचकता वाढवते. ''रातकिड्यांच्या वैवाहिक जीवनाचा हेवा वाटला. कारण त्यांच्या बायका मुक्या असतात.'' (रातवा पृ. ४४). ''पाखरांत भोजन म्हणजे एक सोहळा असतो, माणसांत ते उदरभरण असतं.'' (रातवा).




चितमपल्ली यांच्या सर्वच ललित लेखांच्या गुच्छातून त्यांच्या सूक्ष्म निसर्गावलोकनाचे अचंबा वाटावे असे दर्शन घडते. कीटकसृष्टीचे 'रातवा'मधील आणि 'पाखरमाया'मधील चित्रण यादृष्टीने विशेष लक्षणीय आहे. चतुराचे पाण्यात अंडी घालणे असो, समागमाची संधी न मिळालेल्या कोळ्याचे प्राण सोडणे असो, पक्ष्यांचे अंडी उबविणे असो, हे सर्व ते अपार जिज्ञासेने न्याहाळतात. रातकिड्यांची किरकीर ही मादीला साद घालण्यासाठी असते, अशा नोंदी ते करतात. चितमपल्लींच्या कुतूहलभरल्या नजरेतून काही सुटत नाही. जणू सृष्टीच सगळी निगूढता उलगडून दाखवते की काय असा प्रश्न पडावा असे त्यांचे सूक्ष्म निसर्गावलोकन आहे.

चितमपल्ली यांच्या प्रतिभेला सृष्टीची रहस्ये उलगडण्याचा ध्यास आहे. त्यातून त्यांच्या लेखनात गूढरम्यता आली आहे. अरण्ये, जलाशये यांच्या चित्रणातून; लोककथा, लोकसमज यांच्या कथनातून तसेच चितमपल्ली यांच्या चिंतनशीलतेतूनही ही गूढरम्यता डोकावते. जंगलातील शांततेने, प्रदीर्घ वास्तव्याने गूढतेचा संस्कार त्यांच्या व्यक्तित्वावर झाला असावा. ललित गद्यासारख्या आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकारातून तो व्यक्त झाला नसता तरच नवल. काही वेळा गूढतेची डूब मिळाल्याने त्यांचे निसर्गचित्रण अधिक गहिरे होते.

निसर्ग आणि लोकवाङ्मय यातील अनुबंधही चितमपल्ली दाखवितात. लोककथेत, लोकसमजातही एखादे निसर्गसत्य दडलेले असते, त्यात तथ्य असू शकते असे त्यांना वाटते. या त्यांच्या भूमिकेमुळे 'निंबोणीचं झाड करवंदी' (जंगलाचं देणं) या लेखात कडुनिंब व चिंचेच्या झाडासंबंधीची लोककथा येते. 'घरसागरावर' (पक्षी जाय दिगंतरा) या लेखाच्या प्रारंभी खंड्या पक्ष्याच्या संदर्भातील लोककथा येते. 'राष्ट्रीय पक्षी मोर' (निळावंती) या लेखात लांडोरीच्या गर्भधारणेविषयीची लोककथा येते. 'रातवा' या संग्रहात रातव्याविषयीची लोककथा येते. असा लोककथांचा खजिना ते आपल्या ललित गद्यातून उघडा करतात. लोकगीतातील संदर्भ देतात. निसर्गातील गूढतेचा शोध घेण्याचा प्रयत्न आदिम प्रतिभेनेही केला आहे. त्या आदिम प्रतिभेला वाट पुसत आपणालाही निसर्गातील गूढ रहस्ये उलगडता येतील, या जाणिवेमुळे चितमपल्लींना लोकवाङ्मयाचे आकर्षण वाटते. त्यामुळे ते त्यांच्या ललित साहित्यात येते.

अरण्यजीवनाचे अनुभवदर्शन घडविण्यासाठी चितमपल्ली यांनी ललितगद्याच्या लवचिक प्रसरणशीलतेचा सुरेख उपयोग करून घेतला आहे. त्यांना केवळ लालित्याचे आकर्षण आहे असे नाही. त्यांना निसर्गानुभवांचे रेखन करायचे आहे. त्यामुळेच शास्त्रीय, अभ्यासपूर्ण संदर्भ देण्याची एकही संधी ते गमावत नाहीत. अभ्यास, विद्वत्ता आणि रसिकता यांचा मेळ त्यांच्या ललितलेखनात आढळतो. त्यांच्या निसर्गवेडाने त्यांना जसे 'अनुभवाचे धन' दिले त्याप्रमाणे त्यांच्या वाचनाने त्यांना 'शब्दांचे धन' मिळाले आहे. त्यामुळे त्यांचे लेखन जसे अनुभवसंपृक्त आहे तसे ते अभ्याससंपृक्तही आहे. वेद, रामाय
महाभारत, सातवाहनाची गाथा सप्तशती, हंसदेवमु
पोथी, संस्कृत नाटके यांच्याप्रमाणेच कालिद
वराहमिहिर, जयदेव, बाणभट्ट, ज्ञानदेव, तुका
उमरखय्याम, बालकवी, दुर्गा भागवत, पु. शि.
इंदिरा संत, ग्रेस, इमर्सन, थोरो, शेल्लर, जेन गुड
केनेथ अँडरसन यांच्या साहित्यातील तसेच तमि
तेलगू, बंगाली, संस्कृत, इंग्रजी, चिनी, रशियन, ज
आणि आदिवासी बोलीतील अनेक संदर्भ त्यां
लेखनात येतात. निळावंतीच्या पोथीचा शोध घ्या
निघालेल्या नागार्जुनाप्रमाणे चितमपल्ली जेथे
निसर्गसंदर्भ येतात ते शोधण्याचा, मिळवण्याचा ध
घेतात. त्यातून अशी संदर्भबहुलता त्यां
ललितलेखनात येते. साहित्यातील निसर्गसंदभ
अभ्यासाने त्यांची रसिकता अधिक तल्लख बनली
साहित्यसंदर्भ आणि निसर्गानुभव यांचे सायुज्य त्य
लेखनात पाहायला मिळते.




पर्यावरणीय प्रबोधनाची जाणीवही चितमपल्ली यांच्या लेखनातून व्यक्त होते. निसर्गपूजेच्या संस्कृतीचा आपणाला विसर पडत चालला आहे. अविचाराने प्रचंड प्रमाणात वृक्षतोड होत आहे. आभाळ आणि पाताळदेखील रे
ॲक्टिव्हसारख्या प्राणघातक किरणांनी दूषित झ
आहे. सिंह हद्दपार होत आहेत. अशा पर्याव
प्रबोधनाच्या जाणिवा त्यांच्या ललित गद्यातून
होतात.

अरण्यजीवनातील तपशील पुरवण्यावर चितम
यांचा अधिक भर असतो. परिणामी त्यांचे काही
माहितीपर झाले आहेत तर काही लेख ललित लेख

प्रकारात व्यक्त झाले आहेत. कथा आणि ललित गद्य यांची परिघे एकमेकांत गुंफल्यासारखेही त्यांचे लेखन झाले आहे. प्रतिपाद्य विषयाबाबत वाटणारा जिव्हाळा, त्यातील अनुभवसंपन्नता, त्याला मिळालेली अभ्यासाची बैठक आणि हे सर्व अपरिचित विश्व लोकांसमोर यावे ही उत्कट प्रेरणा या गुणांमुळे ललित गद्याला अधिक लवचिक, प्रसरणशील आणि अधिक मुक्त करण्यात चितमपल्ली यांच्या निसर्गपर लेखनाने महत्त्वाचे योगदान दिले आहे, असे म्हणावे लागेल.

चितमपल्ली यांच्या ललित गद्याचा एक गुणविशेष असा की, अरण्यवाचनातून मिळालेले ज्ञान, किंवा वनविद्याविषयक शास्त्रीय माहिती अत्यंत लालित्यपूर्ण व रुचिर शैलीत त्यातून सांगितली जाते. शास्त्रीय ज्ञान ललितरूप धारण करून अवतरण्याचे अप्रूप त्यांच्या ललित गद्यात घडते. अरण्यजीवनावरील आपले संशोधन लोकांपर्यंत जावे म्हणून त्यांनी ललितलेखनाची वाट अनुसरली. संपूर्ण महाराष्ट्रात २५०-३०० पक्षिमित्र असतील. त्यांना शास्त्रीय माहिती उपयुक्त वाटेल. पण हीच माहिती ललित लेखनातून आली तर हजारो वाचक या वेगळ्या अशा साहित्याला मिळतील, अशा विश्वासामुळे त्यांनी ललित लेखन केले. त्यांच्या अशा लेखनाने वनाला जनात आणले. एक ललितलेखक म्हणूनच नव्हे तर एक वनाधिकारी म्हणूनही हे त्यांचे मोठे योगदान आहे. चितमपल्ली हे वनविद्येचे अभ्यासक आहेत की एक ललितलेखक आहेत हा प्रश्न त्यांच्या लेखनाने निरर्थक ठरविला. ज्ञानदेवांना ज्याप्रमाणे 'तत्त्वज्ञ कवी' म्हटले जाते त्याप्रमाणे चितमपल्लींनाही 'वनविद्येचा तत्त्वज्ञ ललित गद्यकार' असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

चितमपल्ली यांच्या ललितलेखनाची भाषा काव्यात्म आहे, तिच्यात अल्पाक्षररमणीयत्व आहे. संवादातील जिवंतपणा व्यक्त होण्यासाठी कधी ती आदिवासी बोलीलाही अवसर देते, तर संस्कृत भाषेच्या संस्कारामुळे ती काहीशी प्रौढ स्वरूपात व्यक्त होते. निसर्गानुभवाच्या आश्रयाने व्यक्त होते. उदाहरणार्थ, 'मोर शिंगारत राहिला आणि गोचा राजा झाला.' (निळावंती, पृ. ७९), 'मधुकाचा बहर




संपला आणि स्वैरिणीला सुतक आले' (जंगलाचं देणं, पृ. २७). त्यांची प्रतिमासृष्टी ही निसर्गानुभवातून बहरलेली आहे. दोन वेगवेगळ्या निसर्गघटकांतील साहचर्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमा हे चितमपल्लींच्या लेखनातील एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणावे लागेल. उदाहरणार्थ, 'पळसाची लाल नारिंगी फुलं पोपटाच्या चोचीसारखी दिसतात.' (जंगलाचं देणं, पृ. १९), 'शिरीष पुष्पासारखे कोमल हारित' (जंगलाचं देणं पृ. ४२), 'कलविंक पक्ष्यांच्या पंखाप्रमाणं उगवती धूसर होत होती.' (पक्षी जाय दिगंतरा, पृ. ५), 'शेवंतीची फुलं फुललेली पाहून त्याला आभाळातील सर्व तारे बागेतील शेवंतीवर उतरून आल्याचा भास होई.' (रानवाटा, पृ. ४) 'श्रीकतित्तिराच्या... शरीराच्या वरच्या भागाचा रंग केळीच्या फुलासारखा' (आनंददायी बगळे, पृ. ४५) आशय आणि अभिव्यक्तीत निसर्ग असा भरून उरला आहे.

मारुती चितमपल्ली यांनी मराठी साहित्याला आपल्या निसर्गलेखनाने असे अनुभवाचे एक वेगळे विश्व दाखवले. अनुभव आणि आविष्कार या दोन्हीही दृष्टीने त्यात नावीन्य आहे, ताजेपणा आहे. त्यांच्या ताज्या, टवटवीत, निसर्गदर्शनाने जीवनाकडे पाहण्याचा एक निकोप दृष्टिकोण मिळतो. 'पक्षिकोशा'ची निर्मिती करून तर मराठी जिज्ञासेवर त्यांनी फार मोठे उपकार केले आहेत. तेराव्या शतकातील हंसदेवमुनींच्या 'मृगपक्षिशास्त्रा'चा मराठी अनुवाद त्यांनी पं. नरसिंहशास्त्री भातखंडे यांच्या सहकार्याने करून अद्वितीय अशा या संस्कृत ग्रंथातील पशुपक्षिशास्त्राचे ज्ञान मराठी वाचकांसमोर आणले आहे. चितमपल्ली यांचे हे सर्व लेखन मराठी साहित्याला नवे आहे; एका नव्या घराण्याची नोंद




करणारे आहे. मराठी साहित्यात निसर्ग-साहित्याची पहाट झाली आहे, याची ग्वाही देणारे आहे. गेल्या दोन तपांपासून चितमपल्ली सातत्याने निसर्गलेखन करीत आहेत. निसर्गानुभवांना शब्द देणे ही त्यांची पहिली आणि एकमेव अशी प्रेरणा आहे, असे म्हटले तर ते अधिक सयुक्तिक ठरेल. अशी निसर्गनिष्ठा क्वचितच एखाद्या लेखकांत आढळेल. चितमपल्ली यांच्याकडे ती निसर्गदत्त स्वरूपात आहे. मराठी साहित्यात त्यामुळेच ते एक हिरवी वाट निर्माण करू शकले आहेत.

प्रा. सुहास पुजारी

### सृष्टीशी संवाद साधणारा

# वनमित्र

एकोणवीसशे सत्तावन ते पासष्ट या काळात मी नांदेडला पीपल्स कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो. त्याच दरम्यान श्री. चितमपल्ली हे त्याच जिल्ह्यातील इस्लापूर येथे वनाधिकारी होते. एकदा इस्लापूरजवळचा सहस्रकुंड नावाचा धबधबा पाहण्यासाठी आम्ही मित्र इस्लापूरला गेलो होतो. त्या वेळी चितमपल्लींची पहिली ओळख झाली; ती वनाधिकारी म्हणूनच झाली. खांडेकर शैलीतल्या काव्यात्मक रूपककथाही ते लिहीत असत, हे मागाहून कळले. मी नांदेड सोडून विदर्भात आल्यानंतर त्यांची फारशी हालहवाल कळली नाही. पण एके दिवशी अचानक त्यांचे कार्ड आले. इस्लापूरच्या रात्रीच्या गप्पाष्टकांमध्ये मी 'मृच्छकटिका'तील एक स्थळ विशद करून सांगितले होते. प्रियतमाच्या भेटीसाठी आभाळी वातावरणाची पर्वा न करता आपल्या उन्मादक यौवनाचा व उत्तेजक सौंदर्याचा अभिसार घेऊन वसंतसेना चारुदत्ताकडे जायला निघते. तेव्हा अनायासे सर्वत्र अंधार होता. पण वाटेतच वीज चमकली. एकदम दचकून आभाळाकडे पाहून वसंतसेना म्हणाली, ''अयि विद्युत् त्वमपि च प्रमदानां दुःखं न जानासि''? (अग सौदामिनी, तुलासुद्धा स्त्रीजातीचे दुःख कळत नाही ना? विद्युत ही स्त्रीलिंगी असते, निदान तिने तरी प्रियकराची चोरून भेट घेऊ इच्छिणाऱ्या आपल्या बहिणीची तारांबळ उडवून देण्यासारखा दुष्टपणा करू नये.)

वणीला एके दिवशी अनपेक्षितपणे चितमपल्लींचे पत्र आले. त्या पत्रात त्यांनी मला हाच संदर्भ विचारला होता. त्याअर्थी इतके दिवस त्यांच्या मनात वसंतसेनेची ही व्यथा रुतून बसली होती. त्यातून त्यांच्या काव्यमर्मज्ञ मनाशी पुन्हा परिचय दृढ झाला. खरे म्हणजे चितमपल्ली हे वनाधिकारी. त्यांचा नित्य संबंध घनदाट अरण्ये, निवांतपणे परस्परांचे सख्यसुख अनुभवणारी वृक्षवनस्पती, वन्य व हिंस्र पशू, सरपटणारे प्राणी व विविध रंगांची व नादांची रानपाखरे यांच्याशीच असायला हवा. काव्याचा आणि अरण्याचा संबंध केवळ वर्णनाचा विषय होण्यापुरता; किंवा एखाद्या भयप्रद वा रोमांचक प्रसंगाला उठावदार करणाऱ्या पार्श्वभूमीपुरता. पण



चितमपल्लींचे मन काव्यावर नितांत प्रेम करणारे हो
त्यामुळे आपोआपच काव्याचा विषय होऊ शकणा
वस्तुजातावर व जीवजातावरही त्यांनी प्रेम के
निर्धास्तपणे आश्वासन देणाऱ्या व दुरूनच साज
दिसणाऱ्या डोंगरावर कवींचेही प्रेम असते. हिंस्र पश
रुद्र सौंदर्य चित्रांमध्ये त्यांना मोह घालते. पण प्रत्
भेटीचे बाकी भय वाटते. खुद्द कवींना ज्यांच्याब
वरपांगी कुतूहल वा आकर्षण असू शकते, त्यांचा अ
जवळून अंतरंग परिचय करून घेण्यात चितमपल्ल
हयात घालवली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वनविभा
विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करीत मेळघाटम
व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक म्हणून १९९० साल
निवृत्त झाले. कर्नाळा येथील पक्षांचे अभयारण्य, नवेग
राष्ट्रीय उद्यान, नागझिरा येथील अभयारण्य यां
विकासात व्याघ्रप्रकल्पाएवढेच त्यांनी भरघोस योग
केले. 'डॉ. सलीम अली वन्यप्राणी संस्थे'चे ते संस्था
सचिव राहिले आहेत.'महाराष्ट्र पर्यटन वि
महामंडळा'चे संचालक व 'वन्यजीव संरक्षण समित
सभासद म्हणूनही ते कार्यरत राहिले. सृष्टीचे सा
व निरागस वन्य पशुपक्षांचे जग ही त्यांच्या म
आवडती क्रीडास्थळे म्हणून सांगता येतील.

अभ्यासासाठी संस्कृतबरोबरच जर्मन आणि र
भाषेचेही त्यांनी अध्ययन केले. नांदेडचे म
यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे, पुण्याचे देवळेशास्त्री, पन
गजाननशास्त्री जोशी, परशुरामशास्त्री भातखंडे व
धामणकरशास्त्री यांच्याकडून त्याची परंपरागत प
संस्कृत शास्त्रे व काव्ये समजावून घेतली. वने, वन्य
व पक्षिजगत या विषयाचे संशोधन, वन्य
व्यवस्थापन या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिसंवाद
व चर्चासत्रांमध्ये त्यांनी सहभाग घेतला
निबंधवाचनही केले.

वयाची पन्नाशी उलटल्यानंतर त्यांचे आपल्या आव
विषयावरील 'पक्षी जाय दिगंतरा' हे पहिले पुस्तक प्र
झाले. चितमपल्लींचा स्वभाव बुजरा आहे. वन्यविश्व
आयुष्य घालवल्यामुळे नागर जगामध्ये त्यांची अ

‘शाकुंतला’तील शाङ्‌र्गधर व शारद्वतासारखीच झाली असल्यास नवल नाही. त्यामुळे लेखनाच्या क्षेत्रात त्यांनी भीतभीतच प्रवेश केला. पण नरहर कुरुंदकरांच्या आश्वासक पाठराखणीमुळे त्यांचे मनोबळ काहीसे वाढले व त्यांनी स्फुटलेख लिहायला सुरुवात केली. ‘पक्षी जाय दिगंतरा’ हा त्यातूनच सिद्ध झालेला पहिला लेखसंग्रह. त्यानंतर ‘जंगलाचं देणं’, ‘रानवाटा’, ‘शब्दांचं धन’, ‘रातवा’, ‘घरट्या पलीकडे’, ‘पाखरमाया’, ‘निळावंती’ यांसारखी लालित्याची डूब असलेली त्यांच्या अरण्यवाचनाची हृद्य फलिते निर्माण झाली. ‘आनंददायी बगळे’, ‘सुवर्णगरूड’, ‘भारतातील साप’ अशी माहितीसमृद्ध पुस्तके व गेल्या वर्षी ‘पक्षिकोश’ हा त्यांचा महत्त्वाचा संदर्भग्रंथही प्रकाशित झाला. या सर्व पुस्तकांमधील अज्ञात माहितीमुळे व विशेषत: अरण्यानुभवावर आधारित ललितबंधांमुळे मध्यमवर्गीय वाचक कदाचित पहिल्यांदाच मानसिक पातळीवर केवळ वनयात्रिकच नव्हे, तर निसर्गसृष्टीचे नागरिकही होऊ शकले.



वनविश्वाचा परिचय करून देणारे लेखन यापूर्वी मराठीमध्ये झाले नसेल, असे नाही. पण चितमपल्लींच्या लेखनामध्ये निसर्गाची अनुभवचित्रे पहिल्यांदा उमटल्यामुळे घरबसल्या सर्वांना वनविहाराचा आस्वादही घेता आला. चाकोरीच्या गद्य जीवनक्रमातून एक सुखद बदल म्हणून क्वचित होणारा हा वनविहार नव्हता, तर हे अरण्यातील प्रत्यक्ष जगणे होते आणि ते आपल्याला चितमपल्लींच्या सहृदय शैलीमुळे जगता आले. ‘अरण्यवाचन’ हा शब्दही त्यांचाच. आरण्यक संस्कृतीतील ऋषीमुनींचा वारसा सांगणारा हा शब्द चितमपल्लींनीच घडवला. कालिदासाची ‘शंकुतला’ ही निसर्गकन्या होती. अरण्याच्या असंख्य अबोल अपत्यांपैकीच ती एक होती. त्यामुळेच कण्वाच्या तपोवनातील सर्व वृक्षवनस्पती व पशुपक्षांशी तिचे भ्रातृभावाचे संबंध होते. म्हणूनच ती पतिगृही जायला निघाली, म्हणून वृक्षांनी एका वनकन्यकेवर राजस्नुषेच्या ऐश्वर्यसंपन्न अहेराचा वर्षाव केला. सुवर्णमय रत्नमाला, तलम रेशमी पोताची वस्त्रे, अंगरागासाठी लाक्षारस ह्या वस्तू त्या नि:शब्द वनराईने आपल्याला कायमचे सोडून जाणाऱ्या बहिणीला भरल्या हृदयाने अर्पण केल्या. वाटेतल्या वेलीने विळखा घालावा, केसरवृक्षाने तिचा पदर धरून ठेवावा, दीर्घापांग नावाच्या मृगशावकाने तिची गती अडवावी व दिवस भरलेल्या हरिणीने जड पावलांनी तिला निरोप द्यावयास यावे– हे जे हार्द निसर्गाकडून शकुंतलेला दाखवले गेले, ते सुखासुखी येत नसते. त्यासाठी त्या नि:शब्द विराटाचा विश्वास संपादन करावा लागतो. चितमपल्लींना सर्व वृक्षजाताचे, पशुपक्षांचे स्वभावधर्म ज्ञात आहेत. तसे ते रानात राहणाऱ्या किंवा रानाशी सख्य जोडणाऱ्या अनेकांना ज्ञात असतात. त्यांना पशुपक्ष्यांची भाषाही समजते. पक्षाच्या ओरडण्याच्या पद्धतीवरून त्यांनी आडाखे बसवलेले असतात. याप्रमाणे सृष्टीशी संवाद साधू शकणाऱ्या माणसाशीच सृष्टी बोलायला राजी होते. असा माणूसच खऱ्या अर्थाने सृष्टिसखा असतो. हे श्रेय अर्थातच चितमपल्लींना सहजासहजी मिळालेले नाही. तसे वनखात्यात थोडे का लोक नोकरीला लागतात? कमी का लोक अधिकारी होतात? सृष्टीच्या सौहार्दाची ओळख



त्यांना कशी होत नाही? प्रेयसीच्या अनुनयासाठी एखाद्याला किती आटापिटा करावा लागतो. सृष्टी आपल्या इच्छेला राजी व्हावी, यासाठी चितमपल्लींनी किती खडतर साधना केली असेल? सुदैवाने त्यात त्यांना यश आले. आपले हे यश लेखननिबद्ध करण्याची शब्दसिद्धीही आपल्याजवळ असल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणून वनजीवनाची ही अज्ञात गुहा आपला सुरक्षितपणा आटोकाट जपणाऱ्या मध्यमवर्गीयांसाठीही खुली झाली.

चितमपल्लींनी हंसदेवाच्या ‘मृगपक्षिशास्त्र’ या ग्रंथाचा मराठी गद्यात अनुवाद केला. त्यामुळे वनक्षेत्रातील इतर अज्ञात गुहांचाही शोध लागला. ‘मृगपक्षिशास्त्र’ या ग्रंथाचे एकूण दोन भाग आहेत. पहिल्या भागात १२७ पशू व ९७ पक्षांची लक्षणे सांगितली आहेत. प्रत्येक पशुपक्ष्याचा संभोगसमय, गर्भधारणा, प्रसूतिकाळ, बालक्रीडा, जातिभेद, वर्तनभेद, रंगभेद व वयोमर्यादा याची एकेका प्राण्याच्या सान्निध्यातून माहिती करून देऊन ती या ग्रंथात उपलब्ध करून दिली आहे. ‘मृग’ हा शब्द आपण ‘हरिण’ या अर्थाने वापरतो. पण एक गवा वगळता शिकार करणाऱ्या सर्वच वन्यपशूंचा समावेश त्या शब्दामध्ये होतो, हे हंसदेवाने आपल्याला सांगितले. वनराज सिंहाच्या एकूण सहा जाती; वाघ, अस्वल, लांडग्याचे तीन प्रकार, हे एरव्ही आपल्याला कसे कळले असते? सगळ्यांचे आयुर्मानही आपल्याला माहीत नसते. गेंडा ३२, सिंह २०, वाघ १६, लांडगा व कोल्हा १० व हरिण ९ वर्षे जगतो. एकटा हत्ती तेवढा शतायुषी आहे. पशुपक्ष्यांची वर्णने वाचताना आपल्याला मौज वाटते. एरव्ही या जगाला आपण दुरावलेलेच असतो. पण त्या जगाबद्दलचे आपल्याला बालसुलभ कुतूहल मात्र प्रचंड असते. त्यामुळे अशा पशुपक्ष्यांशी सलगी करणाऱ्या लोकांचे व प्रयत्नांचे आपल्याला नेहमीच कौतुक वाटते. हंसदेवांसारख्यांच्या प्रयत्नांमुळे आपली कुतूहलपूर्ती होतेच. पण या जगाबद्दलची भयाची व दुराव्याची भावनाही उणावते. माणसाळणाऱ्या पशुपक्ष्यांचा आपल्याला लळा लागतो. त्यामुळे त्यांच्या स्वभावगुणांची व खोडीसवयींचीही आपल्याला माहिती होते. इतर पशुपक्ष्यांबद्दल मात्र आपले घोर अज्ञान असते. त्यांची ओळख करून घेण्याची इच्छाही आपल्या मनामध्ये नसते. सुरक्षित अंतरावरून व स्वरक्षितपणाची खात्री पटल्यावरच आपण या जगाची ओळख करून घेण्याच्या साहसास धजावू शकतो. म्हणून शतकांच्या कालखंडात काही मोजक्यांनाच वन्यजीवनामध्ये राहण्याची वृत्ती व धृती संपादन करता आलेली दिसते. त्यांनी त्या एकाच गोष्टीचे वेड घेतलेले असते. स्वत: वन्यजीवन पत्करून त्या जगाचा सर्वांगाने छडा लावण्याचा ध्यास घेतलेला असतो.

वनजीवनाशी अटळ संबंध येणाऱ्या वनाधिकाऱ्यांना रात्रीबेरात्री जंगलात भटकावे लागते. वनसंपत्तीचे डोळ्यांत तेल घालून रक्षण करावे लागते. वन्यप्राण्यांशी ओळख वाढवावी लागते. निरनिराळ्या ऋतुमानांप्रमाणे सृष्टीमध्ये होणाऱ्या स्थित्यंतराचे डोळे भरून दर्शन घ्यायला मिळते. झरे, ओढे, नद्या, पर्वत व दऱ्या यांच्या सान्निध्यात राहायला मिळते. पण सगळ्याच अधिकाऱ्यांशी निसर्ग मोकळेपणाने वागेलच, असे नाही. फारच थोड्यांजवळ तो आपले हृद्‌गत व्यक्त करतो. स्वत:बद्दलच्या प्रामाणिक प्रेमाची प्रचिती पाहणाऱ्याच्या डोळ्यांमधून पटली, की निसर्ग अशांजवळ भरभरून बोलायला लागतो. अशा वनमित्राला जी दृष्टी लाभलेली असते, त्यालाच सृष्टीची अंगोपांगे न्याहाळण्याची शक्तीही मिळते. मानवी सृष्टीपेक्षा वन्यसृष्टीवरच त्याचा जीव जडतो. कारण वन्यसृष्टीकडून त्याचा अपेक्षाभंग कधी होत नसतो. विश्वासघात तर होण्याची भीतीच नसते.

‘निळावंती’ची आख्यायिका प्रसिद्ध आहे. चितमपल्लींचे एक पुस्तक त्यावरही आहे. निळावंतीची पोथी त्यांना सापडली. निळावंती ज्याला येते त्याचा वंश वाढत नाही. म्हणून त्याच्या नादी न लागण्याची त्यांच्या आईने त्यांना सूचना दिली. पण वंशवृद्धीपेक्षा ज्ञानवृद्धीला त्यांनी अग्रक्रम दिला. त्यातूनच त्यांच्या वाङ्‌मयीन अपत्यांची संख्या एकोणवीसपर्यंत वाढू शकली. वननिरीक्षण, संदर्भ-साहित्याचा व्यासंग व प्रत्यक्ष



वनजीवनाशी समरस होण्याची साधना यातच चितमपल्ली सदैव व्यग्र होते. त्यांचे घर अरण्यविषयक संदर्भ ग्रंथांचे भांडारच आहे व हे भांडार आपल्या भविष्यनिधीच्या पैशातून त्यांनी विकत घेतले. त्यांच्या पक्षिनिरीक्षणातून मराठीतील पहिला समृद्ध पक्षिकोश सिद्ध झाला. त्यानंतर अर्णवविश्वाची जवळून ओळख करून घेण्याकरता वर्षभर ते समुद्राच्या सान्निध्यात जाऊन राहिले. समुद्राचा स्वभाव, तेथील जलपक्षी, जलचर व जलसंपत्ती ह्याचा त्यांना अभ्यास करायचा होता. जंगलचं देणं त्यांनी विपुल जमा केलं. आता अर्णवाचा अहेरही त्यांच्या घरी जमा होईल. मध्यमवर्गीय मन सृष्टीच्या या अंगांपासून सदैव लांब राहिले. चितमपल्लींच्या वशिल्यामुळे आता त्या सर्वांची जवळून ओळख होऊ शकेल. आपल्याला पाहायला मिळणाऱ्या फुलांची व पक्ष्यांची नावे व गुण त्याला कळतील. आपल्याला माहीत असलेल्या नावांच्या वृक्षवनस्पतींशी त्याची ओळख होईल. एरव्ही आमची अवस्था उत्तर रामचरित्रातील वाल्मिकीच्या आश्रमातल्या

विद्यार्थ्यांसारखीच असते. त्यांना अश्वाचे वर्णन प
होते. फक्त अश्वच तोपर्यंत त्यांच्या ओळखीचा नव्ह
अकिंचन राहून केलेल्या अशा ज्ञानसाधनेचे श्रे
चितमपल्लींच्या आजीकडे जाते. गरिबीमुळे त्या म्हाता
देवीच्या नावे जोगवा मागून पोरे वाढवली. त्यां
आईने त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. तेवढी प
घरातून त्यांना मदत झाली होती. वडील गिरणीम
कामगार होते. निरभिलाषता हा त्यांना वडिलांकडू
मिळालेला पैतृक वारसा आहे. बाकी वडिला
इस्टेटीचा एवढासाही वाटा त्यांच्या पदरात पड
नाही. वडील गेले तेव्हा घरून परतताना आई
पायावर डोके ठेवून ते एवढेच म्हणाले,

“बाबांच्या धनावर माझा अधिकार नाही. तो मी सांगण
नाही. पण देवघरातल्या देवीची पूजेची माळ, फुल
परडी आणि पोतच तेवढी मला दे. माळेला स्म
देवाचे नाव घेईन, परडीसारखं आयाचित वृत्तीनं राह
आणि पोताकडे पाहून ज्ञानाची आराधना करीन
चितमपल्ली याच बाण्याने शेवटपर्यंत राहिले. दे
त्यांची श्रद्धा होती. पण तो देव त्यांना वनामध्ये, जळा
दिसला. त्याचीच त्यांनी उपासना केली. वेतनाव्यति
एका पैचीही अपेक्षा केली नाही. मिळाला तो
त्यांनी संचारामध्ये व अभ्यासामध्ये खर्च केला. म
मातृभाषा नसताना त्या भाषेत हृदयंगम ले
करण्याएवढे प्रभुत्व संपादन केले. जे लेखनकार्य
ते आतापर्यंत नवलाचे व अभूतपूर्व होते.
त्याबद्दलच्या बढाईचा ब्रसुद्धा कधी त्यांच्या त
निघाला नाही. वाचकांना नव्या ज्ञानाचे व अनु
दालन खुले करून देऊनही वृत्तीची नम्रता कधी स
नाही. सुदैवाने त्यांच्या या व्रतस्थ साधनेचा गौरव
शासकीय पुरस्कारांच्या व सामाजिक सन्मानांच्य
ठिकठिकाणी झाला. आईने दिलेल्या माळेला, प
व पोताला स्मरून त्यांनी त्या सर्व सन्मानांचा
भावाने स्वीकार केला.

सन्मानांच्या रूपाने ईश्वराचाच शाबासकीचा हात अ
पाठीवरून फिरल्याची धन्यता त्यांना वाटली अ

राम शेवाळकर

‘शिवारातील शब्दशिल्पकार’

# प्राचार्य रा.रं.बोराडे

प्राचार्य रा. रं. बोराडे हे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील—विशेषत: १९६० नंतरच्या कालखंडातील—एक महत्त्वाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आहे. एक लोकप्रिय, मान्यताप्राप्त ग्रामीण साहित्यिक म्हणून त्यांनी आपली ओळख (Identity) तयार केली आहे. जाणीवपूर्वक साहित्यनिर्मिती करणारे ते एक चतुरस्त्र लेखक आहेत. कथा, कादंबरी, नाटक-नाटिका, वगनाट्य, समीक्षा या क्षेत्रांत त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे.

प्राचार्य रावसाहेब रंगराव बोराडे म्हणजे ग्रामीण अस्मितेचा कलदार आविष्कार. एक कृतिशील अन् समाजमनस्क साहित्यिक. त्यांच्या सृजनशील साहित्याला मराठवाड्याच्या मातीचा परिमळ असल्याचे जाणवते. त्यातून तिथल्या ग्रामीण बोलीचा अंतर्नाद निनादत असल्याची खात्री पटते. त्यांचे लौकिक जीवन आणि त्यांची वाङ्मयनिर्मिती यांच्यामध्ये अतूट हार्दिक अनुबंध आहे. या अनुबंधाचे अपरिहार्य फलित म्हणजे बोराडे यांचे लेखन आहे. थोडक्यात, ‘अंतरिचे धावे, स्वभावे बाहेरी’ हा त्यांच्या साहित्यसाधनेचा आदिस्वर असल्याचे जाणवते.

१९६० नंतरच्या चाळीस वर्षांत संपूर्ण देशात—विशेषत: महाराष्ट्रात—जी स्थित्यंतरे आणि परिवर्तने झाली; त्यांचे बोराडे हे साक्षेपी निरीक्षक, वस्तुनिष्ठ चिंतक आणि सर्जनशील साक्षीदार आहेत. ते विधायक वृत्तीचे, सकारात्मक दृष्टीचे समाजमनस्क साहित्यिक आहेत. खेड्यातल्या ज्या शेतकरी कुटुंबात आपला जन्म झाला, त्या कुटुंबातील घटक या नात्याने ते जीवन आपण प्रत्यक्ष अनुभवलेले असल्यामुळे आपणच हे सारे मराठी वाङ्मयात आणले पाहिजे, असे त्यांना प्रकर्षाने वाटत होते. नागर संस्कृतीत रमून, सारे पांढरपेशी सोस रिचवून त्यांनी केवळ एक लेखनविषय म्हणून या जीवनाकडे पाहिलेले नाही. म्हणूनच ग्रामीण जीवनाचा अस्सल भाष्यकार, मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे समर्थपणे चित्रण करणारा जाणता साहित्यिक असा त्यांचा सार्थ, गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. ग्रामीण जीवनातील महत्त्वाच्या स्थित्यंतरांचे वास्तव आपल्या साहित्यातून मार्मिकपणे चित्रित करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. थोडक्यात, ग्रामीण जीवनाशी जन्मापासून स्वाभाविकपणे निर्माण झालेली आत्मीय बांधिलकी ही त्यांच्या लेखनाची मूळ प्रेरणा आहे. ‘माती आणि नाती’ यांचा अनुबंध हा त्यांच्या साहित्यनिर्मितीचा मूलबंध आहे.

बोराडे यांनी कथालेखनाने आपल्या साहित्यनिर्मितीस प्रारंभ केला. १९६० नंतर अव्याहतपणे कथासाधना करणारे कथाकार म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला आहे. त्यांचे कथालेखन विपुल आणि भरघोस आहे. त्यांच्या नावावर आतापर्यंत पंधरा स्वतंत्र आणि दोन निवडक कथांचे संग्रह प्रसिद्ध आहेत. ‘पेरणी’, ‘मळणी’, ‘बोळवण’, ‘नातीगोती’, ‘ताळमेळ’, ‘कणसं आणि कडबा’ हे त्यांचे अतिशय चांगले कथासंग्रह आहेत. ‘वानवळा’ आणि ‘बोरी-बाभळी’ या निवडक कथासंग्रहातून त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये आणि बलस्थाने प्रकट होतात. मराठवाड्यातील ग्रामीण जीवन बोराडे यांनी जेवढ्या सामर्थ्याने आणि विविधतेने चित्रित केले आहे; तितके अजूनही कोणी केले नाही. तेथील कनिष्ठ शेतकरी कुटुंबाच्या जीवनाचे सर्वस्पर्शी चित्रण त्यांनी आपल्या कथांतून केले आहे. त्यातून त्या भागातले रीतिरिवाज, समजुती, सणसमारंभ, वैवाहिक जीवन, नाती-गोती, स्त्री-पुरुष संबंध, केवळ जगण्यासाठी सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा यांचे प्रत्ययकारी दर्शन घडते. ग्रामीण जनतेचे समूहमन आणि त्या मनातील लहानमोठे भावतरंग त्यांनी यशस्वीपणे रेखाटले आहे. जणू समग्र ग्रामवास्तव त्यांच्या कथेने कवेत घेतले आहे. सामान्य शेतकरी, कष्टकरी, बलुतेदार, शोषित, स्त्री, अस्पृश्य यांच्या अनुभवांना त्यांनी कणवेने आणि कलात्मकतेने कथांकित केले आहे. त्यांचा गुराढोरांसह साकारणारा निसर्ग, त्या त्या परिसराच्या पर्यावरणासह त्यांच्या कथेतून जिवंतपणे साकार झाला आहे.




बोराडे यांनी आपल्या कथालेखनातून ग्रामीण माणूस, त्याचे कुटुंब, त्याची नाती-गोती, त्याची आर्थिक, सामाजिक स्थिती आणि एकूणच त्याची म्हणूनच त्याने जपलेली, जोपासलेली जीवनमूल्ये अतिशय प्रभावीपणे शब्दबद्ध केली आहेत. माणूस आणि त्याची रक्ताची नाती, त्याचे कुटुंब, सोयीरसंबंध आणि त्याचे हितसंबंध याचे नेमके चित्रण करण्यात त्यांची लेखणी विशेष रस घेते. ग्रामीण भागातील माणूस जीवन जगत असताना असे कितीतरी कौटुंबिक, सामाजिक, व्यावहारिक पदर जोपासीत असतो. त्यामुळे त्याच्या वाट्याला अगतिकता आणि परिस्थितीशरणता येते. त्याची ही मानसिक कुचंबणा बोराडे यांनी आपल्या कथालेखनातून भरघोसपणे सादर केली आहे. ‘पेरणी’, ‘मळणी’, ‘नातीगोती’, ‘बोळवण’, ‘वाळवण’ ह्या महत्त्वाच्या कथासंग्रहांमध्ये बोराड्यांनी स्त्रीजीवनातील कारुण्याचे, तिच्या शोषणाचे उत्कट चित्रण केले आहे. बाईच्या जातीची काही दु:खे असतात, ती तिला निमूटपणे सोसावी लागतात. ग्रामीण समाजातील एकटी, पोरकी, निराधार, सासुरवाशीण, विधवा, परित्यक्ता, रखेल अशा स्त्रियांच्या वाट्याला येणारी दु:खेही त्यांनी आपल्या कथालेखनातून गंभीरपणे मांडली आहेत. थोडक्यात, ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या व्यथावेदनांचे कसदार चित्रण हे बोराडे यांच्या कथानिर्मितीचे





बलस्थान आहे. बोराडे यांच्या काही कथांतून निरागस बालमनाचे आणि उपेक्षित वृद्धांच्या भावविश्वाचेही दर्शन घडते. त्याचबरोबर शेतीविषयक काही प्रश्नांनाही त्यांनी आपल्या कथेत स्थान दिले आहे. सुशिक्षितांची बेकारी, गावपातळीवरील राजकारण, जातिसंदर्भाचे नवे तणावही त्यांनी आपल्या कथेतून प्रकट केले आहेत. १९८०च्या दशकात जागृत झालेल्या ग्रामीण जनतेच्या जगण्याचे संदर्भही त्यांच्या कथांतून व्यक्त होतात. 'कणसं आणि कडबा' या संग्रहाचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यातून तत्कालीन समस्यांची तीव्रता जाणवते; मात्र कथाशिल्पे म्हणून त्यांची गुणवत्ता कमी प्रतीची असल्याचे आढळून येते. ग्रामीण जीवनातील विलक्षण नाट्यपूर्ण घटना, ग्रामीण माणसाच्या स्वभावातील पीळ आणि पेच, खटकेबाद संवाद आणि उत्स्फूर्त कथनलाघव यामुळे बोराडे यांचे कथाकथनही रसिकप्रिय ठरले आहे. तशी एकूणच त्यांची कथासृष्टी संवादबहुल आणि कथनातुर आहे. म्हणूनच ती वैशिष्ट्य, वैविध्य आणि वैचित्र्य यांनी नटलेली आहे.

ग्रामीण जीवनामध्ये गांभीर्य आणि विनोद, कारुण्य आणि हास्य या दोन्ही धारा समांतरपणे वाहत असतात; त्या एकमेकांना जणू तोलून धरतात आणि त्यामुळेच ग्रामीण माणूस स्वत:ला सावरू शकतो, असे जाणवते. किस्सा, चुटका, विनोद, हास्य हा ग्रामीण जीवनातील दु:खांवर, शोषणावर जणू एक उतारा असतो. जीवनातील व्यथेकडे, वेदनेकडे विनोदाच्या दृष्टीने पाहणे हा जणू तेथील आदिबंध असतो. त्यामुळेच बोराडे यांच्या हातून विपुल विनोदी लेखन झाले असावे. काही कथांचा अपवाद वगळता त्यांनी आपल्या विनोदी कथांमधून ग्रामीण माणसाच्या आदिम प्रवृत्तींचे दिलखुलासपणे दर्शन घडविले आहे. ग्रामीण माणसाच्या स्वभावातील पीळ आणि पेच, तिढा आणि रुबाब, आदिम मनोवृत्ती आणि सरंजामी मानसिकता यांचे विनोदी अंगाने घडविलेले दर्शन हे त्यांच्या कथासृष्टीचे आणखी एक बलस्थान आहे.

स्वातंत्र्योत्तरकालीन मराठी साहित्यात बोराडे यांनी ग्रामीण वास्तवाचे प्रत्ययकारी आणि पैलूदार रेखाटन करून आपले खास स्थान निर्माण केले आहे. ग्रामीण कुटुंबातील जुनी नातीगोती, त्यातून निर्माण होणारे प्रेमबंध आणि नवे सोयीरसंबंध यांचे अर्थपूर्ण आकलन हा त्यांचा आस्थाविषय आहे. त्यांच्या कथात्म साहित्याला नाट्यगुणांनी रोचक आणि रंगतदार बनविले आहे. ग्रामीण जीवनातील नाट्य हेरण्याची शोधक नजर, अनुभवाचे नाट्यात्म प्रकटीकरण करण्याचे सामर्थ्य आणि एकाच वाङ्मयप्रकारात गुंतून न पडता त्यांना नाट्यलेखनाचे वाटलेले आकर्षण यामुळे ते कथात्म साहित्याकडून नाट्यलेखनाकडे वळले. १९६९ ते १९९८ या काळात त्यांनी लहानमोठ्या अशा पंधरा नाट्यकृतींचे लेखन केले आहे. त्यांच्या नाट्यकृतींमध्ये एकांकिका, दोन अंकी नाटक, तीन अंकी नाटक, प्रहसन, पथनाट्य, मुक्तनाट्य, नाट्यरूपांतर, वगनाट्य असे प्रकारवैविध्य आहे. याचा अर्थ त्यांच्या नाट्यलेखनात विविधता, विपुलता आणि वैशिष्ट्यपूर्णता आहे.

ग्रामीण जीवनाचे समग्र भान असल्याने ग्रामीण मराठी नाटकाची प्रतिमा उंचावण्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले आहे. ग्रामीण मराठी नाटक रंगभूमीवर रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या नाट्यकृतींचे कथाविषय गंभीर आणि गमतीदार आहेत, त्यात विनोद आणि कारुण्य आहे. त्यातील संवाद खटकेबाज, उत्स्फूर्त, तडाखेबंद आहेत. त्यांची भाषा सोपी, सरळ, ग्रामीणांची असल्यामुळे ती त्यांच्या नाट्यलेखनाला न्याय देणारी आहे. त्यांचे नाट्यलेखन संख्यात्मकदृष्ट्या लक्षणीय, आशयाच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.

'विहीर' हे त्यांचे दोन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक. यात सवर्ण विरुद्ध सवर्ण, दलित विरुद्ध दलित आणि सवर्ण विरुद्ध दलित असा तिहेरी सामाजिक संघर्ष असल्याचे आढळून येते. शिवाय हा संघर्ष पिण्याच्या पाण्याच्या समस्येशी निगडित आहे. वास्तविक हे नाटक समस्याप्रधान आणि पुरोगामी विचारांची बाजू मांडणारे असल्यामुळे त्यात प्रचारनाट्याचा एकांगीपणा येण्याची शक्यता होती. पण लेखकाची प्रामाणिक भूमिका आणि नाट्यतंत्राची जाण यामुळे या नाटकाचा तोल गेला नाही. 'पिकलं पान' हे त्यांचे लोकप्रिय विनोदी नाटक. एक इरसाल, रंजक, सदाबहार नाटक म्हणून त्याची ख्याती आहे. ग्रामीण माणसाच्या आदिम धारणांचा उत्स्फूर्त आविष्कार हे त्याचे वैशिष्ट्य आहे. या नाटकाची प्रकृती वगनाट्याच्या प्रकृतीशी मिळतीजुळती आहे. घराण्याची पत, इज्जत, मानपान याला महत्त्व देणारी मध्ययुगीन मनोवृत्ती या नाटकातून उजळ माथ्याने मिरविते. स्त्रीकडे तुच्छतेने पाहणारी, एखादी वस्तू ठेवावी तशी तिला ठेवू इच्छिणारी सरंजामी मानसिकता या नाटकातून प्रत्ययास येते. 'हसले गं बाई फसले' आणि 'कशात काय अन् फाटक्यात पाय' ही त्यांची दोन वगनाट्ये रंजक, प्रयोगक्षम आणि उद्बोधक आहेत. 'बंधमुक्ता' हे त्यांचे 'स्त्रियांचे राजकारणातील आरक्षण' या विषयावरील दोन अंकी नाटक. अलीकडे प्रस्थापित मंडळी आपल्या राजकीय अस्तित्वासाठी स्त्रियांना राजकारणात सहभागी व्हायला भाग पाडतात. त्यामुळे राजकीय भान आणि महत्त्वाकांक्षा नसलेल्या स्त्रियांचा कसा कोंडमारा होतो, याचे दर्शन या नाटकातून घडते. प्रस्थापितांची पुरुषी मनोवृत्ती, त्यांची प्रबळ सत्ताकांक्षा, त्यासाठी स्त्रीचा साधन म्हणून वापर करण्याची अभिलाषा आणि याची स्त्रीला नव्याने होत असलेली जाणीव हा या नाटकाचा महत्त्वपूर्ण आशय आहे.

'बंधमुक्ता' आणि विशेषत: 'आमदार सौभाग्यवती' या नाट्यरूपांतरात अनिच्छेने, आपद्धर्म म्हणून राजकारणात आलेल्या स्त्रियांची फरपट आपले लक्ष वेधून घेते. सत्ता मिळविणे आणि मिळवलेली सत्ता टिकविणे हे राजकारणी माणसाचे अंतिम साध्य असते. या आपल्या एकमेव जीवनमूल्यापुढे ते सत्य, न्याय, नीती, प्रामाणिकपणा, चांगुलपणा यांना अप्रस्तुत मानतात.

त्यांच्या नतद्रष्ट आणि विधिनिषेधशून्य राजकारणात स्त्रियांची कशी गोची आणि कोंडी होते, याचे तेथे उत्कट प्रत्यंतर येते.
रंजन आणि प्रबोधन ह्या त्यांच्या नाट्यलेखनाच्या प्रमुख प्रेरणा आहेत. बोराडे ग्रामीण साहित्य चळवळीचे खंदे पुरस्कर्ते
असल्याने ग्रामीण रंगभूमी रुजविणे, तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे त्यांच्या नाट्यलेखनाचे प्रयोजन असणे स्वाभाविक
आहे. त्यासाठी त्यांनी रंगभूमीवरील पात्रांना ग्रामीण बोली देऊन एक ऐतिहासिक कार्य केले आहे. त्यांचे नाट्यलेखन आशयाच्या
दृष्टीने समकालीन, मूल्यात्मक दृष्टीने प्रगतिशील असूनही प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने त्यात काही कच्चे दुवे आढळतात.
कथानिर्मिती आणि नाट्यलेखनाबरोबरच बोराडे यांनी कादंबरी हा वाङ्मयप्रकारही समर्थपणे हाताळला आहे. 'पाचोळा'
(१९७१) ही त्यांची पहिली महत्त्वाची, बहुचर्चित आणि श्रेष्ठ दर्जाची कादंबरी आहे. त्यानंतर गेल्या तीस वर्षांत त्यांनी
'सावट', 'आमदार सौभाग्यवती', 'चारापाणी', 'महान गाव', 'रहाटपाळणा' आणि 'इथं होतं एक गाव' अशा एकूण सात
कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'महान गाव' या कादंबरीमध्ये त्यांनी ग्रामीण जीवनातील वास्तवातून फुललेला विनोद टिपण्याचा
प्रयत्न केला आहे.
ग्रामीण जीवनातील स्थितिगतीची कलात्मक नोंद करणे हे त्यांच्या कादंबरीलेखनाचे प्रयोजन असल्याचे जाणवते. 'पाचोळा'मध्ये
ग्रामजीवनाशी बांधलेले बलुतेदार १९७०च्या दशकात कसे मोडीत निघाले, यासंबंधीचे वास्तव कलात्मक पातळीवर टिपले
आहे. ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर शिकलेल्या तरुणांची एका वेगळ्या पातळीवर कशी कुचंबणा होते,
विवाहासंबंधीचा आयुष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्याबाबत कसे दडपण




येते, याचे चित्रण 'सावट'मध्ये आहे. दुष्काळामुळे शेती-शेतकरी-त्यांची जनावरे
यांची कशी वाताहत होते आणि त्याकडे स्वयंसेवी संस्था, सरकारी अधिकारी, जनतेचे
पुढारी कसे तटस्थतेने पाहतात हा 'चारापाणी'चा विषय आहे. राजकारणात भाग घेणाऱ्या
स्त्रियांचा वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर कसा कोंडमारा होतो;
याचा उत्कट प्रत्यय 'आमदार सौभाग्यवती'मध्ये आल्याशिवाय राहत नाही. किल्लारीच्या
भूकंपात केवळ वित्तहानी आणि जीवितहानीच होते असे नाही; तर मानवी जीवनमूल्येही
कशी पायदळी तुडविली जातात याचा 'इथं होतं एक गाव'मधील स्पंदनशील आलेख
रसिकांना अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.
शहरीकरणाचे आक्रमण, शिक्षणाचा प्रसार,
तडाखा, भूकंपाचा प्रकोप यांमुळे ग्रामीण जीवन विकास योजनांची अंमलबजावणी, दुष्काळाचा
त्यात मानवी मूल्यांची कशी होळी होते, यांचा कसे ढवळून निघते, ते कसे होरपळून जाते,
घडते. त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रकट झालेल्या याचे दर्शन बोराडे यांच्या कादंबरी लेखनातून
आणि परिवर्तनाच्या लाटेत सापडलेला ग्रामीण जीवनात गावगाड्याशी बांधलेला
दरिद्री, दुबळा, परंपरानिष्ठ शेतकरी आहे; नात्यागोत्याच्या चक्रात अडकलेल्या, बलुतेदार आहे; शेतीवर जगणारा सामान्य,
चिंतनशील युवकाची जीवघेणी सल आहे; जुन्या सामंतशाहीचे नवे अवतार असलेले सधन, बेरकी, सत्ताकांक्षी शोषक आहेत;
त्याचप्रमाणे त्यांना विरोध करून त्यांच्याशी संघर्ष करण्याची ईर्षा बाळगणाऱ्या व्यक्तीही आहेत.
रा. रं. बोराडे आपल्या साहित्यातून सामान्य माणसाच्या जीवनाचे चित्रण करतात. ग्रामीण भागातील, मराठी समाजातील छोटा
शेतकरी आणि शेतमजूर हा त्यांच्या कथात्म साहित्याचा विषय आहे. त्यातही आर्थिकदृष्ट्या दरिद्री पण सांस्कृतिकदृष्ट्या
स्वत:ला उच्च समजणारा, आपल्या मानपानाबद्दल दक्ष असणारा वर्ग हा त्यांच्या साहित्याचा कणा आहे. या सामान्य माणसांची
वेगवेगळ्या कारणांनी होणारी घुसमट हे त्यांच्या लेखनाचे आशयसूत्र आहे. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि नंतरच्या
काळात राजकीय अशा सगळ्या स्तरांवर हे आशयसूत्र त्यांनी आपल्या कथात्म साहित्यातून आणि नाट्यात्म निर्मितीतून
प्रभावीपणे मांडले आहे. मराठवाड्यातील सरंजामी मानसिकता, लोकशाहीमुळे सामान्यांना झालेली आत्मप्रतिष्ठेची जाणीव,
दलितांना आलेले आत्मभान, कष्टकरी बहुजनांच्या वाट्याला येणाऱ्या हालअपेष्टा, स्त्रियांचे शोषण आणि सुशिक्षित तरुणांची
कोंडी यांसारख्या अनेक अंगांनी त्यांनी आपल्या साहित्यातून समाजजीवनाचा वेध घेतला आहे. त्यांच्या साहित्यामध्ये सरंजामशाहीला
विरोध, शोषणाला नकार, अन्यायाचा प्रतिकार, आत्मसन्मानाचा पुरस्कार, स्त्रियांच्या वेदनेचा उच्चार, समूहमनाचा आविष्कार
आणि समस्याग्रस्त ग्रामीण जीवनाचा कैवार आहे. म्हणून त्यांचे साहित्य म्हणजे गेल्या चाळीस वर्षांतील सामाजिक, आर्थिक,
राजकीय आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या पाऊलखुणांचा वाङ्मयीन दस्तऐवज आहे, असे सार्थपणे म्हणता येईल. गेल्या
चाळीस वर्षांत ग्रामीण जीवनात झालेले स्थित्यंतर, विघटन आणि अध:पतन त्यांच्या लेखणीने डोळसपणे टिपले आहे. म्हणून
'शिवारातील शब्दशिल्पकार' असा त्यांचा सार्थ गौरव केला जातो.

डॉ. एस. एम. कानडजे



# रा.रं.बोराडे

## सतत फुलणाऱ्या शिवारातला माणूस

प्रत्यक्षात रा. रं. बोराडे यांची माझी ओळख १९७६च्या ऑक्टोबरमध्ये झाली. ते त्यावेळी माझ्या 'व्यथाफूल' या पहिल्या संग्रहाच्या प्रकाशनासाठी औरंगाबादला आले होते. त्याआधी मी त्यांचे 'पेरणी', 'मळणी' हे ग्रामीण कथांचे संग्रह आणि 'पाचोळा' ही कादंबरी वाचली होती. त्यामुळे एक प्रतिभावंत लेखक म्हणून मी त्यांना साहित्याच्या माध्यमातून ओळखत होतो. आधी लेखनातून आणि नंतर प्रत्यक्ष भेट झाल्यावर जाणवलं ते असं; की हा माणूस आपला आहे.

दरम्यानच्या काळात १९७८ आणि १९७९ साली पुण्याला पौडफाट्याजवळच्या मा. पतंगराव कदमांच्या संस्थेत डॉ. आनंद यादवांनी ग्रामीण साहित्यिकांचे मेळावे आयोजित केले होते. मी सहकार खात्यातली नोकरी सोडून बीडला मराठीचा प्राध्यापक म्हणून काम करू लागलो होतो. पीएच.डी.साठी 'ग्रामीण कथा' हा विषय मी निवडलेला होता. त्यामुळे आणि तत्पूर्वी डॉ. यादव यांच्याशी ओळख झाल्याने त्यांनी मला या मेळाव्यांची निमंत्रणे पाठविली होती. पहिल्या मेळाव्यास मी जाऊ शकलो नाही; पण दुसऱ्या मेळाव्यास माझे मित्र डॉ. नागनाथ कोत्तापल्ले व मी गेलो. तेथे प्रा. नलगे, प्रा. द. ता. भोसले इत्यादी मार्गदर्शनासाठी आले होते. माझ्या कयासाप्रमाणे रा. रं. बोराडेही येतील असे वाटले होते. पण ते आलेले नव्हते. पण सर्वांच्याच बोलण्यातून बोराड्यांच्या साहित्याचे व त्यांच्या अनुपस्थितीचे उल्लेख येत होते. ग्रामीण साहित्य चळवळीच्या प्रारंभाच्या दृष्टीने काही जुळवाजुळव चालू होती. या चळवळीत बोराडे असणे गरजेचे आहे, असे साऱ्यांनाच जाणवत होते.




बोराडे पुण्याच्या त्या मेळाव्यांना काही प्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे उपस्थित राहू शकलेले नव्हते. मात्र हे चळवळ उभारण्याचे काम मराठवाड्यात त्यांनी त्याआधीच सुरू केलेले होते. त्या काळात नव्याने लिहू लागलेल्या विविध ठिकाणच्या ग्रामीण लेखकांना ते प्रत्यक्ष भेटीत आणि पत्ररूपाने सतत ऊर्जा पुरवीत होते. त्या काळात ते वैजापूर या ठिकाणी प्राचार्य होते. आणि त्यांच्या महाविद्यालयात अनेक चर्चासत्रे, शिबिरे व कार्यशाळांच्या माध्यमातून नवीन ग्रामीण साहित्यिकांना पूरक असे कार्य करीत होते. दहा दिवसांचे 'ग्रामीण आत्मकथन शिबिर' किंवा नंतरच्या काळातला 'शेतकरी साहित्य मेळावा' ही त्याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. एकीकडे 'नातीगोती', 'बोळवण', 'वाळवण', 'बुरुज' यांसारख्या संग्रहामधील कथांचे, 'विहीर', 'पाणी', 'पिकलेपान', 'हिरवे पान' यांसारख्या नाटिका-नाट्यांचे स्वत:चे लेखन चालू होते आणि दुसऱ्या बाजूला बहिरगाव, जि. औरंगाबाद, धर्माबाद, परळी, परभणी इत्यादी ठिकाणी छोटी छोटी ग्रामीण साहित्य संमेलने, शिबिरे भरवण्यास प्रोत्साहन देऊन त्यांचे आयोजन घडवून आणण्याचे काम ते करीत होते. बोटा, प्रवरा, अशोकनगर, कोपरगाव, नेवासा या ठिकाणी झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होताच पण विशेषत: चांदवड येथे ग्रामीण साहित्य संमेलन, माजलगावचे राज्य पातळीवरचे ग्रामीण साहित्य संमेलन घडविण्यातही त्यांचा फार मोठा वाटा होता. 'सावट' 'आमदार सौभाग्यवती', 'चारापाणी' या कादंबऱ्यांतून परिवर्तनशील खेडे व तेथील प्रश्न कादंबऱ्यांच्या माध्यमातून ते रेखाटीत होते तर दुसऱ्या बाजूला ग्रामीण साहित्य परिषदेच्या स्थापनेत पुढाकार घेऊन ग्रामीण साहित्य चळवळीचे कार्यही ते करीत होते.

आज नावारूपास आलेल्या अनेक ग्रामीण लेखकांच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. वैचारिक स्वरूपाचे फारसे लेखन त्यांनी केलेले नसले तरी त्यांनी केलेल्या ललित लेखनातून, भाषणांमधून त्यांनी ग्रामीण साहित्य चळवळीला सातत्याने बळ पुरविले आहे. ग्रामीण मनाची अनेक स्तरांवर होणारी उपेक्षा, ग्रामीण समाजा[...] होणारा अन्याय, पिळवणूक हे थांबले पाहिजे. त्या[...] योग्य असा न्याय मिळाला पाहिजे. त्याच्या श्रम[...] मूल्य प्राप्त झाले पाहिजे असे ते भाषणातून नेहमी सांगत असतात. ग्रामीण साहित्याची चळवळ ही केव[...] वाङ्मयापुरती सीमित न राहता तिचा प्रत्य[...] जनआंदोलनाशी समन्वय असावा, तिने ग्रामीण मना[...] आत्मभान देण्याचे काम करावे असे त्यांना सतत वा[...] आले आहे.

आज जवळपास परिवर्तनाच्या सर्वच चळव[...] थंडावल्यासारख्या झाल्या आहेत. ग्रामीण साहि[...] चळवळही याला अपवाद राहिलेली नाही. परंतु बोर[...] व्यक्तिगत पातळीवर ग्रामीण जीवनात नव्याने निम[...] झालेले, होत असलेले प्रश्न आणि त्यांची गुंता[...] यांचा विचार करीत असतात. त्यांचे जन्मगाव असलेल[...] जिल्ह्यात किल्लारी आणि त्या परिसरात भूकंपाम[...] झालेला उत्पात बघून त्यांचे हृदय हेलावून गेले. तेथ[...] भयावह परिस्थिती आणि अंगावर शहारे आणण[...] दृश्ये त्यांनी त्यांच्या 'तिथं होतं एक गाव' या कादंब[...] चितारली आहेत.

एक संवेदनशील, सृजनशील लेखक म्हणून ते जे[...] मोठे आहेत तेवढेच एक माणूस म्हणूनही त्यांच्या मन[...] मोठेपणाही जाणवल्यावाचून राहत नाही. कधी व[...] एखादा नवीन तरुण लेखक गैरसमजामुळे वि[...] अजाणतेपणाने राग व्यक्त करतो. पण ते शांत रा[...] त्याचा राग समजून घेतात. काही दिवसांनी त्या रागावले[...] नवोदिताला आपली चूक उमजते आणि तो पुन्हा पूर्व[...] त्यांच्याविषयी आदराने बोलू लागतो. अडचणीच्या [...] बोराडेसरच धावून येणार हे त्याला माहीत असते

माझ्या लक्षात राहिलेला एक प्रसंग त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय देणारा आहे. १९९० साली जळगावला राज्य पातळीवरचे ग्रामीण साहित्य संमेलन होणार होते. त्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून त्यांची ग्रामीण साहित्य परिषदेच्या बैठकीत निवडही झाली होती. परंतु ऐनवेळी संमेलन आयोजित करणाऱ्या संस्थेने निर्णय बदलला आणि ग्रामीण साहित्य संमेलनाऐवजी 'मराठा साहित्य संमेलन' घ्यायचे ठरविले. त्या संमेलनाचे अध्यक्षस्थान स्वीकारावे म्हणून खास माणूस पाठवून त्यांना निमंत्रित केले. पण, "मी एका व्यापक विचाराच्या व परिवर्तनाच्या चळवळीचा प्रतिनिधी असल्याने मी मराठा असलो तरी आपले हे जातीय पातळीवरच्या संमेलनाचे निमंत्रण स्वीकारू शकत नाही" असा त्यांनी आयोजकांना निरोप पाठवून ते निमंत्रण नाकारले.




आपल्या प्राचार्यपदाच्या कार्यकाळात अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी सक्रिय मदत केली. शक्य झाले त्या वेळी नोकऱ्या मिळवून दिल्या. आजही ते त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करतात. कौटुंबिक जीवनात ते सर्वांचे 'भाऊ' आहेत. सर्वजण त्यांना 'भाऊ' म्हणूनच संबोधितात. सर्वांचे भाऊ असलेले बोराडे स्वत:च्या जीवनातील वादळे मात्र तेवढ्याच खंबीरपणे झेलतात. आपले दु:ख, आपल्या व्यथा ते इतरांना सांगत बसत नाहीत. ज्या संस्थेत त्यांनी नोकरी केली तेथे कधी कधी गैरसमजामुळे त्यांना त्रास झाला. पण ते कधीही संस्थेबद्दल किंवा कुणा संस्थाचालकाबद्दल कडवटपणाने बोलले नाहीत.

आपल्या मिष्किलपणाने ताणलेले वातावरण हलके-फुलके करण्याचा त्यांचा गुण तर वाखाणण्यासारखा आहे. एकदा एका प्रवासात ते आणि त्यांचा एक लेखकमित्र एका खोलीत झोपले. बोराडे सकाळी लवकर उठतात. उठल्यावर त्यांनी पाहिले की आपला मित्र आपल्याही आधी उठला आहे. त्यांनी त्याला इतक्या लवकर उठण्याचे कारण विचारले तर, तो त्रासिक नजरेने त्यांच्याकडे बघत म्हणाला, "मी झोपलोच केव्हा?"

"म्हणजे?" बोराड्यांनी नकळत विचारलं.

"म्हणजे काय असायचं? रात्रभर मी नुसताच जागा. आणि यापुढे मी ठरवून टाकलेय. प्रवासात कधीही ज्या खोलीत तुझी व्यवस्था केलेली असेल तिथे मी अजिबात झोपणार नाही." मित्र घुश्श्यातच म्हणाला.

"अरे पण का? असं काय घडलं माझ्याकडून?" त्यांनी विचारलं.

मित्र म्हणाला, "काय घडलं? अरे तू झोपेत काय घोरतोस लेका? झोप येणार कशी बाजूच्याला? मला तर वहिनींचीच काळजी वाटते. त्यांना तुझ्या घोरण्याने कशी झोप लागत असणार?"

यावर बोराडे शांतपणे म्हणाले, "अरे, उलट मलाच मी प्रवासात असतो तेव्हा तिच्या झोपेची काळजी वाटते. कारण तिला आता अशी सवय झालीय की माझ्या घोरण्याशिवाय तिला झोपच लागत नाही."

"धन्य रे बाबा तुझी..." म्हणत मित्र हसायला लागला.

अजून एकदा असेच ते रेल्वेतून प्रवास करीत होते. शेजारच्या गृहस्थाशी त्यांच्या गप्पा सुरू होत्या. बोलता बोलता त्या गृहस्थाने खिशातून लवंगाने भरलेली एक डबी काढली. त्या डबीमधून एक लवंग घेतली आणि डबी परत खिशात ठेवून दिली. मग त्या बाहेर काढलेल्या एका लवंगेचे त्याने दोन तुकडे केले व एक तुकडा बोराड्यांना दिला. बोराड्यांना त्या माणसाच्या चेंगटपणाचा राग आला. कारण डबी पूर्ण लवंगाने भरलेली असूनही त्यातील अर्धी लवंग त्यांना देऊन तो दातृत्व प्रदर्शित करीत होता. पण ते त्याच्यावर रागावले नाहीत. त्यांनी त्या अर्ध्या लवंगेचे पुन्हा दोन तुकडे केले व त्यातील एक लहानसा तुकडा तोंडात टाकून उरलेला परत करीत नम्रतेचा भाव चेहऱ्यावर आणून ते म्हणाले, "घ्या, मला एवढा मोठा तुकडा जरा जास्तच होतोय."




अर्थातच समोरच्या त्या गृहस्थाला काय बोलावे हेच कळेनासे झाले.

त्यांना एवढे मानसन्मान मिळाले, पुरस्कार मिळाले, ते 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'चे अध्यक्ष झाले. पण त्यांच्या ठिकाणी अहंकार कधीच जाणवला नाही. मंडळाची आर्थिक परिस्थिती फारशी बरी नसतानाही त्यांचे विविध उपक्रम राबविणे चालूच आहे. नवलेखकांच्या पुस्तक प्रकाशनाबरोबर 'महाराष्ट्राचे शिल्पकार' यांसारख्या योजना काटकसरीने पण उत्तम तऱ्हेने ते राबवीत आहेत.

कायम वास्तव्यासाठी त्यांनी औरंगाबादसारख्या महानगराची निवड केली. पण त्यांना आपल्या गावशिवाराचा विसर पडलेला नाही. त्यांनी आपल्या घराला यासाठी 'शिवार' हेच नाव दिले. शेती आणि शेतकरी यांविषयी त्यांच्या मनात सतत आस्था आहे. गेल्या काही वर्षांपासून याच आस्थेतून 'शेतकरी साहित्य पुरस्कार' त्यांनी स्वखर्चाने सुरू ठेवला आहे.

त्यांच्या षष्ठ्यब्दीनिमित्त त्यांनी त्यांच्या जीवनातील विविध क्षेत्रांतील आणि विविध गटांतील फ. मु. शिंदे या आपल्या विद्यार्थ्यांपासून यादवराव गायकवाड, डॉ. यू. म. पठाण या गुरुजनांविषयी तसेच शंकर बापू आपेगावकरांसारख्या कलाक्षेत्रातील ज्येष्ठ दिग्गजांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा सत्कार सोहळा घडवून आणला.

कुणी कसाही वागला तरी त्यांना कधी कुणाचा आकस वाटत नाही. किंवा कुणाला आपल्यापेक्षा जास्त मिळाले म्हणून त्यांना त्याचा मत्सर वाटत नाही. जीवनात जे मिळाले त्याबद्दल ते सतत समाधान व्यक्त करतात. जो येईल त्याला, हवा असेल त्याला आधार देणे हीच त्यांची वृत्ती आहे. त्यांचे घर म्हणूनच जसे मुलां-नातवंडांनी सतत भरलेले असते तसेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांनी गजबजलेले असते.

वासुदेव मुलाटे

ग्रामीण समाजमनाची स्पंदनं
संवेदनशीलपणे टिपणारा लेखक

# भास्कर चंदनशिव

एकोणीसशे सत्तरच्या आसपास औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाने अण्णा भाऊ साठे स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या कथा लेखनस्पर्धेत भास्कर चंदनशिव यांची 'मसणवाटा' कथा पहिली आली. सुरुवातीच्या काळात 'अस्मितादर्श' या गंगाधर पानतावणे यांच्या नियतकालिकात त्यांच्या कथा यायला लागल्या. दलित साहित्याच्या प्रांतात भास्कर चंदनशिव यांचे नाव महत्त्वाचे गणले जाऊ लागले. एकोणीसशे ऐंशी साली त्यांचा 'जांभळ ढव्ह' हा कथासंग्रह 'लोकवाङ्मय गृह' या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला. तेव्हा प्रकाशकांनी 'आजच्या व उद्याच्या महाराष्ट्राचा एक समर्थ दलित लेखक' म्हणून त्यांचे स्वागत केले.

दोन हजार दोन सालचा दलित साहित्याच्या क्षेत्रातील महाराष्ट्र फाउण्डेशन विशेष पुरस्कार दत्ता भगत यांना आणि दोन हजार तीन सालचा ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रातील तोच पुरस्कार भास्कर चंदनशिव यांना जाहीर व्हावा हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. दोघे लेखक समकालीन. दोघेही मराठवाड्यातले. दोघांनीही आपल्या साहित्यनिर्मितीतून त्या त्या समाज घटकासंदर्भात आत्मटीकेचा सूर आळविलेला. दोघेही अवतीभवतीच्या समाजमनाचा कानोसा अधिक सजगतेने, संवेदनशीलतेने घेणारे लेखक.

भास्कर चंदनशिव यांची 'जांभळ ढव्ह'मधली कथा मुख्यत: प्रतिमांच्या भाषेत बोलणारी. अत्यंत अल्पाक्षरी. मराठवाड्यात बोलल्या जाणाऱ्या बोली भाषेचे अंगभूत सौंदर्य घेऊनच ती जन्माला आली. त्या कथेने त्यापूर्वी लिहिल्या गेलेल्या 'स्मरणरमणीय' कथेचा धागा तर तोडलाच पण ग्रामीण कथा म्हणजे शहरी अभिजन वाचकवर्गाची अभिरुची लक्षात घेत लिहिल्या जाणाऱ्या 'अस्सल ग्रामीण'पणा पासूनही तिने स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले. पूर्वीच्या ग्रामीण कथा-कादंबऱ्यांतून येणारा खेड्यातील माणूस म्हणजे बहुतेकवेळा इरसाल, बेरकी, रंगेल, लबाड, धूर्त, लफंगा तरी असायचा नाहीतर भोळा, मूर्ख, अडाणी, नालायक, आळशी तरी असायचा. त्यातील शेतकरी तर हमखास खलनायकच असे.




एकोणीसशे साठनंतर खेड्यात जन्मलेली, शिक्षण घेऊन शहरात येऊन स्थानिक झालेली आणि लिहू लागलेली एक पिढी उदयाला आली. त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यासाठी 'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना काही प्रमाणात साहित्याच्या अभ्यासकांनी तर काही प्रमाणात डॉ. आनंद यादव, रा. रं. बोराडे या स्वत: सर्जनशील लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी अस्तित्वात आणली. त्यात पहिली, दुसरी, तिसरी पिढी असे टप्पेही पाडण्यात येऊ लागले. या दुसऱ्या तिसऱ्या पिढीतील लेखक प्रत्यक्ष राबत्या शेतकरी, शेतमजूर कुटुंबांतून आलेले होते. या नव्याने आत्मभान प्राप्त झालेल्या लेखकांना ग्रामीण साहित्याच्या नावाखाली खेड्यातील माणसांची पूर्वसुरींनी केलेली टिंगलटवाळी अस्वस्थ करू लागली. त्या बदलत्या कालखंडातील एक प्रमुख ग्रामीण कथाकार आणि तितकाच समर्थ भाष्यकार म्हणजे भास्कर चंदनशिव. 'ग्रामीण साहित्य' या संकल्पनेला नवे, पक्के वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणारा विचारवंत, अभ्यासक म्हणूनही त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

भास्कर चंदनशिव यांच्या 'जांभळ ढव्ह'मधला खेड्यातला माणूस मग तो 'आबामा', 'आबाजी', 'संतुनाना' कुणी का असेना, अनेक विवंचनांनी ग्रासलेला आहे. ती विवंचना आर्थिक, सामाजिक, शारीरिक विकार-वासनांशी

संबंधित असेल. तो माणूस मुख्यत: अंधारात फाटकं घोंगडं पांघरून बसलेला. तुटक्या ढासळत्या अंधाराच्याच भिंतींचा आधार घेऊन जगणारा आहे.

एकोणीसशे त्र्याऐंशी साली प्रसिद्ध झालेल्या 'मरणकळा' या दुसऱ्या कथासंग्रहातील चंदनशिव यांची कथा प्रतीक आणि प्रतिमांच्या ओझ्यातून बाहेर पडली. ती साधी, सरळ भिडणारी व नव शिक्षितांच्या दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वाचा धांडोळा घेणारी झाली आहे. 'तडा'सारखी कथा केवळ ग्रामीणच नव्हे तर एकूणच मराठी लघुकथेच्या वाचकांना चटका लावणारी ठरेल अशी आहे. चंदनशिव यांच्या कथेतल्या 'काळीज बाजूला करून घरं उसविणारी'; 'फुटक्या टकुऱ्यागत गाडग्याचं टुकडं बाजूला' करणारी; 'कापल्या नाकाभोकात ठासून तिखट भरावं तसं' झालेली; 'पाय भाजल्या कुत्र्यागत कवरच्या कवर' तळमळत ऱ्हायलेली माणसं वाचकांच्या मनामनांत कायमची घर करून बसली.

दरम्यान एकोणीसशे ऐंशीच्या आसपास महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या असंतोषाचा स्फोट झाला. हरितक्रांतीने निर्माण केलेल्या अधिक शेतीउत्पादनामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. उत्पन्न काही वाढेना. याची कोंडी फोडण्यासाठी शरद जोशी यांच्या रूपाने स्वातंत्र्यानंतरच्या बलाढ्य शेतकरी चळवळीचा उदय झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेला दलित मुक्तीचा लढा दलित साहित्याच्या निर्मितीसाठी मुख्य प्रेरणास्रोत ठरला. शतकानुशतकांच्या ठसठसणाऱ्या वेदना शब्दबद्ध झाल्या. नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, बाबुराव बागूल, दया पवार, यशवंत मनोहर यांच्या वाङ्मयनिर्मितीने मराठी वाङ्मयाच्या कक्षा जागतिक पातळीपर्यंत नेऊन भिडविण्याचे ऐतिहासिक कार्य केले. याच पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या 'ग्रामीण साहित्य' निर्मितीच्या प्रेरणांच्या शोधासाठी चाचपणी सुरू झाली. आनंद यादव प्रभृती ग्रामीण साहित्याची संकल्पना मांडण्यासाठी मेहनत घेऊन प्रयत्न करीत होते. कॉ. शरद पाटलांसारख्या संपूर्ण आयुष्य कष्टकरी, आदिवासींसाठी वेचणाऱ्या पंडिताने शेतकरी संघटना आणि शरद जोशी हे शेतकऱ्यांच्या आर्थिक चळवळीचं नेतृत्व करीत आहेत तर ग्रामीण साहित्याची चळवळ आणि डॉ. आनंद यादव हे शेतकऱ्यांच्या सांस्कृतिक चळवळीचं नेतृत्व करीत आहेत अशी मांडणी करून ग्रामीण साहित्य चळवळीच्या अध्वर्यूंवर फार मोठी ऐतिहासिक स्वरूपाची जबाबदारी टाकली. पण ही जबाबदारी पेलण्याचे भान सुटत चालले. विशेषत: यादवांची 'प्रेरणां'च्या बाबतीतील धूसरता आणि धरसोड वृत्ती इतर ग्रामीण साहित्यिकांचा मनोभंग करणारी ठरू लागली. रा. रं. बोराडे यांच्यासारख्या यादवांचे समकालीन आणि ग्रामीण साहित्यनिर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान असणाऱ्या लेखकाने नव्याने सुरू झालेली शेतकरी चळवळ म. जोतीराव फुल्यांनी 'शेतकऱ्याचा असूड'पासून मांडलेली भूमिका या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा ठरू शकतात. तोच विचारव्यूह ग्रामीण वाङ्मय निर्मितीच्या पाठीमागे असू शकतो अशी भूमिका घेतली. पण या सर्व गोष्टी जिकिरीने, जबाबदारीने आणि सर्व सामर्थ्यानिशी सैद्धान्तिक स्वरूपात मांडण्याचे काम 'भूमी आणि भूमिका' या ग्रंथात भास्कर चंदनशिव यांनी केले. म. जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, क्रांतिसिंह नाना पाटील ते शरद जोशी, असा एक वैचारिक अन्वय मांडण्याचे ऐतिहासिक महत्त्वाचे काम चंदनशिव यांनी केले. 'म. जोतीबा फुलेप्रणीत इतिहासाची भौतिक मांडणी






पद्धती डोळ्यांपुढे ठेवून तो तो विषय मी माझ्यापरीने तटस्थ राहून समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. कोणत्याही विषयातील तज्ज्ञपणाचा दावा न सांगता. राबत्या शेतकरी कुटुंबातील अनुभवाची तळमळ मनात आहे एवढेच!' अशा विनम्र भावाने त्यांनी ग्रामीण साहित्यनिर्मितीचं विशिष्ट चरित्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शेतकरी आंदोलन, बहात्तरच्या दुष्काळाने महाराष्ट्राच्या ग्रामीण समाजजीवनात घडवून आणलेली उलथापालथ आणि ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा, यांचा अन्वय लावून तत्त्वज्ञानाचा भक्कम पाया आपल्या सर्जनशील निर्मितीला प्राप्त करून देता देताच भास्कर चंदनशिव यांनी आपल्या स्वतःच्या कथालेखनाचा बाजदेखील बदलून टाकला. १९९० सालात प्रकाशित झालेला त्यांचा 'अंगार माती' हा कथासंग्रह याची साक्ष देतो. या संग्रहातील 'लाल चिखल', 'मेख मारो' या कथांमधून अवती भवतीच्या ग्रामीण जीवनात भरून राहिलेला असंतोष, त्याचं अधूनमधून वणव्यात होणारं रूपांतर आपल्या अंगभूत सामर्थ्यानिशी भास्कर चंदनशिव यांनी मांडलेलं आहे. त्या वेळी शेतकरी समाजात निर्माण झालेला असंतोषाचा वणवा आणि ग्रामीण महाराष्ट्रातील पेटलेली माती उद्याच्या सुंदर स्वप्नांच्या पूर्ततेसाठीच आहे याचं सजग भानही या कथासंग्रहामधून प्रत्ययास येते.




काही टीकाकारांनी 'अंगार माती'मधील कथा ही भास्कर चंदनशिव यांच्या मूळ वाङ्मयीन पिंडापासून दूर गेलेली, काहीशी प्रचारकी वळणाची आहे. हे म्हणजेच वास्तव ग्रामीण समाजदर्शन आहे असं काही प्रमाणात उच्चरवाने सांगणारी आहे असा आक्षेप नोंदविला आहे. 'तडा', 'कळस', 'उमालं', 'आबामा' या चंदनशिव यांच्या मूळ प्रकृतीधर्मानुसार लिहिल्या गेलेल्या कथांपेक्षा 'अंगार माती'मधील कथा निश्चितपणे वेगळी आहे हे खरे असले तरीही अवतीभवतीच्या समाजमनाची स्पंदनं अधिक संवेदनशीलपणे टिपणाऱ्या लेखकाचे ते महत्त्वाचे लक्षण मानले जावे.

'नवी वारुळं' आणि 'बिरडं' हे चंदनशिव यांचे अलीकडील काळात प्रकाशित झालेले कथासंग्रह. 'माती आणि नाती' हा समीक्षा ग्रंथ तर 'रानसय' नावाचा ललित लेखांचा संग्रह.

माणसाच्या वेदनांना दलित आणि ग्रामीण या सीमारेषांनी विभागता येत नाही. तसेच 'दलित'पण आणि 'ग्रामीण'पणदेखील काही फार अभिमानाने मिरविण्याजोग्या गोष्टी नाहीत. संपूर्ण भारतीय समाज हा 'एकमय लोक' व्हावा या ध्यासातून आपला वाङ्मय व्यवहार आणि आचारविचार करणारा, अंतर्बाह्य नितळ आणि पारदर्शक व्यक्तिमत्त्व लाभलेला हा साहित्यिक आजच्या घडीच्या मराठीतील जवळपास सर्वच आघाडीच्या साहित्यिकांचा सर्वांत जवळचा मित्र असण्याचे ऐश्वर्य उपभोगतो आहे.

जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आणि एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या कानाकोपऱ्यांत शेतीक्षेत्रात उगवून येत असलेले नवनवीन प्रयोगांचे लवलवते कोंब कोणती स्वप्नं साकार करणार आहेत याचादेखील वेध भास्कर चंदनशिव यांची कथा घेईल इतका विश्वास अनेकांप्रमाणं मलाही वाटतो. त्यांच्या आगेमागे सहवाटसरू म्हणून वावरताना माझ्यासारख्याच असंख्यांना त्यांचा आधार किती मोलाचा वाटतो हे कसे सांगावे?

डॉ. शेषराव मोहिते

एक अस्सल माणूस

# भास्कर चंदनशिव

भास्कर चंदनशिव आणि मी १९७० पासून एकमेकांच्या बरोबर आहोत. एम.ए. च्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो.
कथा, कविता, समीक्षा इत्यादी लिहीत लिहीत इथपर्यंत वाटचाल झाली. या वाटचालीत कधी कटुता आली नाही.
मतभेदाचे प्रसंग खूप आले. पण कधी दुराव्याची कल्पनाही शिवून गेली नाही. अर्थात त्याचे श्रेय पुष्कळसे भास्कर
चंदनशिव यांच्याकडेच जात असावे असे आता इतक्या दिवसानंतर वाटू लागले आहे. भास्कर चंदनशिव यांनी
खूपच महत्त्वाचे लेखन केले आहे. परंतु त्यांनी त्याचा कधी अहंकार बाळगला नाही. आपल्या लेखनाबद्दल
आपणच बोलायचे असे कधी घडले नाही. साहित्यविश्वात ही मोठी दुर्मिळ गोष्ट आहे. अनेक लेखक भेटले की,
स्वत: कुठे लिहिले, आपल्या साहित्यावर कुठे समीक्षा आली किंवा आली नसल्यास ती येण्याची व्यवस्था कशी
केली यासारख्या गप्पा मारतात. परंतु चंदनशिव यांच्या गप्पांमध्ये हा विषय कधी येत नाही. त्याचे कारण आपण
जेव्हा जवळ येतो, तेव्हा माणूस म्हणून जवळ येतो. माणसाचे विश्व मोठे आहे. त्याचे प्रश्न अनेक आहेत.
भोवतीच्या जगात असंख्य गोष्टी घडत असतात आणि एक संवेदनशील माणूस म्हणून त्यावर चर्चा केली पाहिजे;
बोलले पाहिजे असे त्यांना वाटते. माणसाच्या या मोठ्या विश्वातील साहित्य हा एक भाग आहे. साहित्याची मूळ
भूमी प्रत्यक्ष जीवन आहे. म्हणून जीवनाबद्दल बोलले पाहिजे; समाजाबद्दल बोलले पाहिजे असे भास्कर चंदनशिव
यांना वाटते. महाराष्ट्रातील दुष्काळ, दुष्काळाची मानवनिर्मित कारणे, बाजारपेठांमधून होणारी शेतकऱ्यांची मुस्कटदाबी,
शेतीमालाचे भाव, उद्योगांना मिळणारे मुबलक पाणी आणि खेड्यातील त्याचे दुर्भिक्ष, म. फुले यांचे द्रष्टेपण,
एकोणिसावे शतक आणि त्या शतकातील चळवळी, खेड्यापाड्यांतून आलेला सत्ताधारीवर्ग आणि त्यानेच
केलेली ग्रामीणांची नाडणूक, लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती, ग्रामीण भागात होत जाणारे परिवर्तन, वाढणारा
चंगळवाद आणि मूल्यांची होणारी घसरण त्यातील अर्थकारणाचा सहभाग आणि शेतकरी संघटना व शरद जोशी
हे चंदनशिव यांच्या जिव्हाळ्याचे विषय आहेत. यात आपण लिहिलेले साहित्य आणि आपल्या कौटुंबिक गोष्टी
यांना स्थानच नाही. चुकून एखादा असा विषय निघालाच तर त्यावर रेंगाळणे नाही. त्यांचे काम झाले की पुन्हा
दुसरा विषय. भास्कर चंदनशिव यांनी महाराष्ट्रातील दुष्काळावर खूपच वाचलेले आहे. खूपच विचार केलेला आहे
आणि त्याचे एक कारण त्यांचा लेखक म्हणून असणारा उदय १९७१-७२ च्या दुष्काळातलाच आहे. आज
भास्कर चंदनशिव बीड या जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. साहित्याच्या जगात वावरतात. पण त्यांचे आपल्या
गावाशी म्हणजे कळंब तालुक्यातील
छोट्या गावाशी नाते तुटलेले नाही. गावाकडे
समजून घ्याव्यात; जमेल तेवढी मदत करावी
भास्कर चंदनशिव जिल्ह्याच्या ठिकाणी
असले तरी त्यांना खराखुरा आनंद
असणार!



हसेगाव (जि. उस्मानाबाद) या आपल्या
आवर्जून जावे; तिथल्या अडीअडचणी
अशीच त्यांची वृत्ती आहे. कधी कधी वाटते,
राहत असले, पदव्युत्तर वर्गांना शिकवीत
धूळभरल्या खेड्यांतून वावरतानाच होत

त्यांच्या या वृत्तीमुळेच ते अतिशय वेगाने
गेले. १९७५ च्या आसपास शरद जोशी
शेतकरी नेते शरद जोशी यांच्याकडे ओढले
यांचे नाव भारतभर गाजत होते. शेतीमालाला
योग्य भाव मिळालाच पाहिजे यासाठी ते लढे उभारीत होते. गोरा-गोमटा, शिडशिडीत आणि देखणा नेता अनेकांना
मोहवीत होता. त्यामुळे त्यांच्याभोवती एक निराळेच वलय निर्माण झाले होते. त्यांनी बोलविलेल्या कुठल्याही
मेळाव्याला हजारोंच्या संख्येने लोक जमत होते. चांदवडला त्यांनी महिला मेळावा घेतला आणि महाराष्ट्राच्या
खेड्यापाड्यांतून लाखभर स्त्रिया जमल्या. हे अभूतपूर्व होते. कधी काळी म. फुले यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या
होत्या. विठ्ठल रामजी शिंदे यांनी शेतकरी परिषदा आयोजित केल्या होत्या. पण हा इतिहास फार जुना झाला.
स्वातंत्र्य मिळूनही शेतकऱ्यांचे प्रश्न सुटत नव्हते. आणि शरद जोशी या नावाचा झंझावात घोंगावू लागला. भास्कर
चंदनशिव शरद जोशींकडे आकर्षित झाले तर नवल नव्हते. कारण १९७७ साली 'शेतकऱ्याचा असूड' या म.
फुले यांच्या ग्रंथाला शंभर वर्षे पूर्ण झाली म्हणून शताब्दी महोत्सव आयोजित करून या ग्रंथाची मिरवणूक काढणारे
वैजापुरातील प्राचार्य रा. रं. बोराडे आणि प्रा. भास्कर चंदनशिव हे दोघेच होते. अख्ख्या महाराष्ट्रातील ही एकमेव
घटना होती. असे हे भास्कर चंदनशिव. त्यांना वाटले, आता तरी शरद जोशी यांच्या रूपाने शेतकऱ्यांचे प्रश्न
सुटतील. यामुळेच ते अनेकदा शरद जोशी यांना भेटायला जाऊ लागले. अशा असंख्य भेटी घडल्या. त्यामुळे
कधी कधी या विषयावरही गप्पा होत. शरद जोशी यांच्या प्रतिपादनाबद्दल इतर अनेकांप्रमाणेच मलाही काही शंका
होत्या. उदाहरणार्थ, भूमी ही श्रेष्ठ आहे. तिच्यात एक दाणा पेरला की शंभर दाणे उगवतात असल्या भाषेत ते
बोलत असत. अर्थात यात असत्य काही नाही. परंतु अशी भूमिका घेतली की मानवी श्रमांकडे दुर्लक्ष होते. शंभर
दाणे काय उगीच निर्माण होतात? त्यासाठी राबावे लागते. आणखी एक म्हणजे शेतमजुरांचा प्रश्न हा या चर्चेतील
बिकट प्रश्न. पण त्या प्रश्नाची फारशी चर्चा शरद जोशी यांच्या तेव्हाच्या विवेचनात नसायची. शिवाय असेही
वाटायचे की शरद जोशी यांना खरा रस बागायतदारांमध्ये असावा. (अर्थात पुढे त्यांनी ज्वारी परिषद घेतली हा
भाग वेगळा)... तर अशा माझ्या शंका असायच्या. भास्कर चंदनशिव तर शरद जोशींचे जवळ जवळ भक्त. मी
माझ्या शंका उपस्थित करीत असे आणि चंदनशिव शांतपणे उत्तरे देत असत. अर्थात सध्या ते पुष्कळच वेगळा
विचार करीत असणार असे वाटते. कारण अलीकडेच जागतिकीकरणासंबंधी लिहिताना त्यांनी लिहिले आहे, "आता
येणाऱ्या खुल्या व्यवस्थेच्या काळात सामाजिक आणि सांस्कृतिक न्याय-अन्यायाची मागणी कुणी कुणाजवळ
करायची? हक्काची भाकर कुणी कुणाकडून कशी घ्यायची?... समाज एका दोषास्पद अवस्थेतून दुसऱ्या दोषास्पद
अवस्थेत जात असतो, हे मात्र पटणारे आहे..." (रानसय, पृ. १०७, शब्दालय, २००३). यावर अधिक भाष्य
करण्याची आवश्यकता नाही.

भास्कर चंदनशिव मोठे सोशीक, सहनशील आणि सहिष्णू आहेत. त्यामुळे ते असं अनेकांचं बरंच काही ऐकून
घेतात. पण आपल्या मतांबद्दल ठामही असतात. आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांना साहित्यिक राजकारणात
अजिबात रस नाही. कधी कुणामुळे अशा प्रकरणात ते अडकलेच तर ते तेवढेच निरिच्छही राहू शकतात. मला
वाटते, आपल्या सगळ्या भूमिकांपेक्षा 'माणूस' म्हणून असणारी त्यांची भूमिका त्यांना अधिक महत्त्वाची वाटत
असावी. नव्हे, वाटतेच. आणखी एक याच संदर्भात सांगायला पाहिजे. भास्कर चंदनशिव यांची पहिली कथा अण्णा
भाऊ साठे कथास्पर्धेत महाराष्ट्रात पहिली आली. मिलिंद महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी कथास्पर्धा आयोजित केली
होती. त्यावेळी चंदनशिव बी.ए. ला शिकत होते. या कथेतून दलित जीवनाचे विदारक वास्तव प्रकट झाले आहे.
पुढेही त्यांनी ग्रामीण भागातील दलितांचे जीवन फार उत्कटपणे साकारले आहे. 'अस्मितादर्श'मधून त्यांनी अनेक
कथा लिहिल्या. त्यामुळे भास्कर चंदनशिव दलित लेखक असतील असे अनेकांना वाटत होते आणि आजही वाटते.
त्यांच्याशी बोलताना कधी कधी ते दलित आहेत असं गृहीत धरून काही लोक बोलतात. ते त्यांच्याशी सहजपणे
बोलतात. परंतु ते मराठा आहेत आणि त्यांचे मूळचे आडनाव 'यादव' हे आहे ते कधी कोणाला सांगत नाहीत.
त्याची त्यांना आवश्यकताच वाटत नाही. कारण त्यांच्या दृष्टीने 'माणूस' महत्त्वाचा आणि त्याची वेदना महत्त्वाची.

विसाव्या-एकविसाव्या शतकातील माणूसपणाची पहिली अट जात विसरणे, 'डी-कास्ट' होणे हीच आहे असे मला वाटते. जाणिवांच्या पातळीवर इतका 'डी-कास्ट' झालेला दुसरा लेखक मी पाहिला नाही!
माणूसपण महत्त्वाचे म्हटले की निखळ सुखदुःखाशी समरस होणे हेच महत्त्वाचे ठरते. म्हणूनच यादव असलेला
हा माणूस चंदनशिव घराण्यात दत्तक गेला, परंतु यादवांच्या घरातील भाऊबंदांना तो विसरला नाही. यादवांच्यापेक्षा
चंदनशिवांकडे शेतीवाडी अधिक. या शेतीवाडीचा अहंकार त्याने कधी बाळगला नाही. उलट चंदनशिवाकडील
शेती त्याने आपल्या सख्ख्या आणि सावत्र भावांना वाटून दिली.
ग्रामीण भागातील शिरस्त्याप्रमाणे तरी बी.ए.च्या पहिल्या-दुसऱ्या वर्षाला असतानाच भास्कर चंदनशिव यांचा
विवाह झाला. विवाह झाल्यानंतरही ते शिकतच राहिले. अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. केले. पुढे
मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातून एम.ए.केले. एम.ए.झाल्या झाल्या आष्टी येथील महाविद्यालयात
अध्यापक म्हणून लागले. ते तेथे रूजू झाले तेच मुळी मोठ्या कुटुंबकबिल्यांसह. चुलत भाऊ, पुतणे, आणखी
नात्यातले एक दोघे असे मोठे कुटुंब. त्यांची लहान लहान मुलंही होतीच. खरे म्हणजे चांगली नोकरी लागली
तेव्हा आता राजाराणी सारखे रहावे, पुष्कळ लोक असे राहतातही. परंतु भास्कर चंदनशिव यांना हे जमण्यासारखे
नव्हते. म्हणजे पटत नव्हते. या साऱ्यांना त्यांनी शिकवले आणि मार्गी लावले. या सगळ्यांमध्ये सौ. कमल
चंदनशिव यांचा म्हणजे सौ. वहिनींचा मोठाच वाटा आहे याचीही नोंद करावी लागेल. पुढे एक लेखक म्हणून
चंदनशिवांना लौकिक प्राप्त झाला. तळमळीने बोलणारा वक्ता म्हणून ते नावारूपाला आले. हे असे सगळे होत
असताना वहिनींचे शिक्षण खंडित झाले ते झालेच. मुलाबाळांच्या आणि संसाराच्या धबडग्यात त्यांनी आपल्या
सगळ्या इच्छा आकांक्षा गुंडाळून ठेवल्या. निव्वळ संसारी स्त्री म्हणून त्या वावरत राहिल्या. अशी सहचारिणी
लाभावी हे चंदनशिव यांचे थोर भाग्य!
असा हा निष्ठावान असणारा आणि माणूसपणाच्या सर्व कसोट्यांवर उतरणारा निखळ माणूस. या त्याच्या माणूसपणानेच
सर्व मित्रमंडळींना त्यांनी बांधून ठेवले आहे. साधारण १९७०च्या आसपास मी, भास्कर चंदनशिव, महावीर
जोंधळे, फ. मुं. शिंदे, वासुदेव मुलाटे, सोपान हाळमकर, त्र्यंबक असरडोहकर, दत्ता भगत, अविनाश डोळस,
बाबा भांड, वसंत मा. जाधव असे आम्ही सारे लिहावयास लागलो. सगळ्यांमध्ये ताणतणाव निर्माण झाले. पण
आम्हा सगळ्यांना जोडून ठेवणारा एक बळकट धागा म्हणजे भास्कर चंदनशिव आणि या धाग्याचे सारे बळ
साठलेले आहे ते त्याच्या अस्सल माणूसपणात.
भास्कर चंदनशिवांना शब्दांबरोबर रंग आणि रेषांचेही मोठे वेड आहे. शालेय जीवनात तर त्यांनी मोठा चित्रकार
व्हायचे असे ठरवूनच टाकले होते. चित्रांमध्ये ते खूपच रमले. अगदी एम.ए.ला आले तेव्हाही ते मोठी सुंदर चित्रं
काढत असत. अर्थात या चित्रातले भावविश्व त्यांनी अनुभवलेले ग्रामीण जीवनच असे. परंतु पुढे काय झाले माहीत
नाही. हळूहळू रंग आणि रेषा त्यांच्यापासून दुरावत गेल्या. सगळा भर शब्दांवरच राहिला. शब्दांबरोबर रंग आणि
रेषा यांची त्यांची साधना चालू राहिली असती तर व्यंकटेश माडगूळकर, वसंत आबाजी डहाके, कवी मनमोहन
आणि विठ्ठल वाघ यांच्या मालिकेत त्यांचेही नाव आले असते.





शेतकऱ्यांच्या, ग्रामीणांच्या दुःखाचा आणि खेड्याच्या दुःस्थितीचा तर्कशुद्ध वेध घेणारा हा माणूस आतून फार हळवा तर आहेच; पण स्वप्नाळू आणि ध्येयवादीही आहे. कधी काळी त्याने शाळेमध्ये मुख्याध्यापक होण्याचा ध्यास घेतला होता, नव्हे. त्यासाठी तो अडून बसला होता. एम.ए.झाल्या झाल्या प्राध्यापकी द्यायला काही संस्थाचालक तयार होते. आजच्यासारखी विनाअनुदान संस्कृती तेव्हा नव्हती. रुजू झाल्या महिन्यातच पगार सुरू होत असे. अनेक ठिकाणी बँकांमध्ये जमा होत असे. अशी सगळी अनुकूल परिस्थिती असताना चंदनशिव मात्र मुलाखतीस जावयास तयार नव्हते. त्यांचे म्हणणे शाळेमध्ये काम करणे आणि तेही मुख्याध्यापक म्हणून काम करणे अधिक महत्त्वाचे आणि ग्रामीणांची अधिक गरज भागविणारे. त्यांचा मुद्दा चुकीचा होता असे नाही किंवा खांडेकरांचा आदर्शही त्यांच्यासमोर असावा. कारणे कुठलीही असोत, ते महाविद्यालयात मुलाखतीस जावयास तयारच नव्हते. शेवटी मित्रांनी त्यांना गाडीत कोंबले आणि बळजबरीने प्राध्यापक केले. ही गोष्ट चांगली झाली की वाईट हे आता सांगण्यात काही अर्थ नाही. पण ते महाविद्यालयात रुजू झाले आणि ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांमध्ये नवी जागृती आणण्यासाठी धडपडू लागले. पुढे वैजापूरला प्राध्यापक म्हणून आल्यावर तर त्यांनी केवढी कामे केली. प्राचार्य रा. रं. बोराडे यांच्याबरोबर 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाचा शताब्दी महोत्सव तर त्यांनी केलाच, पण ग्रामीण आत्मकथन शिबिरे भरविली; ग्रामीण लेखक-लेखिकांची शिबिरे भरविली. (त्यासाठी शेकडो महाविद्यालयांचे वार्षिकांक पाहून महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तम कवितांचे संपादन 'गंधखुणा' या नावाने सिद्ध केले.). हे सारे चालू असताना वैजापूर या गावालाच एक सांस्कृतिक चेहरामोहरा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. मोठमोठी कविसंमेलने आयोजित केली... या साऱ्या धडपडीमागे, कष्टामागे ग्रामीण भागाचा कायापालट व्हावा हीच उत्कट इच्छा होती. आज भास्कर चंदनशिवांसारख्या स्वप्नाळू, ध्येयवादी लोकांची संख्या थोडीशी जरी वाढली तरी ग्रामीण भागाचा कायापालट व्हायला वेळ लागणार नाही!

नागनाथ कोत्तापल्ले

# वकिल्या पारधी

लक्ष्मण गायकवाड

लेखक आणि कार्यकर्ता अशा दोन भूमिका एकाच वेळी अपरिहार्यपणे स्वीकारणाऱ्या व्यक्तिमध्ये लक्ष्मण गायकवाड यांचा अंतर्भाव करावा लागतो. गायकवाड हे विमुक्त, भटक्या जमातीच्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी झटणारे कार्यकर्ते आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या 'विमुक्त भटके संघर्ष महासंघा'चे ते व्यवस्थापक-अध्यक्ष म्हणून काम करतात. १९७८ पासून गायकवाड परिवर्तनाच्या चळवळीत सक्रिय आहेत. विशेषत: विस्थापित आणि अभावग्रस्त समाजासाठी त्यांनी चळवळ उभारली आहे. फुले-आंबेडकरांच्या विचारधारेशी बांधिलकी मानणारे गायकवाड 'उचल्या' या आत्मकथनामुळे प्रकाशझोतात आले. 'उचल्या' या आत्मकथनाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. हे आत्मकथन अनेक भारतीय आणि परदेशी भाषांत अनुवादित झाले. त्यामुळे त्यांना देशभर प्रसिद्धी मिळाली. प्रसिद्धीच्या झोतात येऊनही गायकवाडांनी आपले आत्मभान जागृत ठेवले आणि आजही ते सामाजिक चळवळीत क्रियाशील आहेत. 'उचल्या'नंतर त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. 'वडारवेदना', 'दुभंग' या कादंबऱ्या, 'चिनी मातीतील दिवस' हे प्रवासवर्णन आणि 'साहित्य, समाज आणि संस्कृती' हा वैचारिक लेखसंग्रह त्यांच्या नावावर आहे.




'वकिल्या पारधी' ही लक्ष्मण गायकवाड यांची लक्षवेधी कादंबरी आहे. ही कादंबरी त्यांनी अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात आणि मालतीबाई बेडेकर यांना अर्पण केली आहे. वरील तिन्ही लेखकांनी भटक्या-विमुक्तांचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे. त्यांच्यामुळे मराठीत प्रथमच हे जीवनदर्शन साकार झाले. या योगदानाची विशेष नोंद गायकवाड यांनी लिहिलेल्या अर्पणपत्रिकेत दिसते.

'वकिल्या पारधी' या कादंबरीलेखनाचा हेतू गायकवाड यांनी मनोगतात नमूद केला आहे. ''मी गेल्या २५ वर्षांपासून ज्या समाजामध्ये अहोरात्र समाजसुधारणेसाठी काम करत आलो आहे, त्या पारधी समाजाच्या जीवघेण्या वेदना, हालअपेष्टा आणि स्वातंत्र्यानंतर न पुसला गेलेला गुन्हेगारीचा कलंक घेऊन पशुतुल्य जीवन जगणाऱ्या ह्या समाजाचं चित्र साहित्याच्या माध्यमातून मी मांडलंच पाहिजे, असं सातत्यानं वाटत होतं.'' 'वकिल्या पारधी' या कादंबरीची अर्पणपत्रिका आणि लेखकाने नमूद केलेला हेतू वाचल्यावर कादंबरीचा विषय काय असू शकेल, याची थोडी कल्पना वाचकाला येऊ शकते.

स्वातंत्र्यपूर्व कालखंड ते स्वातंत्र्यानंतरचे अर्धशतक एवढा मोठा कालावधी या कादंबरीत चित्रित झाला आहे. तीन पिढ्यांचे जीवनचित्रण यात आले आहे. मूळचे आदिवासी असलेल्या पारध्यांच्या आयुष्यक्रमात काळाच्या रेट्यामुळे आणि प्रस्थापितांच्या आक्रमणामुळे कसे कसे बदल होत गेले, हे या कादंबरीत नोंदवले गेले आहे. आदिवासी पारध्यांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले म्हणून त्यांना जंगलातून विस्थापित करण्यात आले. नंतर गावकुसाबाहेर राहूनही त्यांना वंचित ठेवण्यात आले. गावगाड्यामध्ये त्यांच्या अस्तित्वाची दखल घेतली गेली नाही. उपऱ्यासारखे जिणे त्यांच्या वाट्याला आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्या जीवनाची नोंद घेतली जाईल, असे त्यांना वाटले मात्र लोकशाहीव्यवस्थेतील लोकप्रतिनिधींनी आणि नोकरशाहीने त्यांचे शोषण केले. स्वार्थासाठी समाजातील सर्वच घटकांनी या पारध्यांचा गैरफायदा घेतला. अंगभूत शौर्यगुणांमुळे हे वारंवार आपल्याविरोधी बंड करतील म्हणून इंग्रजांनी त्यांना जन्मजात गुन्हेगार ठरवले आणि सेटलमेंटमध्ये कोंडले. स्वातंत्र्यानंतर पाच वर्षांनी त्यांना सेटलमेंटमधून मुक्त करण्यात आले. 'जन्मजात गुन्हेगार' या कायद्यापासून त्यांची सुटका करण्यात आली. एका अर्थाने ते विशेष मुक्त म्हणजे 'विमुक्त' ठरले. मात्र त्यांच्या जीवनात कोणताही बदल झाला नाही. स्वतंत्र भारतात त्यांना नागरिकत्व मिळाले नाही. कसण्यासाठी जमीन मिळाली नाही आणि व्यवसायासाठी कोणतीही अनुकूलता लाभू दिली गेली नाही. कोल्हे, उंदीर, हरिण, ससे, रेडे, मासे, खेकडे अशा प्राण्यांच्या आधारे उपजीविका करीत असताना कायम वंचित राहिल्यामुळे पोट भरण्यासाठी त्यांना भाकरीची चोरी करावी लागली. लहान-मोठ्या चोऱ्या केल्याशिवाय पोट भरता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण केली गेली. चोर समजून गुरासारखे बडवण्यात आले; ठणकणाऱ्या शरीरावर मिठाचे गरम पाणी टाकण्यात आले; उघड्या अंगाने उलटे टांगण्यात येऊन अंगावर मिरचीचे पाणी टाकले गेले; अनन्वित अत्याचार करण्यात आले. चोरीसाठी उद्युक्त करणारा समाज अंतिमत: दोषी असूनही पारध्यांच्या माथ्यावर चोर म्हणून शिक्का मारण्यात आला. पशूहूनही वाईट जीवन त्यांच्यावर लादण्यात आले.

बिरडीस ही या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा. कादंबरीच्या पूर्वार्धातील निम्म्याहूनही अधिक भाग बिरडीसने व्यापलेला आहे. उत्तरार्धात बिरडीसचा मुलगा रानपळ्या हा कुटुंबाचा म्होरक्या झालेला दिसतो. शेवटी रानपळ्याचा मुलगा वकिल्या पारधी वाचकाला भेटतो. बिरडीसने इंग्रजांशी संघर्ष केल्यामुळे त्याला जंगल सोडावे लागले. गावाशेजारी राहूनही त्याला गावाने स्वीकारले नाही. वेगवेगळ्या गुन्ह्यात पोलिसांनी त्याला अडकवले आणि त्याच्यावर अमानुष अत्याचार केले. पोलिसांनी अपंग केल्यामुळे आणि उतारवयाला लागल्यामुळे रानपळ्याने कुटुंबकबिला चालविला. प्रसंगी राजकारणी लोकांनी या बापबेट्यांच्या शौर्याचा वापर विरोधकांना नामोहरम करण्यासाठी केला. हेच बापबेटे जीवनात स्थिर होऊन बऱ्यापैकी जीवन जगू लागले तेव्हा भयचकित झालेल्या राजकारण्यांनी त्यांचा बळी घेतला. पारध्यांच्या हलाखीची आणि अत्याचाराची मन पिळवटून टाकणारी ही कहाणी अंतर्मुख करणारी आहे.

बिरडीस, लगमण्या, तीरमाऱ्या, रानपळ्या, बंदुक्या, तारक्या, रानमळ्या, रहिमान्या, पिस्तुल्या, काडतुस्या, मानकाप्या, वाघआवळ्या, गेंड्या अशी पुरुष-व्यक्तिरेखांची नावे या कादंबरीत दिसतात, तर जळण, हरणी, गवत, बकरी इत्यादी स्त्री-व्यक्तिरेखांची नावे वाचायला मिळतात. या व्यक्तिरेखांच्या नावाला विशेष संदर्भ आहेत. ते त्यांच्या जीवनातील अनुभवाशी आणि जीवनशैलीशी निगडित आहेत. जंगलातील आदिम स्वरूपाचे जीवन आणि इंग्रजांशी संघर्ष झाल्यानंतर आलेल्या अनुभवाचा प्रभाव या नावावर दिसतो. त्यातून एक सामाजिक आणि सांस्कृतिक अर्थ ध्वनित होतो. भारतीय समाजजीवनातील पारधी लोकांचा स्तरदेखील त्यातून सूचित होतो.

गुन्हेगार म्हणून जगण्यासाठी बाध्य करणारा भोवतालचा समाज आपल्याला कधीही समजून घेणार नाही, आपण या देशाचे नागरिक नाही; आपल्याला शेती करण्याचा अधिकार नाही; आपणास कष्ट करून पोट भरण्याची मुभा नाही, अशी भावना स्वातंत्र्योत्तर कालखंडात पारध्यांच्या मनात निर्माण झाली. मनात पूर्वग्रह ठेवून त्यांना या व्यवस्थेने बहिष्कृत केले.



पोलीस, तुरुंग, बेदम मारहाण, कोर्ट-कचेरी, शिक्षा, मानहानी या वरवंट्याखाली पारधी भरडून निघाले. यापुढील आपली पिढी अत्याचाराची बळी ठरू नये असे वाटून रानपळ्याने आपल्या तान्ह्या मुलाचे नाव 'वकिल्या' ठेवले. कोर्टात काळा कोट घातलेला वकील काळ्याचे पांढरे आणि पांढऱ्याचे काळे करतो, हे पाहिल्यामुळे त्याच्या मनात हा विचार चमकून गेला. आपल्या पूर्वापार पिढ्यांना वकिल्या न्याय मिळवून देईल आणि भविष्यकालीन पिढ्यांना दिशा देईल, म्हणून मुलाला वकील केलेच पाहिजे, असे त्याने ठरवले. पुढे राजकारण्यांनी चिथावून दिल्यामुळे गावकरी पारधी वस्तीवर हल्ला करून ती उद्ध्वस्त करतात. बिरडीस, रानपळ्या मारले जातात. रानपळ्याची पत्नी बकरी अंधाराचा फायदा घेऊन वकिल्या आणि जेलवंती या पोरांना घेऊन निसटते. टक्केटोणपे खात मुंबईत येऊन पोचते. भीक मागून, कष्ट करून जगण्याची लढाई लढताना तिच्या आशा पल्लवित होतात. एका फादरच्या मदतीने वकिल्याचे शिक्षण सुरू होते. पुढे वकिल्या पारधी न राहता वकील गोन्साल्वीस होतो.

'वकिल्या पारधी' या कादंबरीने काही सामाजिक प्रश्नांकडे अंगुलीनिर्देश केला आहे. समाजधुरीण, समाजशास्त्रज्ञ, धर्मव्यवस्था, लोकशाही राज्यव्यवस्था यांना जाब विचारणारे आणि विचारप्रवृत्त करणारे हे प्रश्न आहेत. या प्रश्नांमुळे केवळ विचारसन्मुख होऊन चालणार नाही, तर समाजाला कृतिप्रवणही व्हावे लागेल. समग्र समाजाचा विधायक विकास व्हायचा असेल तर या व्यवस्थेतील शेवटच्या माणसाला न्याय मिळवून द्यावा लागेल. स्वातंत्र्य याचा नेमका अर्थ कोणता आणि सर्व मूल्यांमध्ये मानवी मूल्येच कशी श्रेष्ठ आहेत, याचा सांगोपांग विचार करावा लागेल. स्वातंत्र्यानंतर पन्नास-पंचावन्न वर्षं उलटून गेल्यानंतरही भारतातील फार मोठा मानवी समूह गुहाजीवन जगतो आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, श्रमप्रतिष्ठा आणि जातिभेदविरहित समाजरचना हे फक्त व्याख्यानांचे विषय नाहीत, तर देशपातळीवरील कृतिकार्यक्रमाचे विषय आहेत, हे समजून घ्यावे लागेल.

'वकिल्या पारधी' कादंबरीत महाराष्ट्रातील काही गावांचा उल्लेख येतो. उस्मानाबाद, ढोकी, जालना, कळंब ही मराठवाड्यातील गावे या कादंबरीत भेटतात. या गावांमधून पारधी समाज वर्षानुवर्षं वास्तव्य करून आहे. लक्ष्मण गायकवाड हे कार्यकर्ते मूळचे मराठवाड्यातील असल्यामुळे या गावसंदर्भांना विशेष अर्थ आणि अधिकृतता लाभली आहे. लेखकाचा जीवनानुभव त्यातून प्रकट झाला आहे. कादंबरीतील नाना पाटील, बाजीराव देशमुख, पतंगराव पाटील ही राजकारणी मंडळी महाराष्ट्रातील कोणत्याही गावाची लोकप्रतिनिधी वाटावी, इतकी इरसाल आणि बनेल आहेत. फौजदार घाटगेपाटील किंवा फौजदार पवार हे पोलीसखात्यात पदोपदी भेटणाऱ्या भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी आहेत. स्वातंत्र्यानंतर राजकारण्यांनी आणि नोकरशाहीने देशाचे वाटोळे करून समाजजीवन कसे नासवले आहे, याचे विदारक चित्र या कादंबरीत पाहावयास मिळते. समाजाचा देखणा चेहरा अपुरा आहे, उर्वरित चेहरा कुरूप आहे आणि तो तसा का आहे, त्याची कारणमीमांसा करावी लागेल, याची जाणीव या कादंबरीत अधोरेखित झाली आहे.

वकील गोन्साल्वीस हे नाव ख्रिश्चन असल्यामुळे 'हिंदू एकता मंच'च्या कार्यकर्त्यांना हे बळजबरीच्या धर्मांतराचे प्रकरण असावे असे वाटते. त्यांची धार्मिक अस्मिता उफाळून येते. बकरी राहत असलेल्या झोपडपट्टीवर मोर्चा येतो. वकिल्याला ख्रिश्चन शाळेतून काढण्याची आणि हिंदू धर्माच्या रिवाजाप्रमाणे वागण्याची समज मोर्चा देऊ लागताच चवताळलेल्या नागिणीसारख्या बकरीने मोर्च्याची घेतलेली झाडाझडती कोणत्याही विचारी माणसाला खाली मान घालायला लावणारी आहे. "चोर-गुन्हेगार म्हणून जगावं लागल्यामुळे, मारझोड आणि अत्याचाराला बळी पडल्यावर तुमच्या धर्माने साधी चौकशी केली नाही. आमच्या घराची राखरांगोळी करून टाकणाऱ्या तुमच्या धर्मानं आम्हाला काय दिलं?" हा बकरीचा प्रश्न निरुत्तर करणारा आहे. आपली धर्मसंस्कृती केवळ गर्वाच्या बाता करणार असेल आणि '... की जय हो' अशा वल्गना करीत असेल तर अभावग्रस्तांनी या धर्माचे कशासाठी आश्रित व्हावे? हा प्रश्न ही कादंबरी उपस्थित करते. आपल्या मुलाच्या नावापुढे पारधी हा शब्द राहिला तर त्याला बापासारखं आणि आजोबासारखं हाल हाल करून मारलं जाईल, या भीतीमुळे बकरीने फादरला वकिल्याचे नाव बदलण्यासाठी सांगितले होते. "त्याच्या नावापुढं काहीपण लिहा पण माझ्या पोराला शाळा शिकवून मोठं करा," असे म्हटल्यामुळे फादरने तिची परवानगी घेऊन आपले गोन्साल्वीस हे आडनाव वकिल्याच्या नावापुढे लावले होते. 'वकिल गोन्साल्वीस'ची ही पार्श्वभूमी 'हिंदू एकता मंच'च्या कार्यकर्त्यांना जाणून घ्यावीशी वाटली नाही.

कादंबरीचे मुखपृष्ठ अर्थपूर्ण आहे. जमिनीत आपली मुळे आणि पारंब्या भक्कम रुजवून एक वटवृक्ष उभा आहे. माळरानावरील दगडगोट्यांच्या साथीत उभा असलेला हा वृक्ष येथील भूमी, पाणी आणि हवामानाशी नाते सांगणारा आहे. इतरत्र कुठूनही कलम आणून वाढवलेले हे झाड नव्हे. इथल्या मातीशी इमान राखणारे आणि येथील मूळ निवासी असलेले आदिवासी, दलित हे या वटवृक्षाप्रमाणे आहेत. वटवृक्षाची कत्तल म्हणजे पर्यावरणाची हानी आहे. त्यामुळे असमतोल निर्माण होऊ शकेल आणि हा असमतोल सामाजिक-सांस्कृतिक ऱ्हासाला कारणीभूत ठरेल. ह्या ऱ्हासाची किंमत प्रत्येकाला चुकवावी लागणार आहे. तशी वेळ येऊ नये यासाठी वेळीच सावध झालेले बरे.



डॉ. मनोहर जाधव

# जीवनायन

यशवंत मनोहर

'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही; सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे' या कवितेने आणि ही कविता ज्या संग्रहात आहे त्या 'उत्थानगुंफा' (१९७७) या आपल्या पहिल्याच कवितासंग्रहाने यशवंत मनोहर यांनी सत्तरीच्या दशकातील मराठी कवितेवर आपली नाममुद्रा उठवली. त्या संग्रहातील, आक्रमक गद्यात्म मुक्त शैलीतील, कवितांतून विद्रोहाची प्रखर जाणीव व्यक्त झाली होती. 'जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन । येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन' अशा ओळींनी सुरू होणारा 'निषेधनामा'; 'जन्माने केलेली फसवणूक' सांगणारी 'फसवणूक' ही कविता; 'ज्यांच्या गावात सूर्य नाही त्यांच्या हातात उजेड देतो' असा आश्वासक भाव व्यक्त करणारी 'माणसांसाठी आरती'; 'मी इथल्या दिशांच्या सूडबुद्धीची थुंकी । तिरस्कृत । आणि त्यांच्या लाडक्या परंपरांचा निषिद्ध भ्रमनिरास' या शब्दांनी सुरू होणारी आणि समग्र सांस्कृतिक-सामाजिक व्यवस्था नाकारणारी 'मी इथल्या दिशांच्या' ही कविता-या सर्वच कवितांतून पिळवटलेला, आक्रोश करणारा, संतप्त, क्षोभ आणि क्रोध व्यक्त करणारा, गहिरा आणि व्याकूळ स्वर ऐकू येत राहतो. विद्रोहाच्याच या भिन्न भिन्न मुद्रा आहेत आणि त्या बाह्यतः गद्यसदृश, पण अंतर्गत लय असलेल्या ओळीओळींतून व्यक्त झाल्या आहेत. संपूर्णपणे नागर भाषेचा अवलंब करून यशवंत मनोहरांनी दलितांच्या, पीडितांच्या, शोषितांच्या, बहिष्कृतांच्या यातनांची अत्यंत प्रभावी अभिव्यक्ती केलेली आहे. भावना आणि विचार यांच्यातली तदात्मता, निश्चित विचारप्रणालीचे भक्कम अधिष्ठान आणि शब्दांना हवे तसे वळवण्याचे, वाकवण्याचे सामर्थ्य यांच्यामुळे त्यांची कविता नवकाव्योत्तर कवितेत महत्त्वाची ठरली.

नंतरच्या काळात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य', 'मूर्तिभंजन' हे कवितासंग्रह आणि 'स्वाद आणि चिकित्सा', 'दलित साहित्य', 'साहित्य आणि बांधिलकी', 'बाळ सीताराम मर्ढेकर' इत्यादी समीक्षात्मक लेखन यशवंत मनोहरांनी केलेले आहे आणि आज एक प्रतिभावंत कवी व चिकित्सक समीक्षक म्हणून ते ओळखले जातात. यशवंत मनोहर हे मराठीतील नवकाव्योत्तर कवितेतील निःसंशय महत्त्वाचे कवी आहेत हे त्यांच्या 'जीवनायन' (२००१) या संग्रहातील कवितांनी सिद्ध केलेले आहे.

१९७० पासूनच्या तीन दशकांमध्ये प्रदेश, राष्ट्र आणि जग या तिन्ही पातळ्यांवर अनेक बदल होत गेले. सत्तरमधल्या विविध चळवळींमधला जोम ओसरत गेला. राजकीय क्षेत्रात निरंतर अशाश्वती निर्माण झाली; आर्थिक क्षेत्रात काही भागात अत्यंत समृद्धी आणि काही भागात अभावग्रस्तता आली; शहरी भागात कामगारांची कपात आणि ग्रामीण भागात रोजगारांचा अभाव अशी स्थिती निर्माण झाली; स्वदेशातील लहान लहान उद्योगधंदे बंद पाडणारे जागतिकीकरण आले; मोठ्या आकारमानाच्या अर्थिक गुन्हेगारीचा प्रत्यय येत गेला; सामाजिक क्षेत्रात परिवर्तनाला जेवढा वेग यायला हवा होता तो आला नाही; सर्वच पातळ्यांवर हिंसाचार, युद्धोन्माद यांचे थैमान सुरू झाले; धर्म आणि जात यांच्या आधारे माणसांमध्ये विद्वेष निर्माण करण्याच्या प्रयत्नांना बळकटी आली. या बदलत्या काळाचा संदर्भ 'जीवनायन'मधल्या कवितांना आहे.




'पायाखाली सुरुंग आणि माथ्यावर आगीचा ढग ओथंबून आहे; जपून रे, माझ्या फिनिक्स पक्ष्यांनो, खूपदा इथे आपला वध झाला आहे'



या ओळींमध्ये या बदलत्या काळाची सूचना आहे, 'माणसाची जात'या कवितेमध्ये याच बदलत्या काळातील अमानुष बदलांविषयी कवीने चिंता व्यक्त केली आहे. पुढील ओळी पाहा :

'सुनसान झाले आहे, माणसे दिसत नाहीत;
कासावीस प्राणांसारखा वर्तमान भोवती.
शिरच्छेद केलेले सर्वत्र तडफडते प्रहर;
माणुसकीचे उगम कापीत फिरताहेत नंग्या करवती.'

याच कवितेत शेवटी म्हटले आहे : 'आठवणींचा विषय होत आहे इथे माणसांची जात'. कासावीस प्राणांसारख्या वर्तमानाची छाया या संग्रहातील अनेक कवितांवर पडलेली आहे. 'हे गाव ' या कवितेत कवीने म्हटले आहे : 'हे गाव मरणाने आता दत्तक घेतले आहे.' माणूस हद्‌पार झाला आहे, 'मारलेली माणसेही आपल्या मरणाची देत नाहीत ग्वाही' अशी इथली स्थिती आहे. 'महाअस्ताची नांदी' या कवितेत कवीने म्हटले आहे :

'मला गिळत आहे भोवतीच्या महाअस्ताची नांदी
याही चक्रीवादळात कोणाचे हलत नाही पान आणि फांदी'

आणि



'अमानुषतेच्या जयजयकारातील बीभत्स गर्दी पाहिली
की मला माणसांच्या वंशाचीच चिंता वाटते '

किंवा

'गटारातील सांडविचाराने माणुसकीच रोगी होते,
अध:पाताने उन्मादून येतात शतकांची शेते'

किंवा

'मी पाहतो आहे धडांची विनाशामागे धावण्याची हिंस्त्र स्पर्धा
या अपरंपार मलम्यात माणुसकीचा गहिवर हाती लागत नाही'

काळाने असे घेरून टाकलेले असले, सर्वत्र अशी विपरीत स्थिती असली, कवी या मुलुखात जागजागी नरक, नरकाची झाडे, त्यांची फळे पाहात असला, इथल्या विचारांत आणि आचारांत नरक दिसत असला, तरी, कवी म्हणतो 'माझ्या मनात आहे सुगंध आणि हातांत कवितांची वही'. माणसांचे जगणे सुंदर असले पाहिजे हे त्याचे स्वप्न आहे. हे जगणे सुंदर करायचे तर त्यासाठी आपल्यातल्या दुबळेपणाची कबर बांधली पाहिजे, अन्यायाविरुद्ध सर्वस्व पणाला लावून लढले पाहिजे. अन्यायाविरुद्धच्या लढ्यात आपण विजयी होऊ याची खात्री कवीला आहे.

'आम्हीच होऊ विजयी; आमच्या पाठीवर शुद्ध उजेडाचा हात;
वाकवतो आहे युगाची कमान मुठीतील आमच्या तप्त झंझावात'.

आपल्याभोवतीचा पिंजरा कापता येईल, पण त्यासाठी आपण करवती झाले पाहिजे; युगाचा शिल्पकार नकाराच्या उरात क्रांतिगुंफा खोदतो आहे, सर्वच दु:खांनी या अग्निसोहळ्यात छिन्न्या-हातोडे झाले पाहिजे. 'जीवनायन'मधल्या



कवितांतून असा आश्वासक, प्रोत्साहक स्वर व्यक्त झाला आहे. उदाहरणार्थ, या काही ओळी पाहा :
'आपण जरा सरळ होऊ, वाटा पुढे सरळच आहेत;
अंधाराशी फारकत घेऊ आपण, वाटा उजेडाच्या आहेत'
'जागतील स्मशाने; उजेडाची रसद तिथे नीट नेली पाहिजे;
चूल विझली नाही अजून, वस्तीने धीर धरला पाहिजे'
'प्रिय बंधो रे! ही नदी आटली नाही,
पचवून मृत्यू, ही देत उद्याची ग्वाही.'

'माणूसच आहे अंतिम सत्य आणि सौंदर्यही' यावर कवीचा विश्वास असल्यामुळे 'हा पहाडच पायाखाली वीट होतो', 'आघातांच्या झडीतही भीती वाटत नाही.' कवीने नश्वरतेच्या विरुद्ध युद्ध म्हणून झाड लावले आहे. मृत्यूने ग्रासलेल्या या काळात सर्जनशीलतेचे झाडच माणसांना, मनुष्यपणाला टिकवून ठेवू शकते. मृत्यूप्रेरणेविरुद्ध जीवनप्रेरणा काम करू लागली की विद्रोहाला नवी पालवी फुटते; पुन्हा अग्निपक्ष्यांचा निर्णायक थवा फुलू लागतो. त्यामुळे 'नको वांझ हळहळ, व्हावे हातच सर्जन; भांडताना मरणाशी जन्म घेतसे जीवन' असे कवी म्हणतो.

आपली कविता 'असुंदराशी निर्वाणीचे युद्ध'मांडणारी आहे असा कवीला विश्वास आहे. ती कुरूपतेचे उगम जाळायला आली आहे; मोडलेले युग उभे करायला आलेली आहे. माणसांमधल्या सर्जनशीलतेवर यशवंत मनोहरांचा विश्वास आहे आणि ही सर्जनशीलताच माणसाला माणसाचे रूप देईल यावरही कवीचा विश्वास आहे. 'जीवनायन'मधल्या विविध कवितांतून हा विश्वास व्यक्त झाला आहे.

यशवंत मनोहरांच्या कवितेचा पिंड वैचारिक कवितेचा आहे. 'जीवनायन'मध्ये कवीच्या 'विचारा'ने छंदात्म अभिव्यक्तीची रीती वापरली आहे. त्यामुळे विचार-सुंदर कवितेचा रूपबंध तिला लाभला आहे. 'जीवनायन'मधले प्रतिमाविश्वही अनोखे आहे. 'कासावीस प्राणांसारखा वर्तमान', 'शिरच्छेद केलेले प्रहर', 'बलात्काराची कुलुपे', 'नकाराचे ऊर', 'प्रश्नोत्तरांच्या पायघड्या', आंधळ्या दिव्यांची बेबंदशाही, 'करपलेल्या श्वासांचा डोंगर', इत्यादी. या संग्रहातील कवितेचेच हे वेगळेपण आहे असे नसून यशवंत मनोहरांच्या एकंदर कवितेच्या वेगळेपणाने नवकाव्योत्तर मराठी कविता समृद्ध केलेली आहे.

वसंत आबाजी डहाके

# येरवडा विद्यापीठातील दिवस

डॉ. कुमार सप्तर्षी

१९६० नंतरचा काळ महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात नवजागरणाचा काळ होता. या काळात पुरोगामी चळवळी देशाच्या निरनिराळ्या भागांत व निरनिराळ्या क्षेत्रांत मूळ धरू लागल्या होत्या. विद्यार्थी व नवशिक्षित तरुणवर्गात एक प्रकारचे वैचारिक भारलेपण होते; भोवतालच्या जगात क्रांती घडवून आणण्याची आकांक्षा होती. उच्च पदवीधर तरुणदेखील भरपूर पैसा, सुखसोयी देऊ करणाऱ्या नोकऱ्या सोडून निरनिराळ्या चळवळी, आंदोलने, रचनात्मक उपक्रम यांत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. समाजपरिवर्तनाच्या या प्रक्रियेची तीव्रता वाढत जाऊन तिचा एक प्रवाह पुढे ऐंशीच्या दशकात जयप्रकाश नारायण यांच्या इंदिरा गांधीविरोधी, राष्ट्रीय पातळीवरील प्रस्थापितांविरोधी आंदोलनात सहयोगी बनला.

या चळवळीतून महाराष्ट्रात जे कार्यकर्ते, नेते, विचारवंत पुढे आले त्यांपैकी डॉ. कुमार सप्तर्षी हे ठळक नाव. हे नाव प्रामुख्याने 'युवक क्रांती दला'शी (युक्रांद) जोडले गेले आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पुरोगामी विचार रुजवणारी व अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास प्रेरणा देणारी ही चळवळ सत्तरीचे दशक संपता संपता सुरू झाली. सुमारे दहा वर्षे या चळवळीने महाराष्ट्राच्या सामाजिक-राजकीय वर्तुळात खळबळ माजवली. यात विचार व कृती यांच्या अंगाने, डॉ. कुमार सप्तर्षी यांचा महत्त्वाचा वाटा होता.

युक्रांद आंदोलने व चळवळी लढण्यासाठी डॉ. सप्तर्षी यांनी सत्याग्रहाचा मार्ग निवडला. सत्याग्रहाचे हत्यार मुळात महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांच्या परकीय राजवटीविरुद्ध लढण्यासाठी निर्माण केले होते. शांततापूर्ण मोर्चे, निदर्शने, प्रतिकार न करता स्वतःला अटक करवून घेणे, उपोषणाद्वारे प्रतिपक्षाचे मन वळवणे आणि हे सर्व करताना प्रतिपक्षाबद्दल आपल्या चित्तवृत्ती शुद्ध ठेवणे — ही गांधीप्रणीत सत्याग्रहाची महत्त्वाची लक्षणे. पण गांधीजींनी परकीयांविरुद्ध वापरलेले हे शस्त्र सप्तर्षी यांना स्वकीयांविरुद्धच वापरायचे होते.




शिवाय ते तारुण्याचा जोष अंगी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गळी उतरवायचे होते आणि तेही, जिथे हिंसक भावना व असहिष्णुता दिवसेंदिवस वाढतच आहे, अशा सामाजिक परिस्थितीत.

या सत्याग्रहाचा महत्त्वाचा भाग होता, स्वतःला अटक करवून घेणे आणि अटक झाल्यानंतर न्यायालयाने फर्मावलेली शिक्षा, कोणताही दंड न भरता, माफी न मागता—निर्भयतेने भोगणे. यामुळे १९६८ पासून सप्तर्षी यांना वारंवार तुरुंगाची यात्रा घडली. राजबंदी म्हणून तुरुंगवास भोगताना तुरुंगातील जीवनाचे जे 'विश्वरूपदर्शन' सप्तर्षींसारख्या संवेदनशील, चिंतनशील, ठाम वैचारिक बैठक असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला घडले, त्यातूनच 'येरवडा विद्यापीठातील दिवस' या आत्मकथनात्मक पुस्तकाचा जन्म झाला. १९६८ साली झालेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या संपात पुण्याच्या समाजवादी नेत्यांच्या बरोबरीने कुमार सप्तर्षीदेखील सहभागी झाले. त्यात सर्वांसह त्यांना अटक होऊन त्यांची रवानगी दोन महिन्यांसाठी येरवडा कारागृहात झाली. येथून त्यांचा कारावासातील रहिवास सुरू झाला. येरवडा कारागृहाचा विस्तार मोठा आणि त्याच्या इतिहासालाही स्वातंत्र्य आंदोलनाची दैदिप्यमान किनार लाभलेली! त्यामुळे युक्रांदच्या वर्तुळात तुरुंगाला 'येरवडा विद्यापीठ' हे सांकेतिक नाव पडले. अशा विविध ठिकाणच्या तुरुंगवासातून आलेले या पुस्तकातील अनुभव वाचताना सप्तर्षी यांनी म्हटल्याप्रमाणे, इतर कोणत्याही औपचारिक शिक्षण देणाऱ्या विद्यापीठात येरवडा विद्यापीठासारखे शिक्षण देण्याची, संस्कार करण्याची कुवत नाही, याची प्रचिती येते.

'येरवडा विद्यापीठातील दिवस' या पुस्तकाचे स्वरूप आत्मकथनात्मक असल्याने साहजिकच कुमार सप्तर्षी यांच्या एकूण कार्यकर्ता, नेता, आंदोलक म्हणून कारकिर्दीचा आलेख त्यात नोंदला गेला आहे. पण त्याचबरोबर साठोत्तरी महाराष्ट्रातील युक्रांदसारख्या एक महत्त्वाच्या ठरलेल्या विद्यार्थी चळवळीच्या आंदोलनाचाही

हा इतिहास आहे. १९६८ ते १९७९ या काळात युक्रांद चळवळ ऐन भरात होती. एका बाजूला राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या 'उजव्या' संघटना समाजात हातपाय पसरत होत्या; जनसंघ भ्रष्टाचारी काँग्रेसशी टक्कर घेऊन जनतेत सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करीत होत्या. दुसरीकडे काँग्रेसची सरंजामदारी संस्कृती उच्चवर्णीय-उच्चवर्गीयांचेच हितसंबंध जोपासण्यात मशगूल होती. लोहिया-जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने समाजवादी पक्ष या दोन प्रवाहांविरुद्ध लढत असला तरी या पक्षातील नेत्यांच्या काही अंगभूत मर्यादांमुळे समाजमनावर पुरेसा प्रभाव टाकण्यात तो, निदान महाराष्ट्रात तरी, काहीसा अपयशी ठरत होता. अशा परिस्थितीत युक्रांदने समाजवाद्यांचीच विचारसरणी गांधीप्रणीत कोंदणात बसवून विद्यार्थिजगात, तरुणांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न सुरू केला. आणीबाणीपूर्वीच्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्रातील विद्यार्थिवर्गाला योग्य दिशा देण्याचे काम युक्रांदला बऱ्यापैकी साधल्याचे या पुस्तकावरून दिसते. अहिंसक मार्गाने आंदोलने करून, काहींनी तुरुंगवास पत्करून राहुरी, सोलापूर, मालेगाव, पुणे, धुळे इत्यादी शहरांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी युक्रांदच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्या तर पदरात पाडून घेतल्याच; पण त्याचबरोबर नैतिक मूल्यांच्या व पुरोगामी विचारांच्या प्रेरणादेखील हा तरुणवर्ग स्वत:मध्ये बाणवू शकला. ही वस्तुस्थिती लक्षात घेता आजच्या तरुणवर्गात युक्रांदसारख्या प्रभावी पुरोगामी संघटनेची उणीव प्रकर्षाने भासते.

वरील सर्व आंदोलनांमध्ये राजकीयदृष्ट्या धोकादायक ठरू शकणाऱ्या कुमार सप्तर्षी यांच्यावर सरकारने 'मिसा' कायद्याचा प्रयोग केला व हद्दपारी, प्रवेशबंदी, स्थानबद्धता अशी बंधने त्यांच्यावर लादली. शंकराचार्यांशी जाहीर वादविवाद केल्याने व धर्मांधतेविरुद्ध गावोगावी व्याख्याने दिल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना इत्यादी जातीयवादी, धर्मांध संघटनांशी त्यांना दोन हात करावे लागले. या साऱ्या संघर्षांतून तावूनसुलाखून निघणाऱ्या सप्तर्षी यांचा लोकशाही-स्वातंत्र्य-समतावादी, धर्मनिरपेक्ष, वर्गजातिभेदविरोधी असा जीवनमार्ग कसा विकसित होत गेला व त्याचे समाजात काय पडसाद उमटले, याचे चित्रण या आत्मकथनात करण्यात आले आहे. युक्रांदच्या इतर कार्यकर्त्यांनीही 'येरवडा विद्यापीठा'चे 'पदवीधर' बनावे; प्रत्येक तरुणाने आयुष्यात एकदा तरी सत्याग्रह करावा; कारण सत्याग्रह हा सामुदायिक पुरुषार्थ आहे. त्यामुळे तारुण्याला झळाळी येते. येरवडा विद्यापीठात जीवनाचे खरे दर्शन घडते; जगण्याला सार्थकता प्राप्त होते. अशा भूमिकेतून कुमार सप्तर्षी व इतर युक्रांदियांनी तरुण विद्यार्थ्यांमध्ये सातत्याने प्रचार केल्याने अनेक तरुण या मार्गाकडे आकर्षिले गेले. त्यामुळे युक्रांदचे सत्याग्रही आंदोलनदेखील कसे वाढत गेले व त्याचा अवतीभवती काय परिणाम झाला याचा इतिहास 'येरवडा विद्यापीठातील दिवस'मधून मांडला गेला आहे.

राजबंदी म्हणून तुरुंगात वावरताना तिथे असणाऱ्या इतर गुन्हेगार कैद्यांचे एक वेगळेच विश्व सप्तर्षी यांना अनुभवायला मिळाले. त्यांच्यासारख्या पांढरपेशेपणाच्या मर्यादा ओलांडून चळवळीत टक्केटोपणे खाणाऱ्या कार्यकर्त्यालादेखील हलवून सोडणारे, अस्वस्थ करणारे हे विश्व जीवनाचे अनेक अकल्पित व अगम्य रंग दाखवते. व्यंकप्पा पत्कीसारख्या मित्राचा व्रतस्थ साधेपणा, अरुण लिमयेसारख्या उमद्या कार्यकर्त्याच्या आयुष्याची झालेली परवड, माया नावाच्या कुत्रीच्या 'पझेसिव्ह' प्रेमाचा तुरुंगात आलेला विलक्षण व्याकूळ करणारा अनुभव — या व्यक्तिगत पातळीवरील अनुभवांबरोबरच भोवतालच्या गुन्हेगार कैद्यांच्या अनेक कथा-व्यथा, फाशीच्या शिक्षेच्या रूपाने साक्षात मृत्यूच्या दारात उभे असणारे कैदी, हातून चुकून घडलेल्या गुन्ह्याबद्दल जन्मठेप भोगत असताना तुरुंगाच्या त्या दगडी भिंतीआड पंधरा-पंधरा वर्षे रोज पश्चात्तापाच्या आगीत होरपळून निघणारे कैदी; तर काही तुरुंगालाच घर मानणारे, उत्सव साजरे करणारे, प्रसंगी हिंस्र बनणारे कैदी — जीवनाच्या इतक्या परस्परविरुद्ध छटा साक्षात अनुभवण्याची संधी सप्तर्षींच्या या पुस्तकामुळे वाचकांनाही मिळते व तुरुंगाचे 'विद्यापीठ' असे त्यांनी केलेले नामकरण सार्थ ठरते. अर्थात, केवळ सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या एका कार्यकर्त्याचा जीवनपट किंवा त्याच्या संघटनेचा इतिहास एवढ्याच मर्यादेत हे आत्मकथन अडकून पडत नाही, तर १९६०नंतरच्या दहा-वीस वर्षांतील महाराष्ट्राचे सामाजिक-राजकीय दृष्टिकोणातून रेखाटलेले चित्रही या पुस्तकातून सामोरे येते. खरे तर हा अगदी नजीकच्या काळातला इतिहास आहे. पण आज सर्वच आघाड्यांवर, विशेषत: राजकारण व समाजकारण या क्षेत्रांत



महाराष्ट्रीयांचे जे सार्वत्रिक अध:पतन सुरू झाले आहे, त्याची बीजे संयुक्त महाराष्ट्र स्थापनेनंतरच्या नजीकच्या या काळात दडलेली होती हे सप्तर्षी यांनी दाखवून दिले आहे. १९६०नंतर महाराष्ट्रात आधुनिक मूल्यं व पुरोगामी विचारधारेवर आधारित अनेक चळवळी जन्माला आल्या व वाढल्या. आणीबाणीचा दोन वर्षांचा काळ हा या चळवळींना गोठवून टाकणारा काळ होता. पण आणीबाणी संपल्यानंतर मात्र सारे चित्र झपाट्याने बदलले. युक्रांदसारख्या संघटना फुटल्या, संपल्या. समाजक्रांती करण्याचे ध्येय उराशी बाळगून खेड्यापाड्यांत, आदिवासी भागांत, कामगार-मजुरांत गेलेले उच्चशिक्षित बुद्धिमान तरुण निराशेच्या वावटळीत सापडून परतले व निरनिराळ्या तडजोडी करत चाकोरीबद्ध मार्गाचे वारकरी झाले. आजवर पुरोगामी विचारांच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रात जातीयता व धर्मांधता वाढीस लागली. आज आपण आंदोलने व चळवळी फसताना पाहतो. प्रगतिशील विचार निष्प्रभ ठरताना पाहतो. 'नाही रे' वर्गाशी बांधिलकी आता कोणत्याच पक्षाला, संघटनेला परवडेनाशी झालेली दिसते. हे सर्व का झाले, कसे झाले याची उत्तरे 'येरवडा विद्यापीठातील दिवस' या पुस्तकातून निदान काही प्रमाणात तरी मिळतात. आणीबाणीपूर्वकालीन मराठी समाजात वाहणाऱ्या पुरोगामी चळवळीच्या वाऱ्याचे रम्य व जोमदार चित्र या पुस्तकात रेखाटलेले असले, तरी या रम्य चित्रांच्या पोटातच भावी स्खलनशील समाजाची व त्यातील राजकारणाची बीजे नांदतानाही जाणवत राहतात.

या पुस्तकात, धर्मनिरपेक्षतेच्या बाता मारणारा काँग्रेस पक्ष धार्मिक प्रश्नांच्या बाबतीत उच्चवर्णीयांची तळी उचलून धरताना दिसतो. आजचे शरद पवार, बाळ ठाकरे यांच्यासारखे प्रस्थापित नेते त्या काळात नुकतेच राजकारणात स्थिरावू लागलेले दिसतात. त्या वेळी त्यांनी उचललेली पावले, घेतलेले निर्णय भविष्यातील त्यांच्या



स्खलनशील वाटचालीची दिशा सूचित करतात. त्यांचे या पुस्तकातून दिसणारे वर्तन अभ्यासले तर आणीबाणीनंतरच्या काळात राजकारणाच्या नैतिकतेचा कणा लगेचच का मोडला याचे उत्तर मिळते. तसेच पोलीस आणि प्रशासन या व्यवस्थांची आज इतकी दुर्दशा का झाली हेही कळते.

आणीबाणीच्या काळात डाव्या-उजव्या सर्वच विरोधी पक्षांमधील नेत्यांना दीड-दोन वर्षांसाठी राजबंदी बनवून येरवडा कारागृहात डांबण्यात आले. त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बाळासाहेब देवरसांपासून समाजवादी ग. प्र. प्रधानांपर्यंत अनेक नेत्यांसमवेत कुमार सप्तर्षी यांचाही समावेश होता. परस्परविरोधी विचारसरणीच्या या नेत्यांना एकत्रितपणे आणि जवळून पाहण्याची, अनुभवण्याची संधी सप्तर्षी व त्यांच्या युक्रांदीय सहकाऱ्यांना मिळाली. या आत्मकथनाद्वारे हा दुर्लभ अनुभव वाचकालाही देण्याचे सत्कार्य सप्तर्षी यांनी केले आहे. तत्कालीन समाजवादी व हिंदुत्ववादी पक्षांचे नेते, त्यांचे सामर्थ्य व मर्यादा, त्यांच्यातील अहंकार यांनीच भविष्यातील भारतीय राजकारणाची दिशा निश्चित झाली, याचे प्रत्यंतर आज हे आत्मकथन वाचताना येते. 'उद्या'ला सामोरे जाण्यापूर्वी नजीकच्या या 'काल'चा इतिहास अशा पद्धतीने लिहिला व वाचला जाणे आवश्यकच आहे.

कुमार सप्तर्षी यांनी रेखाटलेले साठोत्तर महाराष्ट्रातील समाजस्थितीचे हे चित्र अंतिम व समग्र नक्कीच नाही. सप्तर्षी यांच्याप्रमाणेच इतरांच्याही दृष्टिकोणातून या काळाचा इतिहास लिहिला जाणे आवश्यक आहे. 'येरवडा विद्यापीठातील दिवस'द्वारे या कार्याला प्रारंभ झाला आहे असे म्हणता येईल. कुमार सप्तर्षी यांच्यासारख्या, कार्यकर्ता, नेता व विचारवंत म्हणून डोळसपणे चौफेर कार्यरत असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने हा इतिहास लिहिल्यामुळे या पुस्तकाचे मोल निश्चितच वाढले आहे.

नितिन रिंढे

# राहीच्या स्वप्नांचा उलगडा

भारत सासणे

'स्वप्नं सत्यात उतरतात, पण ती उतरवावीही लागतात' या सूत्राभोवती 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' या कादंबरीतील पात्रजीवन, घटनाप्रसंग आदी घटक गुंफलेले असले तरी तिचा कलात्म विस्तार इतर अनेक सहसंदर्भांनी होत राहिलेला दिसतो. प्रस्तुत कादंबरीत राही, बाळासाहेब, त्यांची पत्नी, आजी, डॉक्टर, लेले, महांकाळेश्वर, नथ्थूराम, गोसावी आदी पात्रे असून राहीचे वडील भाऊसाहेब आणि तिची आई या मृत पात्रांचा उल्लेख सतत येत राहतो. 'राही' हे मुख्य स्त्री-पात्र असून या पात्राचा विशिष्ट शोधप्रवास येथे साकारला आहे. त्यामुळे 'राही'ची शोधयात्रा हे या कादंबरीतील मुख्य कथानक असून इतर पात्रांचे अनेक जीवनसंदर्भ येथे उपकथानके म्हणून साकारले आहेत. 'राही' या मुख्य पात्राचा जो शोध चालू आहे त्या शोधाचा आरंभबिंदू जसा तिच्या जन्मात आहे, तसाच तो तिच्या आईवडिलांनी घेतलेल्या एका विशिष्ट निर्णयात आहे. तो तिच्या वडिलांच्या वतनदारी उक्तिकृतीत आहे. तिच्या या शोधयात्रेला तिचे व्यक्तिगत जीवन, व्यक्तिगत विचारसरणी आणि जीवनशैली यांचे निकटतम संदर्भ लाभले आहेत, तसेच या शोधाला समष्टीच्या विचारसरणीचेही दृढ संदर्भ आहेत. तिच्या शोधाची प्रक्रिया आतून बाहेर आणि बाहेरून आत अशी चक्राकार असलेली दिसते. तिला पडणारी निरनिराळी स्वप्ने हा तिचा आंतरिक प्रवास आहे, तर तिच्या वडिलांनी वर्णसंकराचा अवलंब करणे, घराण्याच्या आणि ट्रस्टच्या जमिनींचा गैरव्यवहार केला असा त्यांच्यावर आरोप असणे, हा आरोप त्यांना मान्य नसणे आणि मरेपर्यंत त्यांनी या आरोपाचा सल आपल्या मनात ठेवणे या साऱ्या गोष्टी तिच्या शोधप्रवासातील बाह्य संदर्भ आहेत असे म्हणता येते. हे संदर्भ ती केव्हाच टाळू शकत नाही कारण मुलगी या नात्याने आईवडिलांच्या 'त्या' कृतींचे निनाद तिच्या सर्व जीवन-अस्तित्वाला लपेटलेले आहेत. सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीने पाहता वडिलांवरील आरोप आणि त्यांचे दुःख-सल तिला अपमानित आणि करुणामय होण्यास भाग पाडत आहेत. या सर्व जाणिवा तिला दुःख देत आहेत. हे नकोसे दुःख वर्तमान जीवनात सतत वागविता येत नाही म्हणून ती ते, असंज्ञ मनात जाणीवपूर्वक ढकलून टाकते आहे. पण ते सारे उसळी घेऊन तिच्या वर्तमानातच स्वप्नस्वरूपात प्रकटते आहे. ती स्वप्ने तिचा वर्तमान झाकोळून टाकत आहेत. स्वप्न-प्रक्रियेत व्यक्तीच्या आंतरिक व भावनिक विश्वाचा जसा दृढ संबंध असतो तसाच संबंध बाह्य विश्वाशीही असतो. खरे तर स्वप्ननिर्मितीचा चेतक बाह्य जगातच असतो. स्वाभाविकच राहीला पडणारी स्वप्ने, त्या स्वप्नांनुसार तिने आरंभिलेला शोध आणि कन्याकर्तव्य म्हणून आरंभिलेला शोध या दोन शोध-प्रक्रिया एकमेकांशी बेमालूमपणे सरमिसळून जाताना दिसतात. बाह्य विश्वाचा व्यक्तीच्या आंतरविश्वावर असलेला प्रभावच येथे राहीच्या शोधप्रवासातील गुंतागुंत स्पष्टपणे साकार करतो. राहीच्या पित्याने हलक्या जातीतील मुलीशी लग्न करणे ही त्यांच्या जीवनातील परिवर्तनवादी कृती आहे, (त्यामागे परिवर्तनाचा हेतू नसला तरीही) तर त्यांच्यावरील आरोप म्हणजे त्यांच्या ठायीच्या नैतिकतेला गेलेला छेद आहे. कदाचित त्यांनी केलेल्या वर्णसंकरासाठी त्यांच्या कुटुंबाने आणि समाजाने त्यांना दिलेली ती एक प्रकारची शिक्षा आहे. विशिष्ट मूल्यसंकेतांनी युक्त समाजरचनेत त्यांनी अशी शिक्षा भोगणे जणू भागच आहे. पण त्या शिक्षेच्या परिणामांची कक्षा त्यांच्या अपत्यापर्यंत विस्तारताना दिसते. राहीचे ठरलेले लग्न मोडणे हा त्याचा एक दृश्य आणि गंभीर परिणाम आहे.






त्याचबरोबर काही विशिष्ट स्वप्नांनी राहीच्या भावविश्वाला वेढून असणे हा तिच्या व्यक्तित्वावरील अदृश्य परिणाम
आहे.
या परिणामांतून मुक्तता मिळविण्यासाठी राहीला वाड्याकडे परतावे लागले आहे असे दिसते. तिच्या वडिलांचा
जीवनप्रवास ज्या वाड्यातून सुरू झाला त्या वाड्यातच तिला हव्या असलेल्या विशिष्ट मुक्तीचा मार्ग आहे. वडील
अपराधी नव्हते हे सिद्ध होण्यातच तिला मुक्तीचा एक मार्ग लाभणार असलेला दिसतो. म्हणूनच राहीच्या विविध
स्वप्नांना, तिच्या वेळोवेळीच्या उक्तिकृतींना आणि तिच्या साऱ्या शोधाला दुहेरी अर्थ प्राप्त होऊ लागतो. उदाहरणार्थ,
राही आपण एका अरुंद चिंचोळ्या वाटेने एका पोकळीत जात आहोत असा अनुभव स्वप्नात घेते. तिच्या स्वप्नांतील
या पोकळीचा विचार करता 'वाडा' हे स्थळ गर्भाशयाचे आणि शोषणाचे प्रतीक होऊन त्यातून तसाच दुहेरी अर्थ
प्रकटू लागतो.
गर्भाशय जसे काळोखाने व्याप्त असते तसेच हा 'वाडा'ही काळोखाने भारलेला/व्यापलेला आहे. निवेदकाला
वाड्यातील 'काळोख' केवळ वाच्यार्थाने अभिप्रेत नाही. त्याला वाडा, वाड्यातील माणसे त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती असे
संदर्भ चिकटलेले आहेत.
राही स्वप्नात ज्या पोकळीत उतरून पित्याच्या निरपराधित्वाचा शोध घेते त्या शोधालाही अशा रीतीने दुहेरी पातळीवर
घेऊन येताना आढळते. वाच्यार्थाने पाहता राहीच्या वडिलांचे निरपराधीपण त्यांची हिशोबाची वही सापडली की
सिद्ध होणार असते. त्यामुळे तिचे वडील मरणोत्तर का होईना पण दोषमुक्त होणार असतात. त्यामुळे ही दोषमुक्ती
त्यांना त्यांच्या मुलीने अपत्यकर्तव्याला अनुसरून प्राप्त करून द्यायची आहे. राही या कर्तव्यभावनेनेही झपाटलेली
आहे. पण तरीही हा सारा शोध केवळ त्याचसाठी नाही. आपल्या स्वप्नांचे अर्थनिर्णयन करणे आणि त्या स्वप्ननिर्मितीमागील
'तळा'चा वेध घेणे, त्याचा तपास लावणे हेही संदर्भ त्या शोधामागे आहेत. यासाठीही तिची अखंड धडपड सुरू
आहे.
प्रस्तुत कादंबरीत राही वाड्यातील तळघरात उतरणार आहे. तिला त्या तळघरात वहीचा शोध जसा घ्यायचा आहे,
तसा गोसाव्याच्या गुरूने लिहिलेल्या यावनी भाषेतील ग्रंथाचाही शोध घ्यायचा आहे. म्हणजे पित्याच्या निरपराधीपणाचा
शोध घेता घेता स्वतःचा आणि इतरांचाही शोध घ्यायचा अशी प्रक्रिया राहीच्या शोधात महत्त्वाची ठरते. माणूस
अनेकदा एकटेपणाचा अनुभव घेत असला तरी तो समूहनिष्ठ/सामूहिक प्राणी आहे असेच मानले गेले आहे. त्याची
ही सामूहिकता राहीच्या शोध-प्रक्रियेत ठळकपणे व कलापूर्णतेने समोर येते.
आपण तळघरात उतरत आहोत आणि आपल्याबरोबर आपल्याला अपरिचित असे आणखी दोघेजण त्या तळघरात
उतरत आहेत, अशीही दृश्यमालिका राही स्वप्नात पाहते. निवेदकाने कादंबरीच्या आरंभीच म्हटल्याप्रमाणे स्वप्नं
सत्यात उतरवावी लागतात, इथे 'उतरवावी लागतात' या शब्दप्रयोगातच जाणीवपूर्वक एखादी कृती करणे असा
अर्थ लपलेला आहे. स्वप्नांना प्रत्यक्षात अनुभवायचे तर प्रत्यक्ष वास्तवात स्वप्नसदृश वातावरणनिर्मिती आणि
स्वप्नसदृश मानसिक स्थिती निर्माण करायला हवी. डॉक्टर व लेले या दोन पात्रांच्या मदतीने राही स्वप्नसदृश अनुभव
घेऊ पाहते. कादंबरीतील 'वाडा' हे स्थळ मुळातच अंधारगर्भ आहे. त्याची रचना आणि वाड्यातील इतर निर्जीव,
सजीव घटक हे या अंधारगर्भाला पूरक आणि साहाय्यक ठरतील असेच आहेत. जसे, डॉक्टर आणि लेले ही दोन
पात्रे आपले 'स्वत्व', पूर्ण अस्तित्वच हरवून बसले आहेत. त्यांचे जगणे हे मुखवट्यांचे जगणे आहे. स्वाभाविकच
हे दोघे राहीच्या स्वप्नातील 'त्या' दोन अपरिचित व्यक्तींची भूमिका मुखवटा लावून धारण करतात. राहीच्या मूळ
स्वप्नातील 'ते' दोघे म्हणजे जणू भूमिका धारण केलेले राहीचे संज्ञ-असंज्ञ मनःस्तरच आहेत. राही 'ईड'चा शोध
घेते म्हणजेच तिचे हे दोन मनःस्तर 'ईड'चा शोध घेत आहेत. या शोधात राही एक 'जिवंत' आणि 'स्वत्व'पूर्ण
व्यक्ती ठरत आहे. 'जिवंत' आणि 'स्वत्व'पूर्ण व्यक्तीच जीवनातील 'गाभ्या'चा शोध घेत असतात, उरलेली जगतात

एवढेच, असा अर्थ राहीच्या व्यक्तिमत्त्वातून प्रकट होऊ लागतो. या प्रसंगातील पात्रांच्या कृती व वातावरण यातुशक्तीने भारलेले असावे अशा प्रकारे त्याचे निवेदन येते. निवेदक राहीच्या स्वप्नांची आणि स्वप्नसदृश दृश्यांची मांडणी करून मानवी व्यक्तिमत्त्वातील जटिलता, गुंतागुंत कलात्मरीत्या साकार करताना दिसतो. तसेच तो वर म्हटल्याप्रमाणे रहस्यमय वातावरणनिर्मिती करून वाचकांच्या ठायीची उत्सुकता आणि भय वाढवीत राहतो. वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगांमध्ये वाचकांना विशेष भावनांसह गुंतवून टाकणे, हे अशा प्रसंगांच्या निवेदनशैलीचे एक वैशिष्ट्य असलेले दिसते. 'राहीच्या स्वप्नांच्या उलगडा', या कादंबरीत स्वप्न आणि स्वप्नसदृश स्थिती यांच्या कलापूर्ण खेळाचे निवेदन येते. तसेच डॉक्टर, लेले, बाळासाहेब, महांकाळेश्वर यांनी सादर केलेल्या नाटुकल्यांचे आणि अभिरूप न्यायालयाच्या 'खेळा'चे सादरीकरण येते. साहित्यकृतीतील घटनाप्रसंगांची निर्मिती आणि अर्थगर्भता ही लेखकाच्या संज्ञ-असंज्ञ मनाशी अर्थपूर्ण नातेसंबंध राखत असते, असे म्हटले जाते, कादंबरीतील अशा प्रसंगांमधील कथन हे सर्जनशील निवेदकाच्या 'संज्ञ' मनाचा निर्देश करते. तर 'नाटुकल्या', 'अभिरूप न्यायालय' हे सारे प्रसंग त्याच्या असंज्ञ मनाकडे बोट दाखवितात असे म्हणावेसे वाटते. कारण अशा प्रसंगांतूनच बाळासाहेब, लेले, डॉक्टर, राही आदी पात्रांच्या मनातील खळबळ आणि खऱ्या भावना यांचे प्रतिरूप दर्शन निवेदकाने घडविले आहे.

उदाहरणार्थ, वाडा-संस्कृतीने व्याप्त माणसांकडून राहीला आणि पर्यायाने तिच्या पित्याला मरणोत्तरही न्याय मिळणार नसतो याचे सूचन अभिरूप न्यायालयाच्या प्रसंगातून होते. या प्रसंगात भिंतीवर लटकवलेले रानगव्याचे मस्तक न्यायाधीशाची भूमिका वठवते. इथे निर्जीव पात्र बोलू लागते. तेव्हा रानगव्याचे निर्जीव असणे प्रतीकात्मक होते. राहीला न्याय न मिळण्याशी या निर्जीवपणाचा म्हणजेच संवेदनशून्यतेचा संदर्भ स्पष्ट होत राहतो. तर भद्रपुरुष, सर्प आणि काळ या पात्रांच्या अभिनयातून साकारणाऱ्या प्रसंगांतून मानवी जीवनात अटळ असलेल्या 'मृत्यू'ची अनाकलनीयता प्रकट केली जाते. मृत्यूचे प्रकट चिंतन आजी हे स्त्री-पात्र करताना दिसते. तसेच सैतान आणि गॅब्रिएल (पृ. ७५) यांच्या नाट्यपूर्ण संवादप्रसंगी सैतानाची भूमिका करणारे डॉक्टर हे पात्र सैतानाच्या 'भूमिके'तून बाहेर येऊन वास्तवातील डॉक्टर या पात्राचे दुःख, वेदना बोलू लागते, तेव्हा वास्तव आणि निर्मिती यांमधील सीमारेषा कधी किती सहज उल्लंघनीय असतात, असे एक वेगळेच भान वाचकांना आणून दिले जाते. वरील वेगवेगळ्या अर्थपूर्ण प्रसंगांमध्ये निवेदक प्रतीकांची वैशिष्ट्यपूर्ण गुंफण करून राहीच्या शोधयात्रेला अर्थपूर्णता प्राप्त करून देतो. कादंबरीच्या अशा प्रकारच्या रचनाबंधामुळे रचनाबंध संकेतांचे उल्लंघन होते आणि त्यामुळे या प्रकारच्या वेगळ्या व नव्या रचनाबंधाची निर्मिती होताना दिसते.

या कादंबरीतील पात्रांचा विचार करता काही बाबी सूत्ररूपाने मांडता येतील. या कादंबरीत पुरुष-पात्रांची संख्या स्त्री-पात्रांच्या संख्येहून अधिक आहे. असे असले तरी ही पात्रे जडशीळ आणि बरीचशी विचारशून्य पद्धतीने जगणारी आहेत. ज्या प्रकारच्या व्यवस्थेने आणि ज्या प्रकारच्या संस्कारांनी त्यांना घडविले आहे, त्याच संस्कारांनी त्यांना जडशीळ बनविले आहे. त्यातून सुटण्याचा, नवे काही करण्याचा विचार त्यांच्या मनात डोकावत नाही. ती प्राप्त परिस्थितीला कोणतेही प्रश्न न विचारता तिचा स्वीकार करताना दिसतात. याबाबतीत राहीचे वडील, डॉक्टर आणि गोसावी या पात्रांचा काही अंशी अपवाद करायला हवा. राहीचे वडील कुटुंबास आणि समाजास अमान्य अशी कृती करतात तर डॉक्टर हे पात्र निर्मितीशील आहे. कादंबरीगत नाटुकल्यांची निर्मिती या पात्राने केलेली आहे. तसेच त्यांच्या सादरीकरणासाठी आवश्यक अभाषिक चिन्हांचेही भान त्यांनी त्या प्रसंगी राखलेले आहे. डॉक्टर हे पात्र सर्जनशील आहे, म्हणूनच वतनदारांच्या बंदिस्त चौकटींमध्ये आणि त्यांच्या लहरींमध्ये त्याचा जीव घुसमटतो. हे घुसमटणे त्यांच्या सैतान, गॅब्रिएल आणि काळ यांच्या संवादांतून साकारलेले जाणवते. गोसावी आपल्यापरीने एका वेगळ्या शोधासाठी झपाटलेला दिसतो. त्याचे झपाटलेपण इतके प्रखर आहे की त्याला पुन:पुन्हा गर्भवासही मान्य आहे. हाती घेतलेल्या कार्यातील अखंडितता एखाद्या व्यक्तीला किती मूल्यगर्भ वाटू शकते हे निवेदक येथे दाखवून देऊ पाहतो. बाळासाहेब हे पात्र घराण्याला कुलदीपक हवा, नाही तर स्वर्गप्राप्ती होणार नाही, यांसारख्या जुनाट बुरसटलेल्या कल्पनांमध्ये पार बुडून गेले आहे व त्यासाठी त्याने उतारवयात पत्नीवर पुन्हा एकदा तिच्या इच्छेविरुद्ध गरोदरपण लादले आहे. त्यासाठी हे पात्र आपल्या पत्नीच्या रोषास, तिरस्कारासही तोंड देते इतकेच नाही तर आपल्या कृतीचे समर्थन करीत राहते. या पात्राच्या व्यक्तित्वात जमीनदारी, वतनदारी पूर्ण भिनली आहे. ते त्या व्यवस्थेचे शारीर-मानसिक पातळीवर गुलाम झालेले आहे. विशिष्ट जातीची कबुतरे पाळणे, त्यातही त्यांचा जंगली कबुतरांशी संकर होऊ न देणे, त्यासाठी दक्ष असणे यांसारख्या गोष्टींना ते महत्त्व देताना दिसते.

भाऊसाहेबांनी वर्णसंकर करणे आणि त्यांच्या भावाने (बाळासाहेबांनी) कबुतरांमध्येही वर्णसंकर होऊ नये यासाठी दक्ष असणे, यातला परस्परविरोध बाळासाहेब या पात्रावर गतानुगतिक मूल्यव्यवस्थेचा असलेला प्रभावच स्पष्ट करीत आहे. निवेदक या प्रकारची पात्ररचना करून जमीनदारी व्यवस्था व त्या व्यवस्थेने घडविलेले आणि त्या व्यवस्थेने नाडलेले असे जग वाचकांच्या प्रत्ययाचा विषय बनविताना आढळतो.

वर म्हटल्याप्रमाणे या कादंबरीतील पुरुष-पात्रे जडशीळतेचा अनुभव देणारी पात्रे आहेत, याउलट स्त्री-पात्रे जडशीळतेला बद्धतेला कधी ठाम तर कधी क्षीण नकार देणारी आहेत. ती अधिक उन्नतावस्थेला स्वीकारू पाहणारी आहेत. राही हे पात्र सभोवतालच्या दृश्य-अदृश्य समष्टीचा व्यवस्थेच्या 'तळा'चा शोध एका स्त्रीने करण्यासाठी मुलीने झटणे हेच एक स्त्री-पात्र वतनदारी कुटुंबव्यवस्थेत नाडलेल्या संबंध राखते. इतकेच नाही तर तिच्या तिच्याच मदतीने गेली अनेक वर्षे बंद प्रयत्नपूर्वक उघडते. राहीच्या या पहिल्यांदाच स्पष्ट दर्शन घडते. एका दुसऱ्या पात्रातील सुप्तावस्थेतील देते. खरे तर या कादंबरीत प्रत्येक स्त्री-



तर स्वत:चा आतून-बाहेरून आणि शोध घेऊ पाहते. मनाच्या 'तळा'चा आणि घेणे, पित्याचे निरपराधीपण सिद्ध पात्र म्हणून तिचे वेगळेपण आहे. राही हे आपल्या काकीशी मैत्रभावाने, स्नेहभावाने ठायी आत्मविश्वास निर्माण करते आणि असलेला वाड्याचा मागील बाजूचा दरवाजा कृतीमुळेच काकीला नव्या जगाचे पात्राची संवेदनशीलता आणि 'स्वत्व'पूर्णता संवेदनशीलतेला, 'सत्वा'ला जाग आणून पात्र दुसऱ्याला काही देताना दिसते. वेगळेच भान आणून देते; राही आजीला उदाहरणार्थ, आजी राहीला स्त्रीविषयक स्त्री-चळवळीतील नव्या घडामोडींची जाणीव करून देते. तसेच ती काकीला जाग आणते. राही मातेच्या गर्भावस्थेत ज्या दरवाजाने वाड्याची 'चौकट' ओलांडून गेलेली असते, त्याच दरवाजाने ती जाणीवपूर्वक जाण्याचा निर्णय घेते, त्या वेळी काकी तिचा हा हट्ट पुरविते, हे इथे मुद्दाम सांगायला हवे. वाड्याचा बंद दरवाजा म्हणजे वाड्यातील स्त्री-स्वातंत्र्याचा संकोच असा अर्थ घेतला तर हा दरवाजा उघडण्याचे, म्हणजे आपले स्वातंत्र्य मिळविण्याचे कार्य स्त्रीला आपणहून स्वतंत्रपणे आपल्या हाती घ्यायला हवे. 'स्वातंत्र्य' मग ते कसलेही असो ते इतर कुणीही आपल्या ओंजळीत आणून टाकणार नाही, याची जाणीव निवेदक अशा प्रसंगातून करून देऊ पाहतो.

पारंपरिक विचारांनुसार 'पुरुषा'ला मुक्तीचा अधिकार असतो आणि तशी संधी त्याला प्राप्त होऊ शकते. याउलट स्त्री ही सर्व व्यवस्थांनी बद्ध आहे. निवेदक पात्ररचनेत आणि पात्रांच्या वृत्तिप्रवृत्तींना उजेडात आणताना या पारंपरिक विचारांना, त्यांतील संकेतांना कलापूर्णरीत्या नकार देतो. थोडक्यात, तो अपरिवर्तनीय पुरुष-पात्रे आणि परिवर्तनास आपापल्यापरीने उत्सुक असलेली स्त्री-पात्रे निर्माण करून पात्ररचनेचा नवाच रूपबंध साकार करतो.

या कादंबरीतील निवेदक व्यक्ती, समष्टी आणि संस्कृती यांच्या परस्परसंबंधांचा निरनिराळ्या बाजूंनी आणि निरनिराळ्या दृष्टीने अन्वयार्थ उलगडताना दिसतो. अर्थातच या पात्रांचा विचार सविस्तर करणे आवश्यक आहेच.

डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस

# साहित्य प्रत्यय

डॉ. भा. ल. भोळे

साहित्याकडे केवळ साहित्य म्हणून न बघता त्याच्या सामाजिक अनुबंधाला महत्त्व देत; प्रत्यक्ष जगण्यातल्या प्रश्नांशी जोडून पाहत, पुरोगामी, परिवर्तनवादी आणि बुद्धिनिष्ठ भूमिकेतून डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे यांनी मराठी साहित्याची जी सडेतोड सभ्यता-समीक्षा केली आहे, ती त्यांच्या 'साहित्य प्रत्यय' या ग्रंथात समाविष्ट आहे.

डॉ. भोळे हे सामाजिक बांधिलकी मानणारे पण कोणत्याही विचारप्रणालीशी झापडबंद पोथीनिष्ठा नसलेले; विवेकाची कास धरणारे समतावादी आणि सामाजिक शास्त्रांचे विचारशील अभ्यासक म्हणून प्रसिद्ध आहेत. साहित्याविषयी त्यांना आस्था आहे आणि साहित्याला सामाजिक प्रयोजन असते असा त्यांचा दृढ विश्वास आहे. व्यापक सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात शुद्ध कलावादाला त्यांनी ठामपणे विरोध केला आहे. प्रामुख्याने साठोत्तर मराठी साहित्याचे तर्कशुद्ध आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण करताना त्यांनी समकालसन्मुख साहित्याचा पाठपुरावा करीत त्यातील उणिवा दाखवल्या आहेत व त्या वेगळ्या साहित्यकृतींची अर्थशून्यता उघडकीस आणली आहे.

लोकप्रिय मराठी साहित्याचा पंचनामा करताना त्यांनी ते कसे बेगडी, ठोकळेबाज, निर्जीव, व्यवस्थावादी आणि स्थितिवादी असते एवढेच सांगितले नाही तर सृजनशील साहित्यात वास्तवाची सूक्ष्म व्यामिश्रता, समग्रता व सखोलता असते; त्यात कल्पितातून वास्तवाकडे नेण्याचे सामर्थ्य असते आणि ते सत्ताशास्त्रीय प्रश्नांना हमखास भिडते हे सांगून आपली साहित्यिक जाणही व्यक्त केली आहे. समकालीन मराठी साहित्यासंबंधीची त्यांची निराशा अनेक निबंधांतून व्यक्त झालेली दिसते. हे साहित्य अजूनही प्रामुख्याने मध्यमवर्गीय अभिरुची जोपासणारे; प्रस्थापित, पारंपरिक व गतानुगतिक मूल्यव्यवस्थेचे समर्थन करणारे; अंधश्रद्धानुकूल स्थितिवादी व उत्सवी असल्यामुळे या काळाला ते 'ऱ्हासपर्व' असे म्हणतात. यातून ते बांधिलकी मानणाऱ्या साहित्यालाही धारेवर धरतात. "नव्या क्रांतिकारी जनजाणिवांचे वाहन होण्याच्या दृष्टीने तमाम विद्रोही व स्वतंत्र वाङ्मयीन व्यासपीठे थिटी पडली आहेत." ती का याचे वस्तुनिष्ठ विवेचन करून समांतर




साहित्यप्रवाहातील लेखकांचे एकंदर समाजवास्तवाचे आकलन कसे संकीर्ण आणि वरवरचे आहे व त्यांच्याकडून चळवळींना अपेक्षित दिग्दर्शनही कसे मिळत नाही, यासंबंधी पूर्वग्रहमुक्त मते ते व्यक्त करतात. ते साहित्यातील सामाजिक आशयाला सर्वाधिक महत्त्व देत असल्यामुळे 'साहित्य प्रत्यय'मधील प्राय: सर्व लेखन अशाच प्रश्नांवर आणि पुस्तकांवर होणे स्वाभाविकच होय.

काही लेख आणि काही ग्रंथपरीक्षणे असे जरी प्रस्तुत ग्रंथाचे दोन भाग केलेले असले तरी डॉ. भोळे यांची भूमिका वेगळी नाही. सिद्धान्त आणि उपयोजन असेही त्यांचे स्वरूप नाही तर मराठी साहित्यातील प्रवृत्ती आणि ग्रंथ यांच्या सखोल विश्लेषणातून, वस्तुनिष्ठ पाहणीतून आणि साहित्यविषयक समंजस जाणिवेतून विचारांचे सूचन होत राहते. अतिशय मार्मिक भाषेत, संयमपूर्वक पण कुणाचाही मुलाहिजा न बाळगता त्यांनी आपली निरीक्षणे मांडली आहेत; ती मराठी समीक्षेला नवी दिशा व भाषा देणारी आहेत.

सामाजिक शास्त्रांची दृष्टी लाभलेल्या फुले, रानडे, शिंदे, राजवाडे, शेजवलकर या पूर्वसुरींच्या परंपरेतलाच एक 'नम्र पाईक' बनण्याची आपली आंतरिक आकांक्षा डॉ. भोळे यांनी व्यक्त केलेली आहे आणि त्यांच्या वस्तुनिष्ठ अभ्यासातून त्यांनी जो डोळस व अर्थपूर्ण साहित्यप्रत्यय या ग्रंथात घडविला आहे त्यातून ती प्राय: पूर्ण झालेली आहे असे निश्चयपूर्वक म्हणता येईल. साहित्याचे समाजशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासातून लाभणारी वास्तववादी भूमिका यांचे अधिष्ठान त्यांच्या या लेखनाला लाभलेले आहे. साहित्यात समाज आणि समाजात साहित्य असा दुहेरी पडताळा घेण्याच्या पारस्परिकतेतून एक सम्यक, विवेकपूर्ण, वस्तुनिष्ठ, परिवर्तनपोषक, व्यापक अशी राजकीय भूमिका त्यांनी मांडली आहे.

डॉ. भोळे समाजमनस्क समीक्षक असले तरी साहित्याची काही सौंदर्यमूल्ये असतात हे त्यांना मान्य आहे. आंधळी समाजवादी भूमिका न घेता साहित्यकृतीला सर्वप्रथम वाङ्मयीन निकषच लावले पाहिजेत अशी निर्विवाद





व नि:संदिग्ध मांडणी ते करतात पण त्याचबरोबर साहित्यकृती एकदा सामाजिक जीवनाचे अंग बनल्यावर तिची सामाजिक-राजकीय समीक्षाही झालीच पाहिजे असा आग्रहही धरतात. समकालीन ऱ्हासपर्वाची कारणे समाजशास्त्रीय व साहित्यशास्त्रीय अशा दोन्ही अंगांनी शोधण्यावर भोळे भर देतात त्याचवेळी सामाजिक जाणिवांमधून लिहिल्या जाणाऱ्या साहित्याला साहित्याच्या कलात्मक कसोट्या गैरलागू ठरतात, असा जो अपसमज या क्षेत्रात निर्माण झाला आहे त्याच्या दुष्परिणामांकडेही लक्ष वेधतात. साहित्य हा सामाजिक व्यवहार आहे आणि तो संपूर्ण समाजाशी समकक्ष झाल्याखेरीज साहित्यक्षेत्रातील कोणत्याच व्याधीचे निराकरण होणार नाही हे मतही ते ठासून मांडतात.

वाङ्मयीन संस्कृतीच्या व्यापक राजकारणाचे विश्लेषण करताना प्रत्येक लेखक हा राजकारणाचाच लेखक असतो. प्रश्न इतकाच की तो कोणते आणि कोणाचे राजकारण लिहितो, हा केनियन लेखक न्यूगी वा थिओंग यांचा विचार समोर ठेवून डॉ. भोळे हे विश्लेषण करतात. गजानन माधव मुक्तिबोधही असाच प्रश्न विचारायचे, ''पार्टनर, तुम्हारी पॉलिटिक्स क्या है?'' कुठलीच राजकीय जाणीव नसल्यामुळे व्यंकटेश माडगूळकरांच्या लेखनातील सर्व गुण मान्य करूनही त्यांना स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजात घडू लागलेल्या राजकीय प्रक्रियांचे अंत:सूत्र कोठेही पकडता आले नाही आणि त्यामुळे 'सत्तांतर'सारखी रचनाही त्यांना स्थितिप्रिय व नियतिवादी कशी बनवते, हे डॉ. भोळे स्पष्टपणे मांडतात व त्यांच्या मध्यमवर्गीय जाणिवांच्या मर्यादा उघड करतात.

मराठी साहित्यात राजकीय उपहासाची वानवा का याची मीमांसा करताना पुन्हा मराठी लेखकांवर पडलेली मध्यमवर्गीय मर्यादाच समोर येते. यावेळी त्यांना हिंदी व्यंगकार हरिशंकर परसाई यांची नेमकी आठवण येते. मराठीत परसाई का नाहीत? लेखकांची राजकीय अनास्था आणि अपरिपक्वता हीच कारणे दिसतात. मराठीत ऐतिहासिक कादंबऱ्यांची रेलचेल का याचे उत्तर शोधताना ते इतिहासाचे राजकारण उघडकीस आणतात. पूर्वदिव्याचा शोध स्वातंत्र्यलढ्याचा भाग म्हणून स्वीकारताही येईल पण स्वातंत्र्यानंतर हे पूर्वदिव्य पुनरुज्जीवनवादी बनून येते; ते नवनिर्माणासाठी निरुपयोगी ठरते. 'घाशीराम कोतवाल' या नाटकाची वकिली करताना ते ऐतिहासिक नाटक नसून ऱ्हासकालीन समाजाचे चित्रण करणारा 'खेळ' आहे व त्यामुळे ते इथले आणि आत्ताचे आहे हे ठसवताना हा ऱ्हास सत्तेच्या राजकारणातून आलेला आहे इकडे निर्देश करतात. 'पोस्टर' हे नाटकही त्यांना मुक्तीचा विचार मांडणारे व परिवर्तनाशी बांधिलकी सांगणारे असल्यामुळे भावते. त्याच्या दोन प्रयोगांचे त्यांचे विश्लेषण त्यांची रंगभूमीची जाणकारी प्रकट करते.

डॉ. भोळे यांचे राजकीय भान त्यांना मराठी साहित्यातील मार्क्सवादी विचारांच्या दारिद्र्याची जाणीव करून देते. झापडबंद पोथीनिष्ठेऐवजी स्वतंत्रपणे विचार करून स्वानुभवाधारित मांडणी करणाऱ्या कॉ. डांगे आणि शरच्चंद्र मुक्तिबोध यांची ते भलामण करतात. जगभर मार्क्सवादाची देशी परिष्कृती होत असलेल्या 'मार्क्सवादी नवचिंतना'चे आद्य भारतीय चिंतक म्हणून ते कॉ. डांगे यांच्या साहित्य-कला-संस्कृतीविषयक भूमिकेचा गौरव करतात. मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यांत उघड आणि आवाजी मार्क्सवाद नसल्यामुळे मार्क्सवादी समीक्षकांचेही त्यांचे आकलन कसे चुकले आहे ते दाखवून त्यातील सूक्ष्म, लवचीक व खुल्या मार्क्सवादी आशयाचे विश्लेषण करतात. भारतीय परिस्थितीला अनुरूप असा मार्क्सवादाचा सृजनशील विकास करायचा तर वर्गीय दृष्टीचे तारतम्य बाळगले पाहिजे हे या लेखनातून त्यांना जाणवते.

'हरवलेले दिवस' या प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांच्या आत्मनिवेदनाचा ते या संदर्भात आवर्जून विचार करतात. त्याला त्यांनी 'ग्लासनोस्त' असे मार्मिकपणे म्हटले आहे. भारतीय साम्यवादी चळवळीच्या अंतरंगावर प्रकाशझोत टाकणाऱ्या या आत्मनिवेदनातून हे राजकारण कसे जीवनविन्मुख, देशाबाहेर आपली बुद्धी गहाण टाकणारे होते आणि त्यामुळे इथल्या जनमानसास समजून घेण्यास त्याला कसे घनघोर अपयश आले हे त्यातून स्पष्ट होते. 'हरवलेले दिवस' प्रश्नांचे मोहोळ उभे करते.

डॉ. भोळे पक्के समतावादी असले तरी एकांगी, झापडबंद आणि स्वातंत्र्यविरोधी वांझ विचारसरणींना त्यांनी प्रखर विरोध केलेला आहे. समरसता चळवळीतील अंतर्विरोध ते सावेश उपरोधाने उघडे पाडतातच; पण कार्ल मार्क्स, जोतीराव फुले, डॉ. आंबेडकर यांच्या नावाने गंडा बांधणाऱ्या लेखकांच्या अंधश्रद्धेवरही ते परखडपणे हल्ला करतात. 'केवळ श्रेष्ठत्वाच्या अंगाने कोणाही महापुरुषाचा विचार करणे एकांगी व आत्मवंचक ठरण्याचीच शक्यता जास्त' असा वाजवी इशारा ते देतात.

श्रीकांत वर्मा या हिंदी कवीबद्दलचा पूर्वग्रह बाजूला ठेवून डॉ. भोळे मोकळ्या मनाने 'मगध' या चंद्रकांत पाटील यांनी भाषांतरित केलेल्या कविता वाचतात. त्यांच्या पाठीमागचे वर्तमान संदर्भ 'घाशीराम'प्रमाणेच त्यांना महत्त्वाचे वाटतात. सत्तेतून येणाऱ्या विकृतींचे प्रक्षेपण म्हणजे 'मगध' असल्यामुळे समकालीन राजकीय जीवनाचे प्रतिबिंबही त्यात प्रत्ययाला येते आणि अस्वस्थ व्हायला होते.

दलित साहित्याविषयी आस्था असल्यामुळेच भोळे यांनी पाच-सहा लेखांतून त्याविषयीचे डोळस विश्लेषण केले आहे. ते प्रोत्साहक, प्रशंसावादी व उत्तेजक समीक्षेपेक्षा अधिक प्रगल्भ आणि उपकारक आहे. दलित साहित्यातील विद्रोह आणि नकार यांच्या फलश्रुतीचे इत्यंभूत विश्लेषण करून परंपरा परिवर्तनाच्या गतिशास्त्राच्या अनभिज्ञतेमुळे ते कसे साचेबंद, शब्दबंबाळ व पोकळ झाले आहे याचे त्यांचे विवेचन तर्कशुद्ध आहे. सखोल मानसिक प्रक्रियेचा अभाव, वर्तमानाचे विश्लेषण करण्याकडे दुर्लक्ष, वंचितांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांपेक्षा अमूर्त सांस्कृतिक प्रश्नांचे प्रचंड प्रमाण आणि दलितत्वाच्या कक्षांचा विस्तार करण्यातील अपयश ही कारणे त्यांनी अधोरेखित केली आहेत. दलित-ग्रामीण-जनवादीच्या भाऊबंदकीमध्येही पुढारपणाच्या राजकारणामुळे व्यापक शक्तिसंघटन होत नसल्याचा त्यांचा निष्कर्ष वास्तवच आहे. जातिधर्मापलीकडे जाऊन वंचित-शोषितांची ताकद कशी आणि कधी उभी राहणार हा प्रश्न आहे.

दलित साहित्यासंबंधीची डॉ. भोळे यांची भूमिका निखळ सामाजिक असल्यामुळे त्यांना नामदेव ढसाळ यांचा 'खेळ' ऊर्फ नवा 'पुरुषा'वतार अस्वस्थ करतो. प्रतिभासंपन्न कवीने मराठीत एकदम निराळी कविता लिहिली असली तरी ती उजवी, पलायनवादी, उमरखय्यामी आणि फारच तऱ्हेवाईक वाटते. कामविलासाच्या उत्तम आणि विस्मित करणाऱ्या या कवितेकडे केवळ रतिकाव्य म्हणून पाहणे त्यांना अन्यायकारकच वाटते असे नाही तर ते आत्मप्रतारणा करणारे आणि क्रांतिवंचकही वाटते. नवसमाजसर्जन करण्याची क्षमता या खेळात नाही. यापेक्षा 'या सत्तेत जीव रमत नाही' या कवितांत कवी माणूसपणाच्या शोधात आपल्या मुळांकडे जातो व तेथे परिवर्तनकारी शक्तीचा मागोवा घेतो हे बरे वाटते. पण अधिक खोलात जाण्यासाठी डॉ. भोळे वेदान्तशास्त्रातील सत्तेच्या स्वरूपाच्या तीन भिन्न प्रकारांचा आधार निर्भयपणाने घेतात. तेव्हा त्यांना असे दिसते की ढसाळांची कविता सत्तेच्या प्रातिभासिक म्हणजेच सर्वात खालच्या पातळीवर आहे. दुसरी व्यावहारिक व तिसरी पारमार्थिक पातळी. प्रातिभासिक सत्तेत जीव रमत नाही हे ठीक आहे. पण त्या सत्तेचे संपूर्ण व स्पष्ट आकलन नाही, ही भोळे यांची तक्रार आहे. विचार-विवेकापेक्षा सहज प्रेरणा प्रभावी असल्यामुळे असे होते असे त्यांचे अनुमान आहे.



या भूमिकेतून डॉ. भोळे अमिताभ यांच्या कथांचे स्वागत करतात. पण सामाजिक भान जेव्हा भाष्यवजा विधाने करायला लागते तेव्हा साहित्याचा प्रत्यय बिघडतो असे सांगायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. प्रेमानंद गज्वींच्या एकांकिकांच्या विश्लेषणातही त्यांनी परंपरा-परिवर्तन या द्वंद्वाचा विचार मांडला आहे. गज्वींनी परंपरा नीट समजून घेतल्या आहेत. दलितत्वाच्या कक्षाही विस्तारल्या आहेत पण विद्रोह मात्र प्रतीकात्मक आहे. क्रांतिकल्पनांचे अतिसुलभीकरण साहित्यकृतीलाही उणेपणा आणते. दया पवारांच्या 'बलुतं'मधील प्रांजळपणा त्यांना भावतो. पण पवार स्पष्ट क्रांतिकारक भूमिका घेत नाहीत ही त्यांची तक्रार आहे. विस्कळीत रचना, बौद्धिक संदिग्धता, मानसिक दुभंगलेपण असे काही दोष असले तरी दया पवार परखड आत्मपरीक्षण करतात हे त्यांना महत्त्वाचे वाटते.

साहित्यकृतींच्या मागचे राजकारण, साहित्यिक चळवळींचे स्वरूप, साहित्यातील सामाजिक-राजकीय व्यूह, विचारप्रणाली आणि त्यांचे परिणाम, शुद्ध कलावादाला विरोध करताना समाजवास्तवाचे समग्र आकलन करण्याचे भान अशा व्यापक सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात साहित्याचा प्रत्यय घेताना साहित्यसौंदर्याला डॉ. भोळे पारखे होत नाहीत. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या रोजनिशीतील साहित्यगुणांचे त्यांचे विश्लेषण; 'तरीही' या अनुराधा पाटील यांच्या अभावांच्या भावात्मक भावकवितांचे त्यांचे सहृदयी आकलन; 'वाघ्यामुरळी' या अनिल अवचटांच्या ललितगद्याने अस्वस्थ होणारी संवेदनशीलता; 'अवचटांचे लेखन कदाचित शुद्ध कलावादी समीक्षकांना विकृत सौंदर्यास्वादी कलानंद मिळवून देईल तर संवेदनशील समाजमनस्क मनांना ते पिळवटून टाकेल' असा वाचक प्रतिसाद प्रत्यय; 'पोस्टर'-'घाशीराम'मधील लोककलांचे संकेत; 'खेळ', 'वाघ्या मुरळी', 'या सत्तेत...' यांतील चित्रकलेची मार्मिक दखल आणि सर्वच लेखनातील पारदर्शी भाषाशैली यांतून डॉ. भोळे यांची समंजस साहित्यजाण दिसून येते. योग्य त्या प्रसंगी त्यांनी साहित्यप्रकारांच्या प्रकृतिवैशिष्ट्यांचीही चर्चा केलेली आहे आणि शेवटी एक यक्षप्रश्नही ते उभा करतात— तो त्यांच्या साहित्य प्रत्ययाचाच निखालस पुरावा होय. 'प्रवाहविशिष्ट साहित्य जेव्हा उदंड प्रमाणात लिहिले जाईल तेव्हा त्यात तरतम ठरवण्याचे निकष कोणते असतील?' या यक्षप्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट आहे. 'वाङ्मयीन कसोट्यांवरच त्यांची क्रमवारी लावून उत्तम कोणते व दुय्यम कोणते याचा विवेक करण्यावाचून गत्यंतर नाही.'

सात प्रकारच्या राजकीय चळवळीत प्रामाणिकपणे स्वत:ला झोकून देणाऱ्या सात मित्रांचा मित्र प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या 'साता उत्तरांच्या कहाणी'तला 'श्रीनिवास' हा डॉ. भोळे यांच्या प्रेमातला माणूस दिसतो. फक्त आपलीच बाजू खरी समजणाऱ्या प्रत्येकाला दुसऱ्या बाजूची जाणीव करून देणारा; घडामोडींचे तटस्थ अवलोकन करणारा; विवेकी, साक्षेपी, थट्टा करणारा पण तुच्छता नसणारा; आत्मीय आधार वाटणारा; अकृत्रिम स्नेही पण भावविवशता टाळणारा वाङ्मयप्रेमी; मराठी साहित्य खुजे, थिटे, उथळ, समाजविन्मुख मानणारा पण दलित साहित्यातली बंडखोरी स्वागतार्ह समजणारा हा श्रीनिवास गोखले चतुर, बहुश्रुत, सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाने, वर्तनशुद्ध वस्तुनिष्ठ भाष्यांनी भारावून टाकणारा डॉ. भोळे यांचा थोरला भाऊ शोभतो. त्यामुळे त्याने त्यांच्या मनात कायमचे घर केले असेल तर आश्चर्य वाटायचे कारण नाही.

निकोप वाङ्मयीन संस्कृतीच्या वाढीसाठी समकालसन्मुख साहित्याचा पाठपुरावा करणारे मर्मभेदी समाजचिंतक डॉ. भा. ल. भोळे यांचा डोळस आणि प्रगल्भ 'साहित्य प्रत्यय' बौद्धिक आनंद देण्याबरोबरच विचार करायलाही भाग पाडतो. 'साहित्य प्रत्यया'च्या आधी आणि नंतर समाजप्रत्ययाची अनिवार्यता पटवून देतो.

निशिकांत ठकार

# रा. शं. दातार नाट्य पुरस्कार

''प्रगतीच्या उलट्या पावलांनी प्रचंड वेगाने झेपावत निघालेल्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक शक्तींची ताकद एवढी अनावर आहे की, त्या ओघात पडून धारेला लागणे हेच आपले नशीब आहे असेच सर्वसामान्य माणूस मानू लागला आहे. अर्थात, या शक्तींशी झगडणारे महामेरू आजही जगात आहेत आणि उद्या आणखीही उदयाला येतील.'' — रा. शं. दातार



रा. शं. दातारांनी त्यांच्या आयुष्यात ५-६ नाटकेच लिहिली असतील. प्रसिद्धीच्या फुटपट्टीने त्यांचे मोल मोजता येणार नाही. 'तव आंतराग्नी क्षणभर तरी फुलवावा' या हेतूने त्यांनी प्रत्येक नाटक लिहिले आणि त्या दृष्टीने त्यांची नाटके फार मोलाची आहेत.

'महामेरु'मध्ये प्रदूषण, 'ओघळलेले मोती'मध्ये समाजवादाचा संघर्ष, 'अखेर पाय मातीचेच'मध्ये पारलौकिक उपदेशकांचा स्वार्थ असे विषय त्यांनी हाताळले. 'अखेर पाय मातीचेच' या नाटकाला राज्य सरकारचे पारितोषिकही मिळाले होते. पण सामाजिक अन्यायाच्या प्रखर जाणिवेतून जन्माला आलेल्या या नाटकांना पुरेशी प्रसिद्धी मिळाली नाही. या वर्षी एप्रिलमध्ये रा. शं. दातार यांचे निधन झाले. त्यांच्या अपुऱ्या राहिलेल्या नाटकाचा विषय समाजाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड हा होता. त्यांचे हे कार्य पुढे चालू राहिले तर त्यांच्या आत्म्याला खरी शांती लाभेल अशा भावनेने या पुरस्काराची सुरुवात करीत आहोत. सामाजिक अन्यायांबद्दल जनजागृतीचा संदेश देणाऱ्या नाट्यलेखकासाठी हा पुरस्कार आहे. सवंग लोकप्रियतेच्या मागे न लागता समाजसुधारणेच्या हेतूने लिहिलेल्या उत्कृष्ट नाट्यकृतीला श्रीमती रजनी शेंदुरे यांनी दिलेल्या देणगीमधून पंचवीस हजार रुपयांचा हा पुरस्कार दिला जाईल.

रा. शं. दातार नाट्यपुरस्कार निवड समिती



दिगंबर पाध्ये



वामन केंद्रे



शफाअत खान

# ढोलताशे

चं. प्र. देशपांडे

**जयंत पवार ह्यांनी घेतलेली मुलाखत**

ढोलताशे हे तुमचं लोकप्रिय ठरलेलं पहिलंच नाटक असावं. ह्यापूर्वीची तुमची नाटकं स्पर्धेत वा समांतर रंगभूमीवर मर्यादित प्रेक्षकांपुढे झाली. हे नाटक आविष्कारने केलं तरी ते शिवाजी मंदिरवर झालं. म्हणजे मासेस् पर्यंत गेलं. मला वाटतं ह्या नाटकातील जी सामाजिकता आहे ती अधिक बहिर्मुख आहे. तिचं अपील समाजातल्या बहुसंख्यांना आहे. कारण समाजात जवळपास प्रत्येकजण (मराठी माणूस) गणेशोत्सव, गणपती विसर्जनाची मिरवणूक अशा उत्सवी गोष्टींशी जवळपास संबंधित असतोच. ह्यामुळे हा विषय लोकांपर्यंत चटकन पोचला. मिरवणुकीच्या विरोधातली अक्षयची भूमिकाही बऱ्याच प्रमाणात लोकांना कळली. त्यातली तथ्यता जाणवली. तुम्ही ह्यात आनंद ओरबाडून घेण्याचं, माणसाच्या हावरटपणाचं, दुःखी होण्याचं जे तत्त्वज्ञान मांडलं ते कितपत पोचलं असं तुम्हाला वाटतं?

नाटकापुरतं म्हटलं तर माझी आतापार्यंत नऊ नाटकं व तीन दिर्घांक लिहून झालेले आहेत. काही रंगभूमीवर झाली,



काही यायची आहेत. ढोलताशे हे आविष्कार ने केलं, टीम उत्तम मिळाली आणि मुख्य म्हणजे त्यांनी सातत्याने त्याचे प्रयोग करणं जमवलं. सदर नाटक लोकप्रिय होण्याचे काही गुण खुद्द नाटकात असतीलही, पण माझी इतर नाटकं ह्या पद्धतीने झालेली नाहीत. त्यामुळे, ढोलताशे हे लोकप्रिय ठरलेलं पहिलं नाटक आहे हे खरं आहे. ह्या नाटकात, गणेशोत्सवाचा सामाजिक प्रश्न वेगळा आणि हावरटपणाचं, दुःखी होण्याचं तत्त्वज्ञान हे वेगळं असं नाही. जे काय पोचायचं ते एकत्रितपणेच कमी-जास्त प्रमाणात पोचेल. कारण धर्म समजून घेण्याच्या प्रक्रियेत, लक्षात येत जाणाऱ्या त्या तत्त्वज्ञानामुळेच तर एकूण विषय मांडला जातोय. हा एक नुसताच काहीतरी 'सुधारणावादी' प्रकार आहे असं ह्या नाटाककडे पाहता येणार नाही असं मला वाटतं.

ह्या नाटकाचं नेमकं प्रयोजन काय होतं? ते साधलं असं तुम्हाला वाटतं का?

'धर्म' ही बाब शाब्दिक आणि वैचारिक आणि भावनिक स्तरावरही सर्वार्थांनी विकृत पद्धतीने वापरली जातेय — हे वास्तव समोर आहे. एकूण जगणंच घाणेरडं करणारी अशी ही अति-महत्त्वाची वस्तुस्थिती आहे. ह्या प्रकारावर



दुसरे कुठलेतरी, पण त्यांच्यातलेच, हल्ले करण्यात अर्थ नव्हता. ह्यासाठी, अशी एक व्यक्ती की जी 'धर्म' समजून घेणं महत्त्वाचं मानते - त्या प्रक्रियेत संत वाङ्मयाचं वाचन वगैरे करते - अशी व्यक्ती ह्या वस्तुस्थितीसमोर उभी करावी असं मला वाटलं. म्हणजे, ह्या समोरासमोरीत ह्या विषयातल्या बऱ्याच गोष्टी व्यक्त होत जातील असं हे एकूण प्रयोजन होतं. ते बऱ्यापैकी साध्य झालं असं मला वाटतं. 'धर्म' समजून घेण्याची प्रक्रिया महत्त्वाची आहे, ती घडणं हे अतिशय महत्त्वाचं आहे, हेही अर्थातच म्हणायचं होतं. धर्म ह्या प्रकारात पूर्णत: वगळली जाणारी ही गोष्टच मांडली जावी हाही हेतू होता. हे नाटक पाहताना प्रेक्षकांच्या मनात काय घडत असेल हे सांगणं मला अवघड वाटतं. त्यामुळे तशा अंगानं हे प्रयोजन साध्य झालं की नाही ते सांगता येणार नाही.

ढोलताशेची मांडणी गंमतीशीर वाटते मला. म्हणजे तुमचा जो सुधारणावादी नायक आहे (जो समाजात क्रियाशील असतो) तो नाटकात स्थिर आहे आणि जे प्रतिगामी, विरोधक आहेत (जे समाजात निद्रिस्त असतात) ते नाटकात भयंकर आक्रमक, क्रियाशील आहेत. ह्या उलट्या रचनेने गंमत अशी झालीय की जो बहुसंख्य वर्ग आहे त्याच्या कोर्टात तुम्ही बॉल टाकलाय. त्याच्यावर जबाबदारी आहे ह्या (त्यांना वाटणाऱ्या) दगडाला पाझर फोडायची.... तर ह्या रचनेबद्दल जरा सांगा.

ह्या महाकाय उत्सवाला एखादी व्यक्ती प्रतिकार म्हणजे काय करेल? कुठे असेल ती व्यक्ती? ह्याचा विचार करताना लक्ष्मी रोडवरचं घर लक्षात आलं. एकूण पात्रं आणि त्यांची कामं लक्षात आली. हा संघर्ष उभा राहायला सुद्धा काकू



सारखी म्हातारी, संधिवातानं ग्रस्त व्यक्तीच फक्त कारणीभूत होऊ शकते ही ह्यातली एक अर्थपूर्ण बाब ठरावी. सगळ्यांची ह्या ना त्या प्रकारे 'घडलेली' व्यक्तिमत्वं जर क्षम्य मानली तर अक्षयनेही त्याच्या व्यक्तिमत्वाप्रमाणे वागणं चालू ठेवलं तर काय हरकत आहे? नाटक म्हणून हे अर्थातच ताणून पाहिलेलं आहे. ह्यातल्या शक्यता समोर आणण्यासाठी, इतरांप्रमाणेच, अक्षयही त्याचं म्हणणं लावून धरेल - हेच नाटक आहे. एच. जी. वेल्सच्या इन द कंट्री ऑफ द ब्लाईंड मध्ये तिथला वैद्य, डोळस माणसाच्या डोळ्यावर हात ठेवून सांगतो का इथं दोष आहे ह्याच्यात. गमंत वाटणं अभिप्रेत आहे पण अक्षयच्या बाबतीत सुधारणावादाचा प्रश्न नाही.

अक्षयच्या बाजूने जी आर्ग्यूमेंट्स् आहेत वा विरोधाचे जे मुद्दे पुन:पुन्हा येतात त्यात मोनोटोनी येते. आपला मुद्दा परतपरत गिरवण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे का?

तेच, तसंच कुठं गिरवलं गेलं आहे असं मला वाटत नाही. वेगवेगळ्या संदर्भांतून, वळणांतून पुन्हापुन्हा तिथेच येणं घडत असेल. ही मोनोटोनी त्या विषयातही आहेच. त्यामुळे नाटक जर कुठे थांबत असेल, कंटाळवाणं होत असेल तर जरा प्रॉब्लेमच आहे. तसं कुठे होतंय का बघावं लागेल. पण फिरून फिरून तिथेच येणं. पण विचारातून थोडाफार वेगळ्या वलयासह - आवर्तननाट्य - हे तर लागेलच.

तुमचा नायक इतका हटवादी आहे की हाही एक प्रकारचा फॅसिझमचा वाटतो. सुधारणावाद्यांचा अशा प्रकारचा फॅसिझम, टोकाला जाण्याची वृत्ती प्रतिगाम्यांना अधिकच कडवं आणि हिंसक बनवते. (उदा. शेवटी काकूचं हिस्टेरिक होणं.) ह्यामुळे व्यापक सामाजिक चौकटीत अक्षयचं वर्तन कितपत समर्थनीय वाटतं? की सुधारणावादी हे टोकाचे हट्टी, फॅसिस्टच असतात, आणि ते तसे असल्याविना समाजात सुधारणा शक्य नाही, असं तुम्हाला म्हणायचंय?

समूहाच्या हटवादीपणापुढे व्यक्तीने आपला हटवादीपणा सोडून द्यायचा ही रूढ पद्धत आहे. व्यक्तीनंही आपला हटवादीपणा चालू ठेवला तर — असं हे नाटक आहे. मनाच्या कोणत्याही एका आकलन बिंदूवरून तुम्ही वागत असला की कमीजास्त प्रमाणात तुम्ही फॅसिस्ट असताच. त्यामुळे विरुद्ध बाजू अधिक कडवी, हिंसक होते हेही खरं आहे. 'आपणच आपल्या विरुद्ध जाणं' — हे नाटकात आलेलं आहेच. त्यामुळे अक्षयही इतरांप्रमाणेच हटवादी आहे असं म्हणता येईल. ह्या नाटकात व्यक्तीच्या हटवादीपणालाही वाव देऊन पाहिलेलं आहे. एखादा संत हीच गोष्ट कोणताही आग्रहीपणा किंवा प्रचारकीपणा न करता मांडत असेल. पण अक्षय अशा क्लॅरिटीतून वागत नाही. तोही वैचारिक दृष्ट्या टप्प्यावरच आहे. एका-एका तपशीलाची सुधारणा हा एक प्रकार झाला. त्या त्या वेळच्या वैचारिक-सामूहिक शक्तीतून त्या गोष्टी घडत जाणं ही एक प्रक्रिया चालू असते. इथे तेवढाच प्रश्न नाही. धर्माचं आकलन घडणं ही प्रक्रिया म्हणजे जगण्याचं, सवयीचं स्ट्रक्चरच आव्हानात येण्याची प्रक्रिया असणार आहे. त्यामुळे आहे मानाने नुसत्या सुधारणा सुचवण्याचा तो प्रकार नाही. अशी काही प्रक्रिया घडूच नये असा हा सगळा बंदोबस्त आहे. अशा प्रक्रियेचं महत्त्व वाटणारी व्यक्ती तीही नॉर्मल समजली जायला हवी. 'मूल्या'चा शोध फक्त गौतम बुद्धानं घ्यायचा, असं ह्यात गृहीत धरलं जातंय हा तो प्रश्न आहे.



गणपती विसर्जनासारख्या मिरवणुकांमध्ये जो तरुण वर्ग बेभान होऊन नाचतो, आपला उन्माद व्यक्त करतो, त्यातून त्याच्यातल्या सुप्त, आक्रमक हिंसक शक्तीचं कुठेतरी विरेचन होत असतं. ते झालं नाही तर ह्या दबलेल्या शक्ती कशाही फुफाटून बाहेर येतील आणि विकृत रूप धारण करतील. अक्षयचं ह्याबाबत काय म्हणणं असेल?

ही विवेचनाची थिअरी पूर्णपणे खोटी आहे. असं मुळीच होत नाही. निरनिराळ्या पळवाटांनी जगण्यातल्या प्रश्नांची तीव्रता कमी होत नाही. उलट वाढते. आपण एक अशा पद्धतीने पाहू... माणसाच्या मनाचं शंभर टक्के असं काहीच नसतं. ते नेहमी कमीजास्त टक्केवारीत विभागलेलंच असतं. विभागणी नाही म्हणजे मन नाही. तर ह्या अशा विभक्तपणाचा त्रास असतोच. ह्याच्यावर उपाय म्हणून दारूनं, आवाजांनी, नाचून, झिंग आणून ह्या ना त्या प्रकारे त्या विभक्तपणाचा ताण तात्पुरता 'बेशुद्ध' केला जातो. हीही त्या विभक्तपणाचीच 'आवडती' कृती असते. ह्या अर्थाने हेही, तो विभक्तपणा व्यक्त होणंच असतं. त्यामुळे मनाच्या विभक्तपणाची ज्याची त्याची रचना अधिक सशक्त होते. असे उत्सव आणि त्यातले 'बेधुंद'पणाचे प्रकार वाढणं आणि समाजातली हिंसा वाढणं ह्या एकत्रितपणे जाणाऱ्या गोष्टी आहेत. हे उत्सव म्हणजे 'हिंसे'चीच अभिव्यक्ती आहेत. हिंसक मनानं, हिंसक मनासाठी घडणाऱ्या कोणत्याही कृतीतून हिंसेचं प्रमाण कमी होत नाही. निश्चितपणे वाढतं.

भंजनवादी काकासाहेब जोशी आणि मूलतत्त्ववादी घारपुरे ही पात्रं नाटकात आल्यामुळे डायमेन्शस वाढण्याच्या शक्यता निर्माण होतात. पण ही दोन्ही पात्रं तोकडी वाटतात. घारपुरेंनी तोडीस तोड वाद घातला असता तर दुसरी बाजूही आली असती नाटकात आणि त्या बाजूचा पाडाव अक्षय करता तर त्याला अधिक तेज आलं असतं. आता जो तुम्ही कलगीतुरा केलाय तो मॅच-फिक्सिंग प्रमाणे वाटतो. अंगाला अंग न भिडवताच पहिलवानाने माघार घेतल्यागत घारपुरे पळतो. त्यामुळे नाटकात कमी राहिली असं नाही वाटतं?

जोशी आणि घारपुरे विशेषतः घारपुरेंबद्दल हा प्रश्न आहे. 'धर्म' समजून घेण्याची प्रक्रिया नाकारणं, चर्चा टाळणं हीच तर ट्रॅडिशन झालीय. त्यांचा हा प्रतिनिधी. तो कसलं आर्ग्युमेंट करणार? नुसता 'भुस्सा' ह्या स्वरूपातल्या ज्या सवयी आहेत त्यांची 'बाजू' कसली मांडणार? तो 'भुस्सा' आहे हे दिसणं — एवढंच घडू शकणार होतं.

जोशींच्या काळ्या टोपीवरून ते पूर्वीचे संघवाले वाटतात. हा पूर्वीचा संघवाला पण आता पूर्ण बदललेला, पण अजून निश्चित दिशा न सापडलेला... असं तुम्हाला सुचवायचं आहे का?

जोशी हा तुम्ही म्हणता तसाच आहे. फक्त त्या त्या वेळी एका एका तपशीलावर तो काहीतरी लिहितो. त्याला संगतवार असं आकलन नाही. नुसताच प्रामाणिकपणा आहे. पण थोडाफार विचार करत असल्यामुळे त्याला जगण्यातल्या काही विसंगती लक्षात येतात.

अक्षय घरात घुसलेल्या काकासाहेब जोशींना म्हणतो, 'तुम्ही मूलत्ववादी, फॅसिस्ट कम्युनिस्ट, सेक्युलर, हिंदुत्ववादी समाजवादी, गांधीवादी किंवा भांडवलशाहीवादी असलं काहीही असलात तरी मला त्याच्यात इंटरेस्ट नाही.' त्यावर जोशी विचारतात, 'तुम्ही कोण आहात मग?' माझ्या मते हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. पण त्यावर अक्षय उत्तरच देण्याचं टाळतो. किंवा गडबडून जातो. मला वाटतं तुम्हीच ह्या प्रश्नाला बगल दिली आहे. कुठलाही भूमिका मांडताना आपण कळत नकळत कोणती तरी एक विचारप्रणाली स्वीकारलेलीच असते, की ह्या सगळ्या अस्तित्वात असलेल्या विचारसरण्या-प्रणाल्यांच्याही बाहेर राहून काही एक भूमिका घेता येणं शक्य असतं? तुम्हाला काय म्हणायचं?

'आधी निष्कर्ष' अशा पद्धतीनं 'धर्मा' चा 'मूल्या'चा शोध होणार नाही. विचारसरणी अंमलात आणणं हे निष्कर्ष अमंलात आणण्यासारखं असतं. ह्यातला हा गोंधळ आहे. अक्षयकडे 'आकलन'नाही. त्यामुळे तोही कुठल्यातरी विचाराच्या गोंधळाच्या बिंदूवरच आहे. 'आधी निष्कर्ष' ही पद्धत तर नाकारायची आहे पण आपणही त्याच 'दोषा'त आहोत - असा हा अक्षयचा पेच आहे. त्यामुळे तो 'तुम्ही कोण आहात' ह्या प्रश्नाने गडबडतो. 'मी कशाला तुम्हाला टॉपल-डाउन करीन हो!' असं जोशी म्हणतात. म्हणजेच काही न करता ह्यांचा पाठिंबा इकडे एवढंच. भूमिका घेणं हा सगळा मनाच्या टक्केवारीचा प्रकार असतो. 'आपणच आपल्या विरूद्ध' जाण्याचे प्रकार त्यातून घडतात. ह्या सगळ्या प्रकारात मन हीच एक गृहीत धरलेली, अबाधित अशी गोष्ट असते. अशा ह्या विभागलेपणाशिवाय जगणं शक्य आहे का? हाच तर धर्माचा शोध. मन हा शोध नाकारातंही, आणि मान्यही करतं. 'माया'च 'सत्या'कडे जायला मदत करते असं रामदास एका ठिकाणी म्हणतात. त्यातली ती परिभाषा सोडून दिली तरी अर्थ हाच आहे. नाहीतर

तुमचा नायक इतका हटवादी आहे की हाही एक प्रकारचा फॅसिझमचा वाटतो. सुधारणावाद्यांचा अशा प्रकारचा फॅसिझम, टोकाला जाण्याची वृत्ती प्रतिगाम्यांना अधिकच कडवं आणि हिंसक बनवते. (उदा. शेवटी काकूचं हिस्टेरिक होणं.) ह्यामुळे व्यापक सामाजिक चौकटीत अक्षयचं वर्तन कितपत समर्थनीय वाटतं? की सुधारणावादी हे टोकाचे हट्टी, फॅसिस्टच असतात, आणि ते तसे असल्याविना समाजात सुधारणा शक्य नाही, असं तुम्हाला म्हणायचंय?

समूहाच्या हटवादीपणापुढे व्यक्तीने आपला हटवादीपणा सोडून द्यायचा ही रूढ पद्धत आहे. व्यक्तीनंही आपला हटवादीपणा चालू ठेवला तर — असं हे नाटक आहे. मनाच्या कोणत्याही एका आकलन बिंदूवरून तुम्ही वागत असला की कमीजास्त प्रमाणात तुम्ही फॅसिस्ट असताच. त्यामुळे विरुद्ध बाजू अधिक कडवी, हिंसक होते हेही खरं आहे. 'आपणच आपल्या विरुद्ध जाणं' — हे नाटकात आलेलं आहेच. त्यामुळे अक्षयही इतरांप्रमाणेच हटवादी आहे असं म्हणता येईल. ह्या नाटकात व्यक्तीच्या हटवादीपणालाही वाव देऊन पाहिलेलं आहे. एखादा संत हीच गोष्ट कोणताही आग्रहीपणा किंवा प्रचारकीपणा न करता मांडत असेल. पण अक्षय अशा क्लॅरिटीतून वागत नाही. तोही वैचारिक दृष्ट्या टप्प्यावरच आहे. एका-एका तपशीलाची सुधारणा हा एक प्रकार झाला. त्या त्या वेळच्या वैचारिक-सामूहिक शक्तीतून त्या गोष्टी घडत जाणं ही एक प्रक्रिया चालू असते. इथे तेवढाच प्रश्न नाही. धर्माचं आकलन घडणं ही प्रक्रिया म्हणजे जगण्याचं, सवयींचं स्ट्रक्चरच आव्हानात येण्याची प्रक्रिया असणार आहे. त्यामुळे आहे मानाने नुसत्या सुधारणा सुचवण्याचा तो प्रकार नाही. अशी काही प्रक्रिया घडूच नये असा हा सगळा बंदोबस्त आहे. अशा प्रक्रियेचं महत्त्व वाटणारी व्यक्ती तीही नॉर्मल समजली जायला हवी. 'मूल्या'चा शोध फक्त गौतम बुद्धानं घ्यायचा, असं ह्यात गृहीत धरलं जातंय हा तो प्रश्न आहे.



गणपती विसर्जनासारख्या मिरवणुकांमध्ये जो तरुण वर्ग बेभान होऊन नाचतो, आपला उन्माद व्यक्त करतो, त्यातून त्याच्यातल्या सुप्त, आक्रमक हिंसक शक्तीचं कुठेतरी विरेचन होत असतं. ते झालं नाही तर ह्या दबलेल्या शक्ती कशाही फुफाटून बाहेर येतील आणि विकृत रूप धारण करतील. अक्षयचं ह्याबाबत काय म्हणणं असेल?

ही विवेचनाची थिअरी पूर्णपणे खोटी आहे. असं मुळीच होत नाही. निरनिराळ्या पळवाटांनी जगण्यातल्या प्रश्नांची तीव्रता कमी होत नाही. उलट वाढते. आपण एक अशा पद्धतीने पाहू... माणसाच्या मनाचं शंभर टक्के असं काहीच नसतं. ते नेहमी कमीजास्त टक्केवारीत विभागलेलंच असतं. विभागणी नाही म्हणजे मन नाही. तर ह्या अशा विभक्तपणाचा त्रास असतोच. ह्याच्यावर उपाय म्हणून दारूनं, आवाजांनी, नाचून, झिंग आणून ह्या ना त्या प्रकारे त्या विभक्तपणाचा ताण तात्पुरता 'बेशुद्ध' केला जातो. हीही त्या विभक्तपणाचीच 'आवडती' कृती असते. ह्या अर्थाने हेही, तो विभक्तपणा व्यक्त होणंच असतं. त्यामुळे मनाच्या विभक्तपणाची ज्याची त्याची रचना अधिक सशक्त होते. असे उत्सव आणि त्यातले 'बेधुंद'पणाचे प्रकार वाढणं आणि समाजातली हिंसा वाढणं ह्या एकत्रितपणे जाणाऱ्या गोष्टी आहेत. हे उत्सव म्हणजे 'हिंसे'चीच अभिव्यक्ती आहेत. हिंसक मनानं, हिंसक मनासाठी घडणाऱ्या कोणत्याही कृतीतून हिंसेचं प्रमाण कमी होत नाही. निश्चितपणे वाढतं.

भंजनवादी काकासाहेब जोशी आणि मूलतत्त्ववादी घारपुरे ही पात्रं नाटकात आल्यामुळे डायमेन्शस वाढण्याच्या शक्यता निर्माण होतात. पण ही दोन्ही पात्रं तोकडी वाटतात. घारपुरेंनी तोडीस तोड वाद घातला असता तर दुसरी बाजूही आली असती नाटकात आणि त्या बाजूचा पाडाव अक्षय करता तर त्याला अधिक तेज आलं असतं. आता जो तुम्ही कलगीतुरा केलाय तो मॅच-फिक्सिंग प्रमाणे वाटतो. अंगाला अंग न भिडवताच पहिलवानाने माघार घेतल्यागत घारपुरे पळतो. त्यामुळे नाटकात कमी राहिली असं नाही वाटतं?

जोशी आणि घारपुरे विशेषत: घारपुरेंबद्दल हा प्रश्न आहे. 'धर्म' समजून घेण्याची प्रक्रिया नाकारणं, चर्चा टाळणं हीच तर ट्रॅडिशन झालीय. त्यांचा हा प्रतिनिधी. तो कसलं आर्ग्युमेंट करणार? नुसता 'भुस्सा' ह्या स्वरूपातल्या ज्या सवयी आहेत त्यांची 'बाजू' कसली मांडणार? तो 'भुस्सा' आहे हे दिसणं — एवढंच घडू शकणार होतं.

जोशींच्या काळ्या टोपीवरून ते पूर्वीचे संघवाले वाटतात. हा पूर्वीचा संघवाला पण आता पूर्ण बदललेला, पण अजून निश्चित दिशा न सापडलेला... असं तुम्हाला सुचवायचं आहे का?

जोशी हा तुम्ही म्हणता तसाच आहे. फक्त त्या त्या वेळी एका एका तपशीलावर तो काहीतरी लिहितो. त्याला संगतवार असं आकलन नाही. नुसताच प्रामाणिकपणा आहे. पण थोडाफार विचार करत असल्यामुळे त्याला जगण्यातल्या काही विसंगती लक्षात येतात.

अक्षय घरात घुसलेल्या काकासाहेब जोशींना म्हणतो, 'तुम्ही मूलत्ववादी, फॅसिस्ट कम्युनिस्ट, सेक्युलर, हिंदुत्ववादी समाजवादी, गांधीवादी किंवा भांडवलशाहीवादी असलं काहीही असलात तरी मला त्याच्यात इंटरेस्ट नाही.' त्यावर जोशी विचारतात, 'तुम्ही कोण आहात मग?' माझ्या मते हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. पण त्यावर अक्षय उत्तरच देण्याचं टाळतो. किंवा गडबडून जातो. मला वाटतं तुम्हीच ह्या प्रश्नाला बगल दिली आहे. कुठलाही भूमिका मांडताना आपण कळत नकळत कोणती तरी एक विचारप्रणाली स्वीकारलेलीच असते, की ह्या सगळ्या अस्तित्वात असलेल्या विचारसरण्या-प्रणाल्यांच्याही बाहेर राहून काही एक भूमिका घेता येणं शक्य असतं? तुम्हाला काय म्हणायचं?

'आधी निष्कर्ष' अशा पद्धतीनं 'धर्मा' चा 'मूल्या'चा शोध होणार नाही. विचारसरणी अंमलात आणणं हे निष्कर्ष अमंलात आणण्यासारखं असतं. ह्यातला हा गोंधळ आहे. अक्षयकडे 'आकलन'नाही. त्यामुळे तोही कुठल्यातरी विचाराच्या गोंधळाच्या बिंदूवरच आहे. 'आधी निष्कर्ष' ही पद्धत तर नाकारायची आहे पण आपणही त्याच 'दोषा'त आहोत - असा हा अक्षयचा पेच आहे. त्यामुळे तो 'तुम्ही कोण आहात' ह्या प्रश्नाने गडबडतो. 'मी कशाला तुम्हाला टॉपल-डाउन करीन हो!' असं जोशी म्हणतात. म्हणजेच काही न करता ह्यांचा पाठिंबा इकडे एवढंच. भूमिका घेणं हा सगळा मनाच्या टक्केवारीचा प्रकार असतो. 'आपणच आपल्या विरूद्ध' जाण्याचे प्रकार त्यातून घडतात. ह्या सगळ्या प्रकारात मन हीच एक गृहीत धरलेली, अबाधित अशी गोष्ट असते. अशा ह्या विभागलेपणाशिवाय जगणं शक्य आहे का? हाच तर धर्माचा शोध. मन हा शोध नाकारातंही, आणि मान्यही करतं. 'माया'च 'सत्या'कडे जायला मदत करते असं रामदास एका ठिकाणी म्हणतात. त्यातली ती परिभाषा सोडून दिली तरी अर्थ हाच आहे. नाहीतर

'धर्म'आणि 'मूल्य'ह्या अशक्य गोष्टी आहेत असा निष्कर्ष काढून मन थांबू शकेल.

'साकेतच्या डोक्यावरची पट्टी काढा', असं तुम्ही सूचकपणे बोलला. पण देवाबद्दल, धर्माबद्दल स्पष्ट स्टँड नाटकात घेत नाही. असं का? अक्षयची भूमिका 'देव्हारा नको, पण देव चालेल', अशी संदिग्ध आहे. धर्म ही अफूची गोळी आहे, असं तो स्पष्टपणे का म्हणत नाही?

धर्म हा अफूची गोळी आहे असं माझंही म्हणणं नाही आणि नाटकात अक्षयचंही म्हणणं नाही. तुकाराम-ज्ञानेश्वर ह्यांचं जीवनाचं जे उत्तुंग, अथांग आकलन आहे, तो धर्म. तो नाकारणं म्हणजे माणसाच्या जगण्यात 'मूल्या'ची शक्यताच नाकारणं आहे. हिंदू धर्म, मुस्लिम धर्म असे धर्मभेद ह्या भुक्कड गोष्टी आहेत. ते नुसतेच हिंसक अभिनिवेशन आहेत. अशा अभिनिवेश स्वरूपातल्या धर्मांना अफूच्या गोळ्या कशाला, वीषच म्हणायला हवं. 'दु:खी होण्याची पद्धत जर एकच आहे, तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता - म्हणजे धर्म - अनेक कसे असतील?' - अशा स्वरूपाचं एक वाक्य नाटकात आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, गौतम बुद्ध, जे. कृष्णमूर्ती ह्यांना जर आपण अफूच्या गोळ्या म्हणायला लागलो तर आत्महत्या ही एकच 'बरोबर' कृती आहे असंच होणार ते. असंच असेल तर होऊ द्या ना तसंही - नाही ते भ्रम हवेत कशाला - ही एक प्रतिक्रिया शक्य आहे. पण माहीत नसलेल्या गोष्टींबद्दल माहीत असल्यासारखी सुरवात करणंही मूर्खपणच ना! ढोलताशे मध्ये हे असं आहे.

तुम्हाला रिलेशनशिप रंगवण्यात, व्यक्तिरेखाटन करण्यात फार स्वारस्य नाहीसं दिसतं. ते तुम्ही जेवढ्यास तेवढंच करता. इतर नाटकांच्या बाबतीत ते मान्य करता येईल. पण ढोलताशे मधल्या पात्रांना आपोआप एक कौटुंबिक चौकट प्राप्त झाली आहे. ज्यात नातेसंबंधांची वीण गुंफली असती तर नाटकाचा पोत अधिक भरीव झाला झाला असता, असं नाही वाटत तुम्हाला? तसं न केल्याने अश्विनी सारख्या व्यक्तिरेखेला स्वत:ची मुद्राच प्राप्त झालेली नाही.

त्या त्या व्यक्तींचे अँगल्स आणि त्यांच्या त्यांच्या प्रश्नांच्या अवस्था नाटकात आलेल्या आहेत. एकूण वस्तुस्थितीचा भाग म्हणून ह्या गोष्टी आहेत. नाटकाचा विषय लक्षात घेता त्यांच्यावर फार भर द्यायचा नव्हता. अश्विनीला एका वेगळ्याच कारणानं चाललंय हे 'बरं' वाटतंय. हे एक वेगळं परिणाम आहे. ते नाटकभर आहे. बोलणं एकदाच असलं तरी. पण तरीही एक पात्र म्हणून 'मुद्रा' प्राप्त होण्यात हे कमी पडतंय की काय अशी मलाही शंका आहे. पात्रांच्या, व्यक्तिरेखांच्या अंगाने हे नाटक जास्त वाढू द्यायचं नव्हतंच. त्यामुळे असा 'दोष' आला असावा.

शेवटी काकू हिस्टेरिक होतात. म्हणजे असले प्रश्न भावनिक पातळीवरच, ब्लॅकमेलिंग करून निकालात काढले जातात, असं तुम्हाला सुचवायचं आहे का?

एकमेकात 'विरोध' निर्माण झाला की 'शक्तिप्रदर्शन'हाच त्याच्यावर उपाय. मग ती शक्ती कसलीही असो. कारण विभक्त मनाची कोणतीही अवस्था 'बरोबर' किंवा 'खरी'अशी सिद्ध होऊ शकत नाही. अशा सगळ्या अवस्था समजून घेऊन निवड तरी कशी होणार? एकूण जगण्याची 'बोबं' होण्याचं हे एक अत्यंत महत्त्वाचं कारण आहे. सगळा कन्व्हिक्शनवाल्यांचाच गोंधळ चालतो. 'कन्व्हिक्शन' बद्दलच साशंकात असणं हा प्रकार कमकुवतच ठरणार.

*'नाटक' वर्ष पहिले अंक चौथा सप्टेंबर २०००*
*या नियतकालिकातून साभार*




# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. 'ट्रस्ट'तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. 'ट्रस्ट'चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते; संशोधक व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

'ट्रस्ट'मध्ये एक 'डॉक्युमेंटेशन सेंटर' आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. 'ट्रस्ट'तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम 'ट्रस्ट'तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन 'ट्रस्ट'तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'ट्रस्ट'ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात 'कल्याण केंद्र' सुरू केले आहे.

'ट्रस्ट'च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिक व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम 'ट्रस्ट'तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे 'स्वाधार' संस्थेचे कार्य 'ट्रस्ट'च्या वास्तूतूनच केले जाते.

**विश्वस्त मंडळ**

श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे,
श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर, श्री. मधू आडेलकर,
श्री. श्रीनिवास प्रभू, श्री. रमाकांत कदम,
श्री. चंद्रकांत केळकर, श्री. रवी देवगडकर, श्री. प्रमोद निगुडकर.

‘धर्म’आणि ‘मूल्य’ह्या अशक्य गोष्टी आहेत असा निष्कर्ष काढून मन थांबू शकेल.
‘साकेतच्या डोक्यावरची पट्टी काढा’, असं तुम्ही सूचकपणे बोलला. पण देवाबद्दल, धर्माबद्दल स्पष्ट स्टँड नाटकात
घेत नाही. असं का? अक्षयची भूमिका ‘देव्हारा नको, पण देव चालेल’, अशी संदिग्ध आहे. धर्म ही अफूची गोळी
आहे, असं तो स्पष्टपणे का म्हणत नाही?
धर्म हा अफूची गोळी आहे असं माझंही म्हणणं नाही आणि नाटकात अक्षयचंही म्हणणं नाही. तुकाराम-ज्ञानेश्वर ह्यांचं
जीवनाचं जे उत्तुंग, अथांग आकलन आहे, तो धर्म. तो नाकारणं म्हणजे माणसाच्या जगण्यात ‘मूल्या’ची शक्यताच
नाकारणं आहे. हिंदू धर्म, मुस्लिम धर्म असे धर्मभेद ह्या भुक्कड गोष्टी आहेत. ते नुसतेच हिंसक अभिनिवेशन आहेत.
अशा अभिनिवेश स्वरूपातल्या धर्मांना अफूच्या गोळ्या कशाला, वीषच म्हणायला हवं. ‘दुःखी होण्याची पद्धत जर
एकच आहे, तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता - म्हणजे धर्म - अनेक कसे असतील?’ - अशा स्वरूपाचं एक
वाक्य नाटकात आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, गौतम बुद्ध, जे. कृष्णमूर्ती ह्यांना जर आपण अफूच्या गोळ्या म्हणायला
लागलो तर आत्महत्या ही एकच ‘बरोबर’ कृती आहे असंच होणार ते. असंच असेल तर होऊ द्या ना तसंही - नाही
ते भ्रम हवेत कशाला - ही एक प्रतिक्रिया शक्य आहे. पण माहीत नसलेल्या गोष्टींबद्दल माहीत असल्यासारखी सुरवात
करणंही मूर्खपणच ना! ढोलताशे मध्ये हे असं आहे.
तुम्हाला रिलेशनशिप रंगवण्यात, व्यक्तिरेखाटन करण्यात फार स्वारस्य नाहीसं दिसतं. ते तुम्ही जेवढ्यास तेवढंच
करता. इतर नाटकांच्या बाबतीत ते मान्य करता येईल. पण ढोलताशे मधल्या पात्रांना आपोआप एक कौटुंबिक चौकट
प्राप्त झाली आहे. ज्यात नातेसंबंधांची वीण गुंफली असती तर नाटकाचा पोत अधिक भरीव झाला झाला असता,
असं नाही वाटत तुम्हाला? तसं न केल्याने अश्विनी सारख्या व्यक्तिरेखेला स्वतःची मुद्राच प्राप्त झालेली नाही.
त्या त्या व्यक्तींचे अँगल्स आणि त्यांच्या त्यांच्या प्रश्नांच्या अवस्था नाटकात आलेल्या आहेत. एकूण वस्तुस्थितीचा
भाग म्हणून ह्या गोष्टी आहेत. नाटकाचा विषय लक्षात घेता त्यांच्यावर फार भर द्यायचा नव्हता. अश्विनीला एका
वेगळ्याच कारणानं चाललंय हे ‘बरं’ वाटतंय. हे एक वेगळं परिणाम आहे. ते नाटकभर आहे. बोलणं एकदाच असलं
तरी. पण तरीही एक पात्र म्हणून ‘मुद्रा’ प्राप्त होण्यात हे कमी पडतंय की काय अशी मलाही शंका आहे. पात्रांच्या,
व्यक्तिरेखांच्या अंगाने हे नाटक जास्त वाढू द्यायचं नव्हतंच. त्यामुळे असा ‘दोष’ आला असावा.
शेवटी काकू हिस्टेरिक होतात. म्हणजे असले प्रश्न भावनिक पातळीवरच, ब्लॅकमेलिंग करून निकालात काढले
जातात, असं तुम्हाला सुचवायचं आहे का?
एकमेकात ‘विरोध’ निर्माण झाला की ‘शक्तिप्रदर्शन’हाच त्याच्यावर उपाय. मग ती शक्ती कसलीही असो. कारण
विभक्त मनाची कोणतीही अवस्था ‘बरोबर’ किंवा ‘खरी’अशी सिद्ध होऊ शकत नाही. अशा सगळ्या अवस्था समजून
घेऊन निवड तरी कशी होणार? एकूण जगण्याची ‘बोबं’ होण्याचं हे एक अत्यंत महत्त्वाचं कारण आहे. सगळा
कन्व्हिक्शनवाल्यांचाच गोंधळ चालतो. ‘कन्व्हिक्शन’ बद्दलच साशंकात असणं हा प्रकार कमकुवतच ठरणार.

*‘नाटक’ वर्ष पहिले अंक चौथा सप्टेंबर २०००*
*या नियतकालिकातून साभार*




# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला ‘आंतरराष्ट्रीय समाजवाद’ हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर चळवळीतील त्यांच्या सहकारी व पत्नी मृणाल गोरे आणि केशव गोरे यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी ‘केशव गोरे स्मारक ट्रस्ट’ची स्थापना केली. ‘ट्रस्ट’तर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोणातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबविले जातात. ‘ट्रस्ट’चे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ४,००० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते; संशोधक व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

‘ट्रस्ट’मध्ये एक ‘डॉक्युमेंटेशन सेंटर’ आहे. या केंद्रात नियतकालिकातील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी तसेच २ फेब्रुवारी या केशव गोरे यांच्या स्मृतिदिनाच्या अनुषंगाने दरवर्षी व्याख्यानमाला आयोजित केली जाते. ‘ट्रस्ट’तर्फे वेळोवेळी महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ‘ट्रस्ट’तर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे होणारी विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन ‘ट्रस्ट’तर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नतनगर गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ‘ट्रस्ट’ने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी, गोरेगाव (प.) या झोपडपट्टी विभागात ‘कल्याण केंद्र’ सुरू केले आहे.

‘ट्रस्ट’च्या दोन्ही वास्तूंमध्ये वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिक व नियतकालिके यांचे वाचनालय, असे अनेक उपक्रम ‘ट्रस्ट’तर्फे चालविले जातात.

स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे Counselling करण्याचे ‘स्वाधार’ संस्थेचे कार्य ‘ट्रस्ट’च्या वास्तूतूनच केले जाते.

**विश्वस्त मंडळ**
श्री. र. गो. करमरकर, श्रीमती मृणाल गोरे,
श्रीमती कुसुम सामंत, श्री. कृष्णनाथ नेवरेकर, श्री. मधू आडेलकर,
श्री. श्रीनिवास प्रभू, श्री. रमाकांत कदम,
श्री. चंद्रकांत केळकर, श्री. रवी देवगडकर, श्री. प्रमोद निगुडकर.

## निवड सल्लागार समिती

## भारत २००३



**मृणाल गोरे**
अध्यक्षा
केशव गोरे स्मारक ट्रस्ट



**दिगंबर पाध्ये**
निमंत्रक, साहित्य पुरस्कार समिती
मराठीचे प्राध्यापक व समीक्षक



**डॉ. विजया राजाध्यक्ष**
प्राध्यापिका, मराठी विभाग प्रमुख
एस्.एन्.डी.टी. विद्यापीठ (निवृत्त)
प्रख्यात कथालेखिका व समीक्षक



**नागनाथ कोत्तापल्ले**
मराठी विभाग प्रमुख,
पुणे विद्यापीठ
कथाकार आणि समीक्षक



**नारायण सुर्वे**
प्रख्यात कवी



**वसंत आबाजी डहाके**
मराठीचे (निवृत्त) प्राध्यापक
कवी आणि समीक्षक



**सतीश काळसेकर**
अनियतकालिकांच्या
चळवळीतील
कवी व कार्यकर्ते



**डॉ. सुधीर पानसे**
पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक
संशोधक व लेखक



**वामन केंद्रे**
प्रख्यात नाट्यदिग्दर्शक
एन्.एस्.डी.च्या
कार्यकारिणीचे सदस्य

## महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा

— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली पंचवीस वर्षे करीत आहे. आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे. अशा रीतीने आजपर्यंत भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ऐंशी लक्ष डॉलर्सच्या देणग्या दिल्या आहेत.

*Invest in future of those with no future... So they can reinvest* हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू केली आहे.

## निवड सल्लागार समिती

## अमेरिका २००३



**दिलीप वि. चित्रे**
वास्तुविशारद, 'हिमगंध' हा कवितासंग्रह, 'ऐल तीरावर' व 'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची गुहा' हे दोन अंकी नाटक. 'कुंपणापलीकडले शेत' या प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक



**सुनील देशमुख**



**राजन गडकरी**
'लीझार्ट' या वित्तसंस्थेत अर्थविश्लेषक, ललित व वैचारिक साहित्यात मनापासून रस



**संध्या कर्णिक**
'दिवा कुणाचा तेवत राही' हा ललित लेखसंग्रह, 'साधना', 'स्त्री', 'एकता,' 'नवयुग' इत्यादी नियतकालिकांतून कथा, कविता प्रसिद्ध. फिलाडेल्फियात सामाजिक व सांस्कृतिक कार्यात सहभाग



**विद्युल्लेखा अकलूजकर**
प्राध्यापिका, 'मेरा जूता है जपानी', आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च' मेपलची पाने, कहाणी अशी चार स्वतंत्र पुस्तके, आजीच्या सुपातील मोती - *गोमंतकीय म्हणींचा कथारूप परिचय* 'विदेशिनी'. *एकता त्रैमासिकातील बक्षिसपात्र कथांचा संग्रह* - ही संपादने. 'एकता', टोरांटो या त्रैमासिकाचे दीर्घकाळ सहसंपादन. 'साप्ताहिक सकाळ'मधून 'भाषावेध' सदराचे लेखन.

# मराठी साहित्य पुरस्कार योजना

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही १९७८ साली अमेरिकेत स्थापन झालेली संस्था आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्या हलक्या करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याच्या निर्धाराने निवडक ध्येयवादी संस्थांतर्फे गरजवंतांना आर्थिक व श्रमदानाची मदत 'महाराष्ट्र फाउण्डेशन' गेली दोन दशके करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेटिकट्, यू. एस. ए. यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, महात्मा फुले, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली. ही सामाजिक प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू राहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

या योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

**महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार** मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपयांचा एक गौरव पुरस्कार.

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

**ललित साहित्यिकांच्या संदर्भात** ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त होते. ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले जाते. ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वत्रिक मानवी मूल्यांचा आविष्कार होतो. ज्यांच्या साहित्यातून मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे. अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

**वैचारिक साहित्यिकांच्या संदर्भात** इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे. त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी निःस्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे. ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे. मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे. अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

**विशेष पुरस्कार** मराठी साहित्यक्षेत्रातील एखाद्या विभागातील विशेष कामगिरीबद्दल एका व्यक्तीस रु. ५०,०००/- व मानचिन्ह असा एक विशेष पुरस्कार दिला जातो.

**वैचारिक नियतकालिकांसाठी पुरस्कार** मराठी साहित्यक्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व वैचारिक जागृती या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात वैचारिक नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्यांची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी एका नियतकालिकाला रुपये ५०,०००/- व मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात येतो.

**यासाठी** जी नियतकालिके पूर्णपणे वैचारिक असतील. (ललित साहित्य प्रकाशित करीत नसतील.) जी तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या विशेष क्षेत्रांना वाहिलेली असतील. जी शास्त्रीय दृष्टीने निःस्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील. ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल वा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल. ज्या नियतकालिकांच्याद्वारा महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित विचारवंतांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील. अशा नियतकालिकांचा विचार या पुरस्कारासाठी केला जातो. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व अमेरिकेतील 'अंतिम निवड समिती' अशा नियतकालिकाची निवड करीत असते.

**ग्रंथांसाठी पुरस्कार** समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून सहा मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,०००/- व मानचिन्ह असे सहा 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' दिले जातात. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या तीन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जातो. यामध्ये संपादित, भाषांतरित ग्रंथांचाही विचार केला जातो. गौरव पुरस्कार, विशेष पुरस्कार आणि ग्रंथ पुरस्कार यासाठी महाराष्ट्रातील २०० विचारवंत व सुजाण वाचक यांच्याकडून शिफारशी मागविण्यात येतात. या शिफारशी विचारात घेऊन 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती व्यक्ती व ग्रंथ यांची शिफारस करीत असते. अमेरिकेतील अंतिम निवड समितीकडून पुरस्कारांसाठी व्यक्ती व ग्रंथ यांची निवड केली जाते.

**कृष्णनाथ नेवरेकर** कार्यकारी विश्वस्त, केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड, मुंबई ४०० ०६२. दूरध्वनी : २८७२ ४१२३

7351

**श्री** सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी. केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम. एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे. डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.



व्यवसायात नेत्रदीपक यश मिळविणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजसेवा पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
1300, Rocrimmon Road,
Stamford, C T 06903
U.S.A.
Tel. : 203-322-0548
Fax : 203-322-1936
e-mail : sunild@aol.com

## महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कारांचे मानकरी

### गौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३

### विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत / बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी / भाषांतर १९९७
बाबुराव बागूल / दलित साहित्य १९९८
वसंत दावतर / मराठी भाषा, संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी / मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे / लोकसाहित्य २००१
दत्ता भगत / दलित साहित्य २००२
केशव मेश्राम / दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे / ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव / ग्रामीण साहित्य २००३

### प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

### वैचारिक नियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy Journal), मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१

### ग्रंथ / ललित

ताम्रपट / रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस / अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा / भाऊ पाध्ये १९९४
उद्‌काचिया आर्ती / मिलिंद बोकील १९९५
वनवास / प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता : दोन / दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त / महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत / अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र १९९८
अधांतर / जयंत पवार १९९९
कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९
तणकट / राजन गवस २०००
आतंक / विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा / श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी / ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा / राम दोतोंडे २००१
मन्वंतर / दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा / अनु. जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण / रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता / अनु : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे / शफाअत खान २००२
वकिल्या पारधी / लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन / यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस / कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा / भारत सासणे २००३
ढोलताशे / चं. प्र. देशपांडे २००३
*(रा. शं. दातार नाट्यपुरस्कार)*

### ग्रंथ / वैचारिक

आस्तिक शिरोमणी चार्वाक / आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची
सांस्कृतिक पार्श्वभूमी / गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि
सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद / रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा / जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत / गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन / सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे / मनोहर कदम १९९७
आंबेडकर / नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक / म. द. हतकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा
एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना /
संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन :
जीवन आणि साहित्य / स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र / अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी / नरेंद्र चपळगावकर २०००
मार्क्सचा मानव विचार / मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती / म.अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट / जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय / भा. ल. भोळे २००३

### ग्रंथ / अ-पारंपरिक

जिहाद / हुसेन जमादार १९९४
आक्रोश / भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया / बाबा भांड १९९६
लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन / लक्ष्मण माने १९९८

केशव गोरे स्मारक ट्रस्ट आयोजित महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार प्रदान समारंभ २००२

# प्रा. ग. प्र. प्रधान यांचे मनोगत



महाराष्ट्र फाउण्डेशनने दिलेला हा पुरस्कार अत्यंत नम्रतापूर्वक स्वीकारताना मी महाराष्ट्र फाउण्डेशनचे मन:पूर्वक आभार मानतो.

मी हायस्कूलमधील कनिष्ठ मध्यमवर्गीय विद्यार्थी होतो. त्या वेळी मध्यमवर्गाचे जीवन सुरक्षित, सुखवस्तू असायचे. साताऱ्याला असताना मी वर्गातल्या मित्रांबरोबर कर्मवीर डॉ. भाऊराव अण्णा पाटलांच्या युनियन बोर्डिंगमध्ये गेलो होतो. तिथे माझ्या वर्गातील हुशार मुलं भांडी घासतात; भाकरी करतात; उत्तम अभ्यास करतात, जात, धर्म न पाळता एकत्र राहतात; एकत्र जेवतात हे पाहिल्यानंतर माझ्या पांढरपेशा जगाच्या भिंतींना जबरदस्त हादरा बसला. हे एक विशाल जग आहे. या ठिकाणी श्रमाला प्रतिष्ठा आहे. आपण ज्या घरकुलात राहतो त्याच्यापेक्षा हे खूप वेगळे आहे, याची जाणीव त्या वेळी मला झाली. मला लहानपणापासूनच वाचनाची आवड होती. कारण माझ्या आई-वडिलांनाही वाचनाची आवड होती. माझ्या भोवताली सतत पुस्तके असायची. डोळे अधू असल्यामुळे मला फारसं काही खेळता येत नसे. त्यामुळे घरातच, पुस्तकांच्या जगातच माझे मन रमत असे. त्या वेळी पुष्कळसं वाचलं. इंग्रजी पाचवीत असताना—आता ज्याला नववी म्हणतात—पंडित जवाहरलाल नेहरूंच्या आत्मचरित्राचा नानासाहेब गोरे यांनी केलेला अतिशय सुंदर मराठी अनुवाद मला वाचायला मिळाला आणि स्वातंत्र्य चळवळीबद्दल तीव्र आकर्षण वाटायला लागले. त्यामुळे मी गांधीजींची आत्मकथा वाचली आणि वाटले हा मार्ग कठीण आहे, पण स्वातंत्र्याबद्दल तीव्र आकर्षण त्या वेळी वाटायला लागले. मी ज्या पिढीमध्ये होतो त्या आमच्या पिढीवर मॅट्रिक, एस्वाय्ला असताना भाऊसाहेब खांडेकरांचा जबरदस्त प्रभाव होता. मी ज्या वेळी 'उल्का' आणि 'दोन ध्रुव' वाचलं त्या वेळी मला वाटलं की, हे जग वेगळे आहे. हे दारिद्र्य मला माहीत नव्हतं आणि म्हणूनच स्वातंत्र्याबरोबरच या ठिकाणी समता असली पाहिजे, हा संस्कार भाऊसाहेबांच्या साहित्यातून माझ्यावर झाला, हे मी कृतज्ञापूर्वक नमूद करू इच्छितो. कॉलेजमध्ये जे मित्र लाभले त्यांच्यामध्ये केशव गोरे यांची फार तीव्रतेने मला आठवण होते. माझ्याजवळच ते रहायचे. त्यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण प्रभावी होते. आपल्यापेक्षा लहान असणाऱ्या तरुण माणसांच्या जीवनात ध्येयवादाची धग निर्माण व्हावी, अशी सामान्य इच्छा त्यांच्याजवळ होती. आम्ही त्यांना बंडू म्हणायचो. मधू लिमये यांच्यामुळे मी कॉलेजमध्ये असताना समाजवादी पक्षाच्या राजकीय अभ्यासवर्गाला जायला लागलो. आणि तिथे एसेम जोशी, नानासाहेब गोरे, अच्युतराव पटवर्धन, युसूफ मेहेरअली यांची भाषणं ऐकली. स्वातंत्र्य चळवळीत आपण राहिलेच पाहिजे आणि स्वातंत्र्य हे श्रमिकांसाठी असले पाहिजे, या तऱ्हेची शिकवण यात मिळाली. ३९-४० या कालखंडात जी भाषणं ऐकली त्यामध्ये साने गुरुजींच्या एका भाषणाचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. ते एकदा पुण्यामध्ये आले होते. त्यांच्याबरोबर फिरायला आम्ही फर्ग्युसन कॉलेजच्या मागच्या टेकडीवर गेलो होतो. साने गुरुजी प्रथम काहीच बोलत नव्हते त्यामुळे मला वाटले गुरुजी रागावलेत की काय? पण नामदार गोखल्यांच्या स्मारकापाशी आल्यावर साने गुरुजी म्हणाले, "आपण इथे बसूया." त्यानंतर ते म्हणाले, "नामदार गोखले यांनी इथे देशभक्तीची शपथ घेतली. तुम्ही मुलांनीही शपथ घेतली पाहिजे. जाहीरपणे शपथ घ्यायची नाही, कारण तुमच्या सदसद्विवेकबुद्धीवर माझा विश्वास आहे." त्या रात्री साने गुरुजी ज्या आम्हा आठ-दहा जणांशी बोलले ते आम्ही सर्वजण बेचाळीसच्या चळवळीमध्ये तुरुंगात गेलो. त्याचे उगमस्थान हे नामदार गोखलेंचे त्या ठिकाणचे स्मारक व त्यांच्या जीवनाचे साने गुरुजींनी आमच्यासमोर केलेले उदात्त चित्रण, याचाही मी कृतज्ञापूर्वक उल्लेख करतो. स्वातंत्र्य चळवळीमध्ये जेलमध्ये जायला मिळणे हे भाग्य असते. तुरुंग हे विद्यापीठच असते आणि त्या विद्यापीठामध्ये आचार्य जावडेकर, काकासाहेब गाडगीळ, आचार्य भागवत यांची व्याख्यानं आम्हाला ऐकायला मिळाली. साने गुरुजींच्या बराकीतच त्यांना काही दिवस आणून ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील संस्कार मनावर झाला. मी नेहमी सांगतो की, माझ्या सदसद्विवेकबुद्धीचे राखणदार साने गुरुजीच आहेत.

विषय, प्रलोभने येतातच. मोहाचे क्षण येणार नाहीत, अस कसं! मी एक सामान्य माणूस आहे. पण त्यांनी माझ्या सदसद्विवेकबुद्धीची राखण सतत केली. स्वातंत्र्य चळवळीतून बाहेर आल्यानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या असल्यामुळे मला नोकरी करावी लागली. फर्ग्युसन कॉलेजमध्ये मला अध्यापनाची संधी मिळाली. माझे शिक्षक आणि माझे

मला सारखे वाटायचे की, अरे! मधू लिमये इतकं काम करतो आहे, नाथ पै इतकं काम करतो आहे, यांची सगळ्यांची वाटचाल चालली आहे आणि आपल्याला चळवळीपासून दूर जावे लागत आहे. मग माझ्या मनाची तडफड होत असे. पण सुदैवानं माझ्या पत्नीनं प्रपंचाची जबाबदारी घ्यायची ठरवलं आणि मी पासष्ट साली नोकरीचा राजीनामा देऊन मुक्तपणाने समाजवादी पक्षाच्या कार्यात पुन्हा गेलो. खरोखरच हेही माझे भाग्यच आहे, असे मला वाटते. कारण तसं जर हे सगळं मिळालं नसतं तर आयुष्याच्या अखेरपर्यंत मला अध्यापनच करावं लागलं असतं. १९६५ सालापासून मला समाजवादी पक्षामध्ये सर्ववेळ काम करणे शक्य झाले. महाराष्ट्र फाउण्डेशनने जरी मला 'गौरव पुरस्कार' दिला असला, तरी माझ्या क्रियाशील राजकीय जीवनाला ४४व्या वर्षी खरी सुरुवात झाली, हे मी प्रांजळपणे सांगू इच्छितो. राष्ट्र सेवा दलात आणि समाजवादी चळवळीत जे सहकारी मला लाभले त्यांच्यामुळे मला काही वर्षे मनासारखे काम करता आले. आजच्या गौरवाचे फार मोठे वाटेकरी माझे समाजवादी साथी आहेत, याची मला पूर्णपणे जाणीव आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या मूल्यांच्या आधाराने आम्ही सर्वांनीच वाटचाल केली. ही मूल्ये चिरकालीन, अविनाशी आहेत, असे मला वाटते आणि हा 'गौरव पुरस्कार' स्वीकारण्याचा अर्थ या मूल्यांना ती अविनाशी आहेत, अशी मान्यता आपण देता आहात असे मी मानतो. महाराष्ट्र फाउण्डेशनने माझा गौरव केला असला, तरी वयोमानामुळे मला समतेसाठी चाललेल्या वेगवेगळ्या संघर्षांमध्ये सहभागी होता येत नाही. ही मर्यादा कृपया लक्षात घ्यावी. मात्र आजच्या आपल्या देशाच्या परिस्थितीबद्दल काही विचार व्यक्त करणे मला आवश्यक वाटते. आज अर्थरचनेच्या वैश्विकीकरणाच्या नावाखाली अमेरिकेसारखी धनदांडगी राष्ट्रे भारतासारख्या विकसनशील देशाचे आणि अन्य अविकसित देशांचे आर्थिक शोषण करीत आहेत आणि भारताच्या केंद्रशासनाच्या आजच्या आर्थिक धोरणांमुळे आपण आर्थिक गुलामगिरीच्या सापळ्यात सापडत आहोत, अशी भीती मला वाटते.

भारताचा मोठा आधार असणाऱ्या शेतकरी समाजाचे जीवन आज धोक्यात आले आहे. भीषण बेकारीचे सावट तरुण पिढीच्या जीवनावर पडले आहे आणि शेवटी जगावे तर लागतेच आणि जर आपल्या हाताला काम नाही, आपल्या बुद्धीला काम नाही, मग ते तरुण जर दुर्दैवाने गुन्हेगारीकडे वळले, तर त्यांना दोष देण्याऐवजी आपण याला किती जबाबदार आहोत, याचा मी विचार करतो. आणि मला खरोखर असे वाटते की, आपणही त्यांच्यामध्ये अपराधी आहोत. भारताचा विकास भारतातील कार्यक्षम व्यक्तींच्या बौद्धिक सामर्थ्याने आणि शारीरिक श्रमांनीच होऊ शकेल. हा विकास जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून भरमसाठ कर्ज घेऊन आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्प विकून टाकून होणार नाही, याचे भान आपण ठेवले पाहिजे. म्हणून आपल्याला भारतीय जनतेपुढे पर्यायी विकासनीती ठेवली पाहिजे आणि ती नीती देशाने स्वीकारावी, यासाठी संघर्ष आणि विधायक कार्य या दोन्ही मार्गांचा अवलंब केला पाहिजे. या दिशेने वाटचाल करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था आज भारतात कार्य करत आहेत, याची मला जाणीव आहे. आर्थिक आणि सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचे एक विशाल भारतीय व्यासपीठ निर्माण करावे, अशी या कार्यकर्ते आणि संस्थांना माझी नम्रतापूर्वक प्रार्थना आहे. स्वातंत्र्यलढ्यापेक्षा आजचा संघर्ष अधिक कठीण आहे. स्वातंत्र्यलढ्यापेक्षाही तो अधिक तीव्र करावा लागेल. जनआंदोलने आणि व्यापक विधायक कार्ये आणि त्याचबरोबर राजकीय सत्ता या तीन साधनांनी समाजपरिवर्तनाची वाटचाल आपल्याला करावी लागेल. जनतेला विचलित करण्यासाठी हिंदुत्वाचे आवाहन केले जात आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करू इच्छिणाऱ्या शक्ती आज आक्रमक बनल्या आहेत. त्याचबरोबर दहशतवादाचा अवलंब करणारे इस्लामी तरुण बहुसंख्य मुसलमानांचे भवितव्य धोक्यात आणत आहेत. मी स्वत: जरी भाविक नसलो तरी देव, धर्म, मस्जिद, गुरुद्वार ही जनतेची श्रद्धास्थाने आहेत, याची मला पूर्ण जाण आहे. लोकांच्या या श्रद्धास्थानांवर—मंदिरांवर, मस्जिदींवर, कुठल्याही श्रद्धास्थानांवर—कोणी जर हल्ला केला तर त्याची प्रतिक्रिया होणारच. मुस्लीम समाजाच्या नेत्यांनी या वास्तवाची जाणीव जिहादी म्हणविणाऱ्या, अनिष्ट मार्गाने जाणाऱ्या या तरुणांना दिली पाहिजे. विविधतेतून भारताची एकात्मता निर्माण झालेली आहे. ती विविधता नष्ट करू पाहणारे हे देशाचे शत्रू आहेत. त्यांच्या आक्रमक वागण्याविरुद्ध, मग ते कोणत्याही धर्माचे असोत, आपण स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. आज नेमकं तेच घडत आहे. म्हणून त्यांच्यावर टीका करण्यापेक्षा सामाजिक आणि आर्थिक समतेचा लढा जर आपण तीव्र केला, ही सकारात्मक भूमिका जर घेतली, तरच आपण त्यांना उत्तर देऊ शकू. मी जर तरुण असतो तर पुन्हा या लढ्यामध्ये पडलो असतो. मला आनंद झाला असता. स्वातंत्र्यलढ्यासारखाच हा दुसरा लढा आहे. हा समतेचा लढा आपण प्रखर केला तर खरोखर या आक्रमकतेला तोंड देता येईल, असे मला वाटते. भ्रष्टाचाराने आपला देश पोखरला आहे. सार्वजनिक जीवनातील नैतिकता उद्ध्वस्त होत आहे. आध्यात्मिक मूल्यांना श्रेष्ठ मानणाऱ्या व्यक्ती पारमार्थिक जीवनाला महत्त्व देतात, परंतु ऐहिक जीवनातील भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी त्यांची जीवनशैली पुरेशी साह्यभूत होत नाही, असे मला वाटते. ऐहिक जीवनात सामाजिक न्यायाला प्राधान्य देऊन विवेकनिष्ठ जगणाऱ्या व्यक्तीच सामाजिक जीवनातील चारित्र्याचे रक्षण अधिक चांगल्या रीतीने करू शकतील. आपल्या सार्वजनिक जीवनात नीतिमत्ता प्रस्थापित करण्यासाठी बुद्धिवादी व्यक्तींनी अधिक नेटाने प्रयत्न केले पाहिजेत, असे मला वाटते. स्त्रियांना खरी प्रतिष्ठा मिळण्यासाठी प्रदीर्घ प्रयत्न करावे लागतील. दलित, आदिवासी, भटक्या, विमुक्त जाती यांच्यावरील अन्यायाचेही निर्मूलन झाले पाहिजे. ते करण्यास माझी पिढी अपुरी पडली. समता हे मूल्य मनोमन पटल्यावर ते रुजावे म्हणून मी आयुष्यात धडपड केली. आर्थिक आणि सामाजिक समतेसाठी झालेल्या अनेक चळवळींमध्ये मी भाग घेतला. तो विचार जनमानसात रुजावा म्हणून लेखन केले, भाषणे दिली, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले. परंतु स्वातंत्र्यासाठी ज्याप्रमाणे हुतात्मे झाले त्याप्रमाणे समतेच्या प्रस्थापनेसाठी प्राणपणाने लढलो का, हा प्रश्न मी ज्या वेळी स्वत:ला विचारतो त्या वेळी मला खंत वाटते की, मी अपुरा पडलो. म्हणून माझ्या या मर्यादांची जाणीव मला हा पुरस्कार स्वीकारताना आहे.

समतेसाठी होणाऱ्या भावी संघर्षामध्ये, या रचनात्मक कार्यामध्ये आता वयोमानामुळे मला सहभागी होत येणार नाही, याची मला जाणीव आहे. परंतु असे संघर्षशील कार्यकर्ते आणि विधायक काम करणाऱ्या संस्था यांना मी सतत पाठिंबा देतो. त्यांच्याजवळ राहण्यात मला साफल्य लाभते. त्यांच्या तारुण्याचा स्पर्श माझ्या मनाला होतो. मेधा पाटकर ज्या हिरिरीने पुढे जाते ते पाहिल्यानंतर मला माझ्या मनाचा विसर पडतो. म्हणून या सर्वांबद्दल मी अत्यंत कृतज्ञ आहे आणि म्हणूनच या पुरस्काराच्या रकमेत माझे अल्पसे दहा हजार रुपये घालून ही रक्कम मी अशा निवडक संघर्षशील आणि रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थांना आणि कार्यकर्त्यांना देणार आहे. यातून मिळणारे आत्मिक मान-समाधान मला माझ्या आयुष्याच्या संध्याकाळी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने हा पुरस्कार दिल्यामुळे लाभत आहे, म्हणून त्याबद्दल मी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा आभारी आहे.

शब्दांकन : सारिका शिंदे

## महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार मानकरी १९९४-२००२



**मेघ:शाम पुंडलिक रेगे/ १९९४**
प्रख्यात मराठी तत्त्वज्ञ व्याख्याने चर्चासत्रे, लेख, यांच्याद्वारे समाजाला विविध प्रश्नांविषयी जागरूक ठेवणारे प्रबोधनकार. भारतीय असणे म्हणजे काय? तिने आधुनिकनेची आव्हाने कशी स्वीकारायला हवीत? या प्रश्नांचे उत्तम भान असणारे, सामाजिक सांस्कृतिक चळवळींशी सक्रीय नाते ठेवणारे विचारवंत.



**नारायण सुर्वे / १९९४**
जन्मदात्या आईवडिलांचा ठावठिकाणा नसलेल्या आणि त्याच्या आठव्या वर्षीच भाजीरोटीचा प्रश्न घेऊन कष्टकऱ्यांच्या जगात प्रवेश केलेल्या नारायण सुर्वे यांनी भाकरीचा चंद्र पाहणाऱ्या कष्टकरी समाजाचे दर्शन घडविणारी आणि बहुजन समाजाला संघर्षाची प्रेरणा व आत्मबळाचे भान देणारी कविता लिहिली. मराठी कवितेच्या अपुरेपणात नारायण सुर्वे यांच्या कवितानिर्मितीची प्रेरणा आहे. 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा' या कवितासंग्रहांतील कवितांमधून नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेवर आपली 'सूर्यमुद्रा' उमटवली.



**य. दि. फडके/ १९९५**
आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेणारे इतिहासकार म्हणून महाराष्ट्र आज य. दि. फडके यांना ओळखतो. संशोधन, अभ्यास, लेखन व चिंतन यांमध्ये गढून गेलेले फडके समकालीन सामाजिक व राजकीय चळवळींशी अगदी जवळून संबंधित आहेत. त्यांच्या लेखनातही सामाजिक चळवळींशी असलेली त्यांची बांधिलकी दिसून येते.



**मालतीताई बेडेकर/ १९९५**
विभावरी शिरुरकर या नावाने लिहिलेल्या मालतीबाईंच्या आरंभीच्या पुस्तकांतूनच – 'कळ्यांचे नि:श्वास' व 'हिंदोळ्यावर' – दोन वैशिष्ट्ये उठून दिसतात. एक : त्यातील निखळ वास्तवता व दोन : पूर्वीच्या लेखकांनी, लेखिकांनीसुद्धा टाळलेले स्त्रियांचे प्रश्न; मुख्यत: विवाहासंबंधीचे प्रश्न आणि वैवाहिक जीवनातील प्रश्न. मालतीबाईंनी स्त्रीच्या वैवाहिक जीवनाकडे सताड उघड्या डोळ्यांनी पाहिले आणि जे दिसले ते रंगरंगोटी न करता कथा-कादंबऱ्यांतून मांडले. परित्यक्तांचा प्रश्न हाताळणाऱ्या मालतीबाई पहिल्या असाव्यात.



**विष्णू भिकाजी कोलते/ १९९६**
महानुभाव वाङ्मयाचे थोर संशोधक म्हणून जागतिक कीर्ती लाभलेले डॉ.वि.भि. कोलते यांनी संशोधन, संपादन, काव्यलेखन, नाट्यलेखन, साहित्यसमीक्षा, प्रशासन, अध्यापन अशा विविध क्षेत्रांमध्ये आपल्या प्रतिभेच्या, कर्तृत्वाच्या आणि प्रज्ञेच्या खुणा उमटवल्या. डॉ. कोलते यांनी प्राचीन ग्रंथांच्या संपादनशास्त्रात एक नवे युग निर्माण केले. 'लीळाचरित्र' हा चक्रधरांचा चरित्रग्रंथ व प्रवासग्रंथ चोखंदळपणे संपादित करून डॉ. कोलते यांनी मराठीच्या देशी-विदेशी अभ्यासकांना कायमचे उपकृत करून ठेवले आहे.



**श्री.ना. पेंडसे/ १९९६**
'गारंबीचा बापू', 'हत्या', 'कलंदर', 'रथचक्र', 'लव्हाळी', यांसारख्या कादंबऱ्यांनी श्री. ना. पेंडसे यांना स्वातंत्र्योत्तर काळातील एक श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून स्थान दिले आहे. कथा, कादंबरी, नाटक अशा अनेक साहित्यप्रकारांतून विपुल आणि दर्जेदार लेखन करणाऱ्या पेंडसे यांना माणुसकीची प्रचंड जाण आहे. विराट जीवनाच्या आकलनाच्या दिशेने जाऊ शकतील, अशा कादंबऱ्यांची पूर्वतयारी त्यांच्या कादंबऱ्यांनी केली.

## गौरव पुरस्कार



**गो.वि. तथा विंदा करंदीकर/ १९९७**
गेल्या पंचेचाळीस वर्षांच्या लेखनामध्ये विंदा करंदीकरांनी काव्य, ललित निबंध, साहित्य-चिंतनपर निबंध, अनुवाद अशा अनेक साहित्यप्रकारांतून लेखन केले. 'स्वेदगंगा', 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' हे काव्यसंग्रह आणि बालकविता यात ते जो प्रचंड छेद देतात त्याचे आश्चर्य वाटते. 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', 'किंग लियर' आणि गटेच्या 'फाउस्ट'च्या पहिल्या भागाचा अनुवाद लक्षणीय आहे. निसर्गातील घटनांचे, घडामोडींचे, तथ्यांचे प्रतीतिकारक विराट मानवीकरण विंदांच्या कवितेला 'महाकाव्यीय' रूप देते.



**विजय तेंडुलकर/ १९९८**
मराठी नाटकाला भारतीय पातळीवर नेणारे नाटककार. संपादक, पत्रकार, स्तंभलेखक, श्रुतिका-एकांकिका लघुकथा, नाटिका लिहिणारे लेखक. वैचारिक, समीक्षात्मक लेखन करणारे विचारवंत, मुलाखती देणारे आणि घेणारे मुलाखतकार, चित्रपट-चित्रवाणी ह्या माध्यमांसाठी लिहिणारे लेखक आणि कुशल तंत्रज्ञ, सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक घडामोडींत वावरणारे वक्ते.



**वसंत पळशीकर/ १९९७**
वसंत पळशीकर हे अस्सल विचारवंत आहेत. १९६७ साली 'समाज प्रबोधन पत्रिके'चे संपादक म्हणून ते सुशिक्षित महाराष्ट्राला परिचित झाले. भारतीय समाजाची आजपावेतो होत असलेली घडण आणि आज त्याच्यापुढे ठाकलेले प्रश्न हा वसंतरावांचा अभ्यासाचा आणि चिंतनाचा मध्यवर्ती विषय आहे. आज महाराष्ट्रात जे घडते आहे; त्यामागे कोणत्या प्रेरणा, आकांक्षा, विचारप्रणाली, कुणाचा कोणत्या स्वरूपाचा स्वार्थ, तडजोडी, दडपण, असहाय्यता आहे, ह्याचे त्यांना यथातथ्य ज्ञान आहे.



**पु.ल. देशपांडे/ १९९९**
पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्रभर पसरलेल्या मध्यमवर्गीय माणसांची सुखदु:खे समरसतेने जाणली आणि सहृदयतेने चित्रित केली. ह्या वर्गाचे इतके आत्मीयतेने निरीक्षण करणारा हा लेखक विरळाच आहे. त्यांनी वरिष्ठ वर्गातील गुणी व्यक्तींच्या गुणांची योग्य कदर केली. पण त्या वर्गातील माणसांची, त्यांच्यातील दंभाची, आत्मतृप्तीची, प्रदर्शनप्रियतेची, प्रसंगी श्रेष्ठ विनोदकाराला आवश्यक असलेली करुणार्द्र दृष्टी बाजूला ठेवून केली.



**रा.भा. पाटणकर/ १९९८**
पाटणकरांना 'मायक्रो' (सूक्ष्म) पेक्षा 'मॅक्रो' (स्थूल) संशोधन अधिक प्रिय आहे. डॉ. रा. भा. पाटणकर यांच्या 'सौंदर्यमीमांसा' ह्या पहिल्याच ग्रंथाला 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार मिळाला. 'सौंदर्यमीमांसा'मध्ये त्यांनी द्विध्रुवात्मकतेच्या सिद्धान्ताची मांडणी केली. फ्रॉईड, मार्क्स, शंकुक ह्यांच्या सिद्धान्ताचे स्वतंत्रपणे केलेले विश्लेषण त्यात आढळते. अँटी-इंटेलेक्चुअल वातावरणात तात्त्विक चर्चा करणारे लेखन उपहासाचा विषय ठरते; हे माहीत असूनही त्यांनी हा ज्ञानमार्ग सोडला नाही.



**भालचंद्र नेमाडे/ २००१**
कादंबरी, कविता आणि समीक्षा या तिन्ही क्षेत्रांमध्ये आपल्या स्वतंत्र प्रतिभेचा आणि मौलिक संवेदनशीलतेचा प्रभावी आविष्कार करून भालचंद्र नेमाडे यांनी मराठी साहित्यात स्वत:चे एक नाणे पाडले आहे. मराठी कादंबरीत अभूतपूर्व ठरावे असे चिंतन 'कोसला' या कादंबरीत आहे. 'मेलडी', 'देखणी' या संग्रहातल्या कविता अभिजात अवैयक्तिकता व्यक्त करणाऱ्या आणि स्थानिक संस्कृतीबरोबरच वारकरी परंपरेतील विठ्ठलाशी नाते जोडणाऱ्या आहेत. 'टीकास्वयंवर'मधली समीक्षा समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, इतिहास, तौलनिक साहित्य या सर्वांच्या अभ्यासातून निर्माण झालेले प्रदीर्घ सांस्कृतिक चिंतन आहे.



**रा.चिं ढेरे/ २०००**
रा. चि. ढेरे हे मराठी साहित्य, लोकसंस्कृती, दैवते, संतसाहित्य, धार्मिक संप्रदाय यांचे थोर अभ्यासक आणि संशोधक आहेत. मध्ययुगीन मराठी साहित्य हे त्यांच्या संशोधनाचे आणखी एक क्षेत्र आहे. त्यांच्या संशोधनामुळे प्राचीन वाङ्मयातील विविध संप्रदाय, त्यांचे अंत:संबंध यांच्यावर नवा प्रकाश पडतो. डॉ. ढेरे यांच्या आजवरच्या ग्रंथांची संख्या शंभरपर्यंत गेली आहे.



**ग.प्र. प्रधान/ २००२**
राष्ट्र सेवा दल, समाजवादी चळवळ, 'साधना' साप्ताहिक यांच्या वाटचालीतील एक महत्त्वाचे शिलेदार, निर्मळ मनाचे संवेदनशील साहित्यिक, सहकाऱ्यांवर प्रेम करणारे चारित्र्यसंपन्न कार्यकर्ते आणि कृतिशील विचारवंत म्हणून प्रा. ग. प्र. प्रधान महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. आपल्या लिखाणांतून न्याय, समता आणि बंधुभाव व जीवनमूल्यांचा वाचकांच्या मनावर संस्कार व्हावा, ही त्यांच्या लिखाणामागील प्रमुख प्रेरणा आहे. 'स्वातंत्र्यसंग्रामाचं महाभारत', 'सोनार बंगला', 'साता उत्तरांची कहाणी', 'भाकरी आणि स्वातंत्र्य' आदी पुस्तके या हेतूची ग्वाही देतात.

## विशेष पुरस्कार



**रा. भागवत/ १९९६**
पत्र व्यवसायापासून
नाला सुरुवात करून
:च्या खास विनोदी,
वनात्मक लेखनशैलीचा
त्र ठसा निर्माण करणाऱ्या
रा. भागवतांनी मुलांसाठी
, कादंबरी, नाटक, कविता
ा प्रकारांतून विपुल लेखन
. 'रॉबिनहूड', 'ॲलिस इन
लँड' ह्यांसारख्या जगप्रसिद्ध
कृतींची आणि देशोदेशींच्या
कथांची भाषांतरे आणि
तरे केली.



**उमा विरूपाक्ष कुलकर्णी/ १९९७**
उमा विरूपाक्ष कुलकर्णी यांनी भाषांतर क्षेत्रावर आपल्या प्रज्ञा-प्रतिभेने वर्चस्व मिळवलेले आहे. कन्नडमधून मराठीमध्ये आलेल्या अनुवादित साहित्यात भैरप्पा, कारंथ, पूर्णचंद्र तेजस्वी आणि इतर लेखकांच्या कादंबऱ्यांसोबत अनेक लघुकथांचे अनुवादही उमा कुलकर्णी यांनी पुरेशा संख्येने केले आहेत. गेल्या तीन-चार वर्षांत त्यांनी नाटकांचाही अनुवाद करण्याचे काम सुरू केले आहे.



**बाबुराव बागुल/ १९९८**
बाबुराव हे आंबेडकरनंतरच्या पिढीतले अग्रगण्य दलित विचारवंत आहेत. त्यांची जडणघडण मुंबई महानगरात झालेली आहे. त्यांनी आपल्या प्रतिभेतून आणि निरीक्षणातून कंगालाच्या दैनंदिन जीवन-संघर्षातल्या हिंसेचा आणि हिंस्र स्वार्थाचा वेध घेतला.
कथा, कादंबरी, वैचारिक लेख अशा साहित्यप्रकारांतून त्यांनी लेखन केले. 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या त्यांच्या कथासंग्रहांच्या निवेदनशैलीची धार सामाजिक वास्तवाच्या तळापर्यंत छेद देणाऱ्या भेदक आणि तरीही सहानुभूतीक्षम आकलनशक्तीतून आलेली आहे.



**वसंत दावतर/ १९९९**
संशोधक, संपादक, समीक्षक आणि भाषातज्ज्ञ तसेच वाङ्मयाचे एक जाणकार. 'आलोचना' या केवळ समीक्षेला वाहिलेल्या मासिकाचे संस्थापक म्हणून वसंत दावतर हे नाव अत्यंत सन्मानाने घेतले जाते. समकालीन साहित्यव्यवस्थेतील प्रस्थापित विचार, व्यक्ती वा संस्था यांचा अनुनय न करता साहित्य-समीक्षेच्या क्षेत्रात 'आलोचने'ने वस्तुनिष्ठतेची, तर्कनिष्ठतेची, शिस्तीची कास धरली.



**रा.वि. सोवनी/ २०००**
जीवशास्त्राचे प्राध्यापक रा. वि. सोवनी यांनी विज्ञानाला पाठ्यपुस्तकातून बाहेर काढून माणसाच्या जीवनात गुंफण्याचे मोठे कार्य केले. सोवनी लिहितात तेव्हा त्यांना विषय समजलेला असतो आणि मोजक्या, कमी शब्दांत तसेच सांगितलेल्या वेळात ते लिहू शकतात.
सोवनी यांनी विज्ञान लोकांसमोर ठेवले. दैनंदिन जीवनामध्ये घडणाऱ्या गोष्टी लोकांसमोर ठेवल्या व त्या बाजूने विज्ञान लोकांना सांगितले.



**गंगाधर मोरजे/ २००१**
डॉ. गंगाधर नारायण मोरजे यांच्या लेखनाचा कल अधिकतर 'लोकसंबंधी' आहे. डॉ. मोरजे हे केवळ पुस्तकांवर अवलंबून राहणारे अभ्यासक, संशोधक नाहीत. अनेक ठिकाणे, अनेक परंपरा, अनेक संप्रदाय यांच्या अनुषंगाने ते लोकसाहित्यदर्शन घडवतात. 'मराठी लावणी वाङ्मय', 'लोकसाहित्य : बदलते संबंध : बदलती रूपे', 'लोकसाहित्य : क्षेत्रीय अभ्यास' यांसारख्या २३ स्वतंत्र प्रकाशित ग्रंथांमधून आणि ६० प्रकाशित शोधनिबंधांमधून डॉ. मोरजे यांच्या अभ्यासाचे पुरोगामित्व अधोरेखित झाले आहे.



**दत्ता भगत/ २००२**
मराठी साहित्य, समीक्षा आणि शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या आणि कथा, समीक्षा, अनुवाद, अशा प्रकारांतून लेखन करणाऱ्या दत्ता भगतांनी एकांकिका आणि नाटकांद्वारे दलित रंगभूमीवर आपला वेगळा ठसा उमटविला आहे. 'आवर्त', 'चक्रव्यूह' आदी एकांकिकासंग्रहांतून किंवा 'खेळिया', 'वाटा-पळवाटा', 'अश्मक' यांसारख्या नाटकांमधून दत्ता भगत दलित आणि सवर्णांच्या विविध वृत्ती-प्रवृत्तींचा व त्यातील अंतर्गत विसंगतींचा वेध घेतात.



**केशव मेश्राम/ २००२**
'उत्खनन', 'जुगलबंदी' आदी पाच कवितासंग्रह, 'हकिकत व जटायू', 'पोखरण', अशा दोन कादंबऱ्या; 'खरवड' 'खांडववन' आदी आठ कथासंग्रह; ललितगद्य, समीक्षा, संपादने, संशोधनपर लेखन अशा विपुल आणि दर्जेदार लेखनाने प्रा. केशव मेश्राम यांनी दलित साहित्याला एक नवा चेहरा दिला.
अत्यंत आत्मरत असूनही सामाजिक बांधिलकी आग्रहपूर्वक मानणाऱ्या या साहित्यकाच्या साहित्याला जीवनाच्या विचित्र, विपरीत आणि अनेकपदरी आशयाचा शोध घेणाऱ्या आत्मशोधक वृत्तीने व्यापून टाकले आहे.

## प्रकाशन संस्था

**पॉप्युलर प्रकाशन, मुंबई/ १९९४**
१९५२ पासून ललित वाङ्मयाच्या प्रकाशनाला सुरुवात झाल्यापासून 'पॉप्युलर'ने सातत्याने उत्तमोत्तम आणि विविध प्रकारच्या ललित साहित्यकृतींचे प्रकाशन केले आहे. १९६० नंतरचे महत्त्वाचे साहित्यिक 'पॉप्युलर प्रकाशनाने मराठी वाचकांसमोर आणले आहेत.
साहित्यकृतीचा/साहित्याचा अस्सलपणा (originality) ही गोष्ट 'पॉप्युलर'ने अत्यंत महत्त्वाची मानली आहे.

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे/ १९९५**
१ जून १९३८ रोजी गोपाळ पाटणकर, जनार्दन महाजन व अनंत कुलकर्णी यांनी 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन' ही संस्था सुरू केली. १९४१ पासून अनंत कुलकर्णी हे एकटेच मालक राहिले आणि खऱ्या अर्थाने त्यांनीच ही संस्था नावारूपाला आणली.
साहित्यप्रेमी सुजाण वाचकवर्गाच्या आवडीकडे लक्ष देऊन 'कॉन्टिनेन्टल'ने मराठीतल्या जवळ जवळ सर्वच महत्त्वाच्या साहित्यिकांचे कथासंग्रह, कादंबऱ्या, नाट्यरूपांतरे, प्रहसने, आत्मचरित्रे प्रसिद्ध केली, पण त्याबरोबरच नामवंत अशा भारतीय आणि अभारतीय साहित्यिकांच्या कृतींचे अनुवादही प्रसिद्ध केले.

**देशमुख आणि कंपनी, पुणे/ १९९६**
संस्थापक राम जयवंत (रा.ज.) देशमुख ह्यांनी १९३८ साली स्थापन केलेल्या देशमुख आणि कंपनीने राजकारण, सांस्कृतिक जीवन, सामाजिक समस्या, इतिहास, व्याकरण अशा विषयांवरच्या ललित आणि ललितेतर मराठी साहित्याच्या प्रकाशनाबरोबरच विद्यापीठीय स्तरांवरचे काही इंग्रजी ग्रंथ आणि 'मंगल वाचन'सारखी क्रमिक पुस्तकांची मालिकाही निर्माण केली.

**मौज प्रकाशन, मुंबई/ १९९७**
१९५० साली मौज प्रकाशन गृहाचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. अनेक नामवंत आणि नव्या प्रतिभावान लेखकांचे कथा, कादंबरी, कविता, नाटके, एकांकिका, चरित्र-आत्मचरित्र, समीक्षा असे विविध वाङ्मय मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केले. मराठी साहित्यातील प्रयोगशीलता व अतिशय नेटकी निर्मिती या गुणांशी 'मौज'चे नाते निगडित झाले आहे. 'मौज' साप्ताहिक (आता वार्षिक) आणि 'सत्यकथा' मासिक यांची निर्मिती हे 'मौज'चे कार्य मराठी सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे मानले गेले आहे.

**साधना प्रकाशन, पुणे/ १९९८**
१५ ऑगस्ट १९४८ रोजी 'साधना'चा अंक संस्थापक साने गुरुजी यांनी प्रसिद्ध केला आणि लगेचच 'साधना प्रकाशना'च्या पुस्तकांना सुरुवात झाली. साने गुरुजींची 'बापूजींच्या गोड गोष्टी - सहा भाग, 'धडपडणारी मुले', 'श्यामची पत्रे', 'साक्षरतेच्या कथा', यांसोबत 'साधना प्रकाशना'ने आजवर ललित साहित्यातील नवीन प्रवाहांचा आविष्कार करणारी चरित्रे, कथा, निबंध आणि समाजाचे प्रबोधन करणारे कसदार वैचारिक साहित्य प्रसिद्ध केले.




**नवभारत, वाई/ १९९४**

ऑक्टोबर १९४७ पासून प्रसिद्ध होणाऱ्या 'नवभारत'च्या स्थापनेमागे शंकरराव देव व हरिभाऊ मोहनी यांची प्रेरणा व प्रयत्न होते. व्यक्तिविकास, समाजाची धारणा व उत्कर्ष यांचा समन्वय घालून सत्य, शिव, सुंदर यांचा साक्षात्कार करून घेण्याचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न 'नवभारत' करते. भारतीय समाज, संस्कृती, इतिहास-परंपरा, भारताची सद्य:स्थिती व भावी जडणघडण, विज्ञान-तंत्रज्ञान, कला व साहित्य या विषयांवरील वैचारिक लेखन 'नवभारत' प्रसिद्ध करते.




**आजचा सुधारक, नागपूर/ १९९४**

एप्रिल १९९० मध्ये प्रा. दिनकर देशपांडे यांनी नागपूर येथून 'आजचा सुधारक' हे मासिक आगरकरांचे अपुरे राहिलेले काम पुढे चालू ठेवण्यासाठी सुरू केले. अर्वाचीन सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रश्नांसंबंधी तात्त्विक-सैद्धांतिक पातळीवर विचारमंथन करण्याचे मौलिक कार्य हे मासिक करीत आहे. विवेकवादाखेरीज व्यक्तिस्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी मूल्यांचे विवेचन आणि समर्थन या नियतकालिकाला अभिप्रेत आहे.




**मराठी संशोधन पत्रिका, मुंबई/ १९९४**

'मराठी संशोधन मंडळा'चे मुखपत्र म्हणून 'मराठी संशोधन पत्रिका' या त्रैमासिकाचा प्रारंभ ऑक्टोबर १९५३ मध्ये झाला. प्रा. प्रियोळकर हे पत्रिकेचे संस्थापक-सदस्य होते. ध्येय होते : शोध आणि ज्ञानप्रसार. प्राचीन/मराठी साहित्याविषयीचे संशोधनपर लेख, संशोधनपर लेख, संशोधित काव्यग्रंथ, मध्ययुगातील ख्रिस्ती धर्मीयांचे अप्रकाशित वाङ्मय, मुसलमानांची जुनी कविता यांचे प्रकाशन या त्रैमासिकाने केले.




**समाज प्रबोधन पत्रिका, पुणे/ १९९५**

'समाज प्रबोधन संस्थे'चे 'समाज प्रबोधन पत्रिका' हे नियतकालिक १९६४ पासून विवेकनिष्ठ विचारपद्धती, लोकशाही जीवनदृष्टी, मानवतावादी दृष्टिकोण, अपक्ष भूमिकेने लोकशिक्षण ही उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून सुरू झाले. जमातवाद, जातीचा प्रश्न, आर्थिक स्थित्यंतर, शेतकरी चळवळ या विषयांवरील लेखांसोबतच राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांतील आजच्या व उद्याच्या समस्यांची सर्वांगाने चिकित्साही 'समाज प्रबोधन पत्रिके'त मिळते.

## वैचारिक नियतकालिके




**भाषा आणि जीवन, पुणे/ १९९५**

'मराठी अभ्यास परिषदे'चे 'भाषा आणि जीवन' हे नियतकालिक जुलै १९८३ पासून प्रसिद्ध होत आहे. भाषेसारख्या सर्वस्पर्शी आणि अत्यंत मूलभूत गोष्टीच्या अभ्यासाला वाहून घेतलेले हे एकमेव नियतकालिक आहे. मराठी भाषेविषयी आस्था असणाऱ्या प्रत्येक वाचकाला अनेक पातळ्यांवर सतत काहीतरी वेगळे आणि नवे असे हे नियतकालिक देत असते.




**विचारशलाका, लातूर/ १९९५**

प्रा. नागोराव कुंभार यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्थापन केलेल्या सामाजिकशास्त्र, संशोधन आणि समाजविकास प्रतिष्ठानचे 'विचारशलाका' हे त्रैमासिक १९८७च्या मध्याला सुरू झाले. हे नियतकालिक केवळ वैचारिक लिखाण प्रसिद्ध करणारी पत्रिका आहे. न्याय, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समता अशा विषयांवरचे विशेषांक प्रसिद्ध करण्याबरोबरच परिवर्तनाची गती वाढविण्याच्या उद्दिष्टाने 'प्रौढ शिक्षण', 'शैक्षणिक समस्या', 'भूकंप', 'बहुजन महासंघ' असे 'विचारशलाका'चे विशेषांकही प्रसिद्ध झाले आहेत.




**अर्थसंवाद, कोल्हापूर/ १९९६**

'अर्थसंवाद' हे 'मराठी अर्थपरिषद' या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र १९७७ पासून म्हणजे परिषदेच्या स्थापनेपासून प्रसिद्ध होत आहे. अर्थशास्त्र हा विषय शक्यतो सर्व पातळीवर मराठी भाषेत प्रसृत करणें या 'अर्थशास्त्र परिषदे'च्या संकल्पानुसार 'अर्थसंवाद' चे कार्य सुरू आहे. अर्थशास्त्रीय विचार आणि माहिती मराठीतून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या जिज्ञासू लोकांप्रमाणेच अर्थशास्त्राचे प्राध्यापक व विद्यार्थी यांनाही अत्यंत उपयुक्त असे कार्य 'अर्थसंवाद' करीत आहे.




**संशोधक, धुळे/ १९९६**

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या स्मरणार्थ स्थापन करण्यात आलेल्या 'राजवाडे संशोधन मंडळ' या संस्थेतर्फे १९३२ पासून हे त्रैमासिक प्रसिद्ध होत आहे. अनेक महत्त्वाच्या विषयांवर ख्यातनाम विचारवंतांचे लेखन 'संशोधक'मध्ये सातत्याने प्रसिद्ध होत असते.




**पंचधारा, हैदराबाद/ १९९७**

१९५८ साली हैदराबादमधील प्रा. भा. शं. कहाळेकर, प्रा. रा. ब. माढेकर आणि डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी 'आंतरभारती'ची दृष्टी स्वीकारून 'पंचधारा' हे मराठी साहित्य परिषद (आंध्र प्रदेश) या संस्थेचे मुखपत्र सुरू केले. सतत नवनिर्मिती आणि तिचाच अखंड ध्यास, भारतीय साहित्याची एकात्मता आणि मूळ मराठीचे अध्ययन-संशोधन या तीन सूत्रांच्या आधारे महाराष्ट्राबाहेरील प्रदेशात एक दर्जेदार, वैचारिक आणि वाङ्मयीन नियतकालिक म्हणून 'पंचधारा'चा लौकिक आहे.




**परिसर-वार्ता, पुणे/ १९९७**

प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली १९८२ साली स्थापन झालेल्या 'परिसर' या संस्थेच्या 'परिसर-वार्ता'चा पहिला अंक ऑगस्ट १९८६ मध्ये प्रकाशित झाला. जागतिक पर्यावरण प्रश्नांबरोबर आपल्या देशातील भोपाळ दुर्घटना, सरदार सरोवर, नर्मदा धरण, एन्रॉन प्रकल्प, हिमालयातील जंगलतोड, किरणोत्सारी प्रदूषणाच्या प्रश्नांवर लिहिलेले लेखही 'परिसर वार्ता'मध्ये प्रसिद्ध होत असतात.



**मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई /१९९८**

१९६८ पासून प्रसिद्ध होत असलेल्या 'मराठी विज्ञान परिषदे'च्या या वार्तापत्रातून महाराष्ट्रातील आघाडीच्या वैज्ञानिकांचा परिचय, महाराष्ट्रातील विज्ञानसंस्थांची माहिती, मराठीतील विज्ञानविषयक पुस्तकाची सूची आणि परीक्षणे, नवीन संशोधनांची माहिती, विज्ञानपर ललित लेखन अशा अनेक स्वरूपाचे साहित्य प्रसिद्ध होत असते. 'पत्रिके'तील लेखांतून अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोणाचा प्रसार करण्याचा प्रयत्न असतो.



**पुरोगामी सत्यशोधक, पुणे/ १९९८**

'महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान'चे मुखपत्र असलेल्या 'पुरोगामी सत्यशोधक' या त्रैमासिकाने डिसेंबर १९९८ मध्ये २५ व्या वर्षात पदार्पण केले. दलितांवरील अत्याचार आणि न्यायासाठी केलेले संघर्ष, 'एक गाव, एक पाणवठा' मोहीम, मागास जातिसमूहांचे सांस्कृतिक जीवन, सामाजिक विषयांचे रिपोर्ताज अशा अनेक विषयांतून परिवर्तनवादी चळवळींचा 'पुरोगामी सत्यशोधक'ने पाठपुरावा केला आहे.



**ताज, मुंबई/ १९९९**

१९९१ साली डॉ. सुरेंद्र बारलिंगे, आचार्य नारायण देसाई, प्रा.वि.मा. शिर्के आदी मंडळींनी एकत्र येऊन Thinker's Academy Bombay ही संस्था स्थापन केली. महाराष्ट्रातील विचारवंतांची वैचारिक देवाणघेवाण व्हावी, वैचारिक नाते जोडता यावे, समाजातील निरनिराळ्या वैचारिक पातळीवरील लोकांशी हितगूज साधता यावे या उद्देशाने 'Thinker's Academy Journal १९९२ साली प्रकाशित झाले. हीच आद्याक्षरे एकत्रित करता TAJ गवसला.



**सृष्टिज्ञान, पुणे/ २०००**

सुबोध मराठी भाषेतून विज्ञान आणि तदनुषंगी तंत्रज्ञान ह्या विषयांची माहिती सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने 'सृष्टिज्ञान' हे नियतकालिक १ जानेवारी १९२८ रोजी सुरू झाले भारतातील उद्योगधंदे, नवे शोध, मनोरंजक शास्त्रीय माहिती शास्त्रज्ञांची चरित्रे, वैज्ञानिक छंद, दैनंदिन व्यवहारातील विज्ञानबुद्धीला खाद्य पुरविणारे कुट प्रश्न, टपाल तिकिटातून विज्ञान, गणिताच्या गंमती अशा अनेक रंजक प्रकारातून विज्ञानविषयक माहिती देऊन मराठीतून विज्ञानप्रसार करण्याचे कार्य 'सृष्टिज्ञान' करीत आहे.




**बायजा, पुणे/ २००१**

१ जानेवारी १९७७ पासून 'बायजा' मासिकाने आपली वाटचाल सुरू केली. पददलित स्त्रिया तसेच मध्यमवर्गीय स्त्रिया यांच्या समस्या आणि अनुभव मांडतानाच त्यांचे धागेदोरे प्रस्थापित व्यवस्थेशी कसे आहेत, हे दाखवून देत 'बायजा' उभे राहिले. हे नियतकालिक स्त्रियांवर-विशेषत: परिघाबाहेरील स्त्रियांवर-होणाऱ्या अन्याय-अत्याचारांविरुद्ध आवाज उठवण्याची भूमिका घेते. तसेच विषमतेवर आधारित व्यवस्थेचेही नेमके भान ठेवते.

## ग्रंथ / ललित



**थ पठारे/ १९९४**
थ पठारे यांची 'ताम्रपट'
ादंबरी विशाल व्यापक
नसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर
लखीतपणे विराजमान
गाऱ्या मूलभूत, सनातन
ी करुणेचे दर्शन
णारी आहे. नाना सिरूर या
ंत्रसैनिकाच्या
नपटाच्या साहाय्याने
स वर्षांच्या कालखंडातील
निक समाजजीवनातील
ंत तिच्या राजकीय,
जिक, धार्मिक, वैचारिक
अनेक स्तरांसह आणि
या बदलत्या रूपांसह कवेत
चा प्रयत्न करणारी ही
री आहे.



**अनुराधा पाटील/ १९९४**
अनुराधा पाटील यांच्या 'दिवसेंदिवस'मधील कविता त्यांची स्वत:ची असून तिचं स्वरूप स्वत:शी केलेला संवाद असं आहे. तरीही ही कविता जीवनगतीची अनिवार्यता आणि काव्यगतीची दिशा एकत्र बनून पूर्ण होते. हे वैयक्तिक किंवा सामाजिक वास्तव नसून परिस्थितीच्या भानातून येणारं विकल्पन आहे.



**भाऊ पाध्ये/ १९९५**
भाऊ पाध्ये यांचे कथालेखन हे जीवनदृष्टी, अनुभवांचे स्वरूप, संवेदनांचा पोत, प्रस्तुतीकरणातील वैशिष्ट्ये आणि शैली या सर्वच दृष्टींनी आगळे आणि डोळ्यांत भरणारे आहे.
ते जीवनानुभवाच्या महत्तेमुळेही प्रभावित करणारे आहे. भाऊ पाध्ये कथा लिहिताना जीवनाच्या कुठल्याही क्षणाला हात घालतात आणि वाचकांपुढे तो राकट व ठोस निवेदनातून प्रभावीपणे मांडतात. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी संपादित केलेल्या 'भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा'मधून या सर्व वैशिष्ट्यांचा अनुभव येतो.



**मिलिंद बोकील/ १९९५**
'उदकाचिया आर्ती' या मिलिंद बोकील यांच्या कथासंग्रहातील कथांना १९८०च्या दशकातील बदलत्या कालभानाचे आणि बदलत्या समाजवास्तवाचे परिप्रेक्ष्य लाभलेले आहे. त्यांच्या कथेचा प्रवास आघातजन्य अवस्थेतून सर्जनशीलतेकडे झालेला आहे. त्यांच्या कथेतील व्यक्तींचे नाते विशाल सामाजिक अनुभवाशी जुळत जाते. समकालीन महाराष्ट्राचे सामाजिक जीवन हाही बोकील यांच्या कथेतील एक अविभाज्य असा घटक आहे.



**प्रकाश नारायण संत/ १९९६**
वनवास : प्रकाश नारायण संत यांच्या 'वनवास' या कथासंग्रहात लंपन हा बारा ते चौदा वर्षांचा पौंगडावस्थेतला मुलगा केंद्रस्थानी व निवेदकाच्या भूमिकेत आहे. अंतर्मनात एक प्रकारची असुरक्षितता असलेला लंपन हा पोरवयाचा आदिबंध आहे. 'वनवास'मधील कथांची शैली लंपन, संत व लेखक यांच्या शैलींची त्रिविधता पार करून अनेकविध होणारी आहे.



**दिलीप पुरुषोत्तम चित्रे/ १९९६**
मर्ढेकर-मुक्तिबोधोत्तर पिढीतील दिलीप पुरुषोत्तम चित्रे हे एक अग्रगण्य कवी आहेत. 'एकूण कविता - २' ह्या संग्रहातील कवितांचा पैस आणि आवाका विस्तृत आहे. कोणतीही कविता ही एक रूपाकृती आहे आणि एक संरचना आहे ह्याचे पक्के भान चित्रे यांच्या कवितेतून जाणवते. आपल्या मातीत मुळे रुजवून विश्वाच्या अवकाशात विस्तारत जाणारी ही कविता स्वतंत्र प्रज्ञेची आहे.



**महेश एलकुंचवार/ १९९७**
आजच्या आधुनिक भारतीय नाटककारांपैकी एक अग्रगण्य नाटककार असलेल्या महेश एलकुंचवार यांच्या 'युगान्त' या नाटकामधील काळ हा 'उद्या किंवा भविष्यकाळात केव्हाही मानवाच्या वाट्याला येईल' असा आहे. आजच्या माणसाने व्यक्तिगत, भौतिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात निर्माण केलेल्या अफाट वाळवंटाकडे हे नाटक निर्देश करते.



**अनिल अवचट/ १९९८**
अनिल अवचट यांच्या 'कार्यरत' मध्ये आलेल्या विविध क्षेत्रांत जिद्दीने काम करणाऱ्या कर्मयोग्यांच्या कहाण्या वाचकाला अंतर्मुख करून आत्मशोध घ्यायला प्रवृत्त करतात. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, अनलंकृत प्रभावी ओघवती शैली यामधून साकार झालेलं हे पुस्तक मराठी वाङ्मयातील एक वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक ठरले आहे.



**अंबरीश मिश्र/ १९९८**
अंबरीश मिश्र यांच्या 'शुभ्र काही जीवघेणे'मध्ये आयुष्यातील चढउतारांमुळे प्रतिभा म्लान न झालेल्या आणि जगण्याची रग न ओसरलेल्या सात कलावंतांच्या जगावेगळ्या आयुष्याच्या कहाण्या आहेत. शब्दांची अचूक निवड, समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घडामोडींच्या नोंदी, मिताक्षरी शैली यामुळे हे पुस्तक इतरांना समृद्ध करते.



**जयंत पवार/ १९९९**
जयंत पवार या तरुण नाटककाराने 'अधांतर' ह्या नाटकात बदलता गिरणगाव, तिथल्या माणसांचे उद्ध्वस्त आणि आधार हरवलेले अधांतरी जीवन, आर्थिक विषमतेमुळे तेथे चंगळवादाने केलेला प्रवेश, परिस्थितीमुळे अगतिक, असहाय्य झालेल्या काही जणांनी आर्थिक संपन्नतेसाठी स्वीकारलेले गुन्हेगारी मार्ग आणि या साऱ्यांमधून नैतिक मूल्यांची, एका जीवनपद्धतीची होणारी पडझड असा जीवनानुभव भेदकपणे आणि प्रत्ययकारकरीत्या साकार केलेला आहे.



**मंगेश पाडगावकर/ १९९९**
जागतिक स्तरावरील श्रेष्ठ संतकवी कबीर यांच्या निवडक काव्याचा सर्जनशील अनुवाद करून कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी अत्यंत मोलाचे साहित्यिक व सांस्कृतिक उत्तरदायित्व यशस्वीपणे निभावले आहे. त्यांनी येथे अत्यंत अभ्यासपूर्ण, सूत्रबद्ध, विश्लेषणात्मक आणि साक्षेपी 'मुक्तचिंतन' सुरुवातीलाच जोडले आहे. त्यायोगे संतसाहित्यसमीक्षेत मोलाची भर पडली आहे.



**राजन गवस/ २०००**
राजन गवस यांनी 'तणकट' ह्या त्यांच्या कादंबरीद्वारे मराठी साहित्यात प्रथमच गाव, महारवाडा या साऱ्यांना आपल्या आस्थेच्या कवेत घेऊन व्यापक उभारणी केली आहे. काहीसे जाडेभरडे व म्हणूनच अस्सल असे नात्याचे वस्त्र या कादंबरीत विणले गेले आहे. 'तणकट' म्हणजे नव्या वळणाची, व्यापक व समृद्ध जाणिवेची दिशा दाखवणारी व म्हणून अत्यंत महत्त्वाची समकालीन कृती आहे.



**विलास सारंग/ २०००**
विलास सारंग यांच्या कथेचे रूढ मराठी कथेपेक्षा असलेले वेगळेपण ठाशीव आहे. हे वेगळेपण या कथांची आशयसूत्रे, तिच्यातील एकूण जीवनचित्रण, तिच्यातील स्थल-काल, तिच्यातील तंत्रे, तिची भाषा या सर्वच गोष्टींबाबत दिसून येते. राज्यव्यवस्थेच्या, शासनव्यवस्थेच्या संदर्भात व्यक्तीला वाटणारी दहशत, भीती, असुरक्षितता हे 'आतंक'मधील कथांचे प्रभावी आशयसूत्र आहे.



**श्रीनिवास कुलकर्णी/ २००१**
'कोरडी भिक्षा' या श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या लेखसंग्रहातील लेखांमागचे सूत्र म्हणजे, कोणत्या अतर्क्य सूत्राने या विश्वात माणसे—एकूणच चराचर विश्व—एकमेकांशी बांधले गेलेले असते हा प्रश्न. लेखनात भरून असलेला हृदयस्थ मार्दवाचा मंद, सौम्य प्रकाश हे त्यांच्या लेखनाचं वैशिष्ट्य.



ां. महानोर/२००१
ना. धों. महानोर यांच्या
कहाणी' या
ासंग्रहामध्ये व्यक्ती म्हणून
समष्टीचा भाग म्हणून स्त्री,
प्रधान संस्कृतीने पिचलेली
भारतीय परंपरेची वाहक
ारी स्त्री आणि सगळे
सहन करण्याची
सिद्धी' असलेली स्त्री
'तिची कहाणी' हे कवीचे
मिसळलेले भारतीय स्त्रीचे
जिक-सांस्कृतिक चित्र



**राम दोतोंडे/२००१**
दलित कवितेमध्ये खास स्थान मिळवलेले कवी राम दोतोंडे यांच्या 'गल्ली बदललेला मोर्चा'मधील कविता घायाळ करणारी आहे. या अनुभवाची पातळी गाठण्यासाठी जीवनाचे फार सखोल आकलन व्हावे लागते. तेवढी परिपक्वता त्या माणसाकडे यावी लागते. तेव्हा कधीतरी ही अनुभूती करुणेची पातळी गाठते. ही कविता एका अंतर्गत वादळाची कविता होते.



**दीनानाथ मनोहर/२००१**
दीनानाथ मनोहर यांच्या 'मन्वंतर' या कादंबरीमध्ये आत्मशोधाबरोबर वंचित इतिहासाला सामोरे जाण्याची दृष्टी पाहायला मिळते. ही भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचे कालैक्य साधणारी कादंबरी आहे. वसाहतकालीन आणि वसाहतोत्तर काळातील संदर्भ, घटना, भाषिक अभिव्यक्ती यांमुळे ही कादंबरी एक जिवंत अनुभव देते.



**जयप्रकाश सावंत/२००१**
हिंदी कथाकार उदयप्रकाश यांच्या काही निवडक कथांचे अनुवाद जयप्रकाश वासुदेव सावंत यांच्या 'तिरिछ आणि इतर कथा'मध्ये समाविष्ट केलेले आहेत. उदयप्रकाशचे लेखन समकालीन मानसिकतेच्या खर्जाला स्पर्श करते. भावस्थितीला अनुसरून येणारी काव्यात्मता, उपहासगर्भता, उत्कीमध्ये, कृतीमध्ये साधलेला विरोधन्यास ही मूळ कथेमधली वैशिष्ट्ये अनुवादातही कायम राखण्यात सावंत यशस्वी झाले आहेत.



**रवींद्र शोभणे/२००२**
'उत्तरायण' ही रवींद्र शोभणे यांची कादंबरी महाभारताची कथा वास्तवाच्या पातळीवर आणते. आधुनिकतेच्या परिणामांचा सजग दृष्टीने विचार करणाऱ्या लेखकाला बुद्धिनिष्ठा आणि विज्ञानातील प्रगती यांचा विचार करावाच लागतो. 'उत्तरायण'मध्ये रवींद्र शोभणे तो विचार करतात. मिथकांच्या अनुषंगाने मानवी जीवनाच्या चिरंतन प्रेरणांचा शोध ते घेतात.



**निरंजन उजगरे/२००२**
हिरोशिमाच्या अणुस्फोटात प्रत्यक्ष होरपळलेल्या जपानी कवी तोगे संकिची यांच्या कवितासंग्रहाचा मराठी अनुवाद 'हिरोशिमाच्या कविता' या नावाने कवी निरंजन उजगरे यांनी प्रभावीपणे केला आहे. 'हिरोशिमाच्या कविता' हा केवळ सांस्कृतिक पर्यावरणातला भाषिक हस्तक्षेपच नाही, तर राजकीय हस्तक्षेपही आहे. एका कवीचा हा 'भाषिक' शस्त्रानिशीचा 'राजकीय हस्तक्षेप' गैर तर नाहीच, पण खूप आवश्यक आहे.



**शफाअत खान/२००२**
बाबरी मशिदीचे उद्ध्वस्तीकरण त्यानंतर देशभर पेटलेला जातीय दंग्याचा वणवा, त्यामुळे पोहोचलेल्या प्रत्यक्ष झळा यांमुळे नाटककार शफाअत खान यांना नवे आत्मभान आणि जीवनभान आले, त्याचेच 'राहिले दूर घर माझे.' हे नाट्यरूप आहे. जात-धर्म-देश यांच्यापलीकडे जाऊन एकमेकांच्या आश्वासक सोबतीने धर्मांध शक्तींच्या प्रलयंकारापुढे निर्भयपणे उभे राहणाऱ्या माणसांची ही नाट्यकथा आहे.

# ग्रंथ वैचारिक



**आ.ह. साळुंखे/१९९४**
डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या 'आस्तिकशिरोमणी चार्वाक' या ग्रंथाने परंपरावाद्यांनी पराभूत पूर्वपक्ष मानलेल्या चार्वाकदर्शनाला विजयी सिद्धान्तपक्षाचे स्थान देण्याचे कार्य केले आहे. चार्वाकाला नास्तिक ठरविताना चार्वाकांनी उच्च जीवनमूल्येही नाकारली असे आरोप केले गेले आहेत. या आरोपांचे खंडन तर साळुंखे करतातच, पण चार्वाकांनीच उच्च मानवी मूल्यांची खरी कदर केली असल्याने हेच आस्तिक आणि वैदिक हे नास्तिक ठरतील अशी खणखणीत भूमिका साळुंखे यांनी मांडली आहे.



**गो.म. कुलकर्णी/१९९५**
प्रा. गो. म. कुलकर्णी या मराठीतील एका व्यासंगी समीक्षकाने मराठी संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर आधुनिक मराठी साहित्याचा परामर्श 'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी' या पुस्तकात घेतला आहे. 'मराठेशाहीचे उत्तर पर्व', 'इंग्रजी राजवटीचे आद्य पर्व', 'चिपळूणकर पर्व', 'फुले पर्व' आणि 'इंग्रजी राजवटीचे अंतिम पर्व' अशा पाच प्रकरणांतून लेखकाने संकल्पित विषयाचा समर्थपणे शोध घेतला आहे.



**रावसाहेब कसबे/१९९५**
डॉ. रावसाहेब कसबे या महाराष्ट्रातील एका अग्रगण्य विचारवंताच्या लेखनामध्ये चिंतनशील वृत्ती आणि सत्यान्वेषी संशोधकही जाणवतो. महापुरुष, त्यांचे जीवन आणि कार्य हा त्यांच्या चिंतनाचा आणि अभ्यासाचा विषय आहे. प्रस्तुत पुस्तकात सावरकर समजावून घेण्यासाठी 'हिंदूराष्ट्रवाद', त्यासाठी हिंदू-मुस्लीम प्रश्न, त्यासाठी त्या काळातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक स्थितिगतीही समजावून घेऊन रावसाहेबांनी हे सर्व सर्वसामान्यांना समजावून देण्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे.



**म.वा. धोंड/१९९६**
'जाळ्यातला चंद्र' हा श्री. म. वा. धोंड ह्यांच्या शोधक प्रज्ञेचा, अभ्यासूवृत्तीचा आणि चिंतनशीलतेचा प्रत्यय देणाऱ्या समीक्षालेखांचा संग्रह आहे. अभ्यासाने कमावलेल्या साक्षेपासह कधी उपरोधातून, कधी सरळ हल्ला चढवून, कधी तिरसकपणे तर कधी फटकळपणाने दोष दाखवण्याचे आणि आक्षेप मांडण्याचे धैर्य प्रा. धोंड यांच्या समीक्षेत आहे.



**जनार्दन वाघमारे/१९९६**
डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या 'समाजपरिवर्तनाच्या दिशा' या वैचारिक लेखसंग्रहात वाघमारे इतिहासाच्या चौरस्त्यावर उभे राहून साद घालण्याचे काम करतात. विविध कारणांमुळे विघटन पावणाऱ्या दलित चळवळीविषयीचे विवेचन, व्यक्तिनिहाय कार्याची चर्चा; लोकशाही, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद या समाजपरिवर्तनास आवश्यक अशा संकल्पनांचे त्यांच्या ऐतिहासिकतेसह सुबोध विवेचन ह्या ग्रंथात वाचावयास मिळते.



**गोपाळ राणे/१९९७**
आपण स्वावलंबणाचा आणि आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला नाही तर पुन्हा एकदा वसाहतवादी शोषणाचे बळी होऊ, या प्रश्नाचे सांगोपांग आणि शास्त्रीय विवेचन करून अशा प्रकारची सैद्धान्तिक मांडणी करणारा ग्रंथ म्हणून प्रा. गोपाळ राणे यांचा 'नव-वसाहतवाद आणि आधुनिक भारत' हा ग्रंथ महत्त्वाचा ठरतो.



**सदानंद मोरे/१९९७**
सदानंद मोरे यांच्या 'तुकारामदर्शन' या ग्रंथामध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचा आणि परंपरेचा वेध घेणारी इतिहास-मीमांसा, समाजाची मनोवृत्ती तपासणारे समाजशास्त्र, समाजाचे राजकारण आणि सत्ताकारण तपासणारे राज्यशास्त्र, मूल्यधारणांचा विचार करणारे तत्त्वज्ञान, काव्याच्या सामर्थ्य-मर्यादा जोखणारे समीक्षाशास्त्र आणि भाषेचा मूलभूत विचार करणारे आधुनिक भाषाविज्ञान अशा विविध ज्ञानशाखांतील मूल्यमापनाच्या मापदंडांचा यथोचित वापर आहे.



र कदम/ १९९७
ण मेघाजी लोखंडे म्हणजे र कदम यांनी लिहिलेली च्या कामगार चळवळीच्या ाची विस्मृतीच्या अंधारात न गेलेली पहिली चरित्रगाथा. ीय कामगार चळवळीचा , पत्रकार, संपादक, शोधक चळवळीचा द्रष्टा पुरोगामी विचारांचा प्रवक्ता, य दंगल थांबवण्यासाठी धोक्यात घालणारा सेक्युलर त्त अशा चरित्रनायक ण मेघाजी लोखंडे यांच्या ध पैलूंचा साधार शोध या घेतलेला आहे.



नलिनी पंडित/ १९९८
डॉ. आंबेडकरांनी लिहिलेले असंख्य ग्रंथ आणि त्यांनी केलेली भाषणे यांचा बारकाईने अभ्यास करून नलिनी पंडितांनी 'आंबेडकर' हा ग्रंथ सिद्ध केला आहे. त्यांनी तटस्थ आणि नि:पक्षपाती दृष्टीने आंबेडकरांच्या बहुविध कार्याचे मूल्यमापन केले आहे. लेखिकेचे विवेचन वस्तुनिष्ठ आणि समतोल झाले आहे.



म.द. हातकणंगलेकर/ १९९८
'साहित्यविवेक' हा म. द. हातकणंगलेकर यांचा समीक्षालेखांचा संग्रह आहे. यात स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी समीक्षेचा परामर्श, त्याच काळातील मौलिक मराठी साहित्यकृतींचा वेध आणि वेचक कथाकार व व्यक्तिचित्रकार यांच्या लेखनाची आस्वादक चिकित्सा आहे. हा ग्रंथ हातकणंगलेकरांच्या साहित्य-विचाराची आणि समीक्षादृष्टीची दिशा सूचित करतो.



श्रीधर रंगनाथ कुलकर्णी/ १९९९
प्रादेशिक भाषांनाही व्यापून उरणारी किंबहुना नामदेवांच्या अभंगरचनेने सर्व भारताला मान्यताप्राप्त व प्रेरणास्रोत ठरलेली भाषा ही आपण आज समजतो व म्हणतो ती हिंदी नसून 'दखनी' आहे हे डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांच्या या ग्रंथातील एक महत्त्वाचे प्रतिपाद्य आहे. दखनी भाषेतील ध्वनिव्यवस्था, व्याकरण, शब्दसंपदा, वाक्प्रचार, म्हणी, वाक्यरचना या अंगांनी मराठीशी नाते टिकवले आणि भारताचे भावनात्मक ऐक्यच नव्हे तर जीवन घडवले, तिचा धांडोळा घेणे हेच या ग्रंथाचे प्रयोजन आहे.



विलास खोले/ १९९९
डॉ. विलास खोले यांचे हे संपादनकार्य साहित्याभास व साहित्यसंशोधन यांची मूल्ये जपणारे व पुढे नेणारे कार्य आहे. स्त्रीपुरुष समानतेच्या मन्वंतराची रोखठोक मागणी करणारी तुतारी ताराबाई शिंदे या प्रज्ञावंत स्त्रीने शंभरसव्वाशे वर्षांपूर्वीच प्राणपणाने फुंकली होती. खोले यांनी ताराबाईंच्या विचारांची फोड करताना संशोधन-संपादनापलीकडे जाऊन मार्मिक विश्लेषणाची पातळी गाठली आहे.



ना.य. डोळे/ १९९९
महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजवादी विचारवंत डॉ. ना. य. डोळे यांनी 'काश्मिर प्रश्न' या ग्रंथात काश्मीरच्या ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय पैलूंचा चिकित्सक आढावा घेतला आहे. हा ग्रंथ भारतीय प्रजासत्ताकासमोरील आव्हानांची मूलग्राही चिकित्सा करतो. विविधतेला समजावून घेणारी एकता हीच चिरंतन ठरू शकेल, अशी डॉ. डोळे यांची श्रद्धा आहे.



नरेंद्र चपळगावकर/ २०००
न्या. नरेंद्र चपळगावकर यांनी लिहिलेल्या 'कर्मयोगी संन्यासी'मध्ये हैदराबाद मुक्तिलढ्याचे नेतृत्व करणाऱ्या स्वामी रामानंद तीर्थ ऊर्फ 'स्वामीजी' यांच्या जीवनाचे आणि या लढ्याच्या काळाचे चित्र रेखाटले आहे.
न्या. चपळगावकरांचे आशयानुरूप विविध रूपे धारण करणारे लवचिक कथन हे या ग्रंथाचे विलोभनीय वैशिष्ट्य आहे.



स.रा. गाडगीळ/ २०००
डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या 'शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य' या ग्रंथाचा आवाका अतिशय व्यापक आहे. मानवी जीवनातील शोकात्मतेचे स्वरूप, तिची कारणे आणि तिची साहित्यात प्रकटलेली कल्परूपे, असा हा व्यापक आलोक समीक्षाक्षेत्राला सर्व पूर्वग्रहांतून व वादांतून मोकळे करतो.



मुरलीधर पवार/ २००१
श्री. मुरलीधर पवार यांनी 'मार्क्सचा मानव विचार' या लेखसंग्रहात मार्क्सचे मानवविषयक विचार त्यातील आशयाशी कोणत्याही प्रकारची तडजोड न करता सुगम व सुलभ मराठी गद्यात मांडले आहेत. हे पुस्तक मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे दालन मराठी वाचकांसाठी खुले करते.



अशोक चौसाळकर/ २०००
प्रा. अशोक चौसाळकरांच्या 'नवरात्र' या पुस्तकात प्राचीन भारतातील राजकीय विचारांचा शोध; शिवाजी, गणपती व बळीराजा या मिथकांचा अन्वयार्थ; चिपळूणकर, आगरकर, जावडेकर व नेहरू यांचा राजकीय व सामाजिक विचार असा विस्तृत पट व्यापणाऱ्या लेखांचा अंतर्भाव आहे. या पुस्तकात वाचकाला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य आहे.



म. अ. मेहेंदळे/ २००२
मधुकर अनंत मेहेंदळे लिखित 'प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती' या लेखसंग्रहातले लेखन विलक्षण विशुद्ध आणि निरामय राहिले आहे. संस्कृत, पाली प्राकृत यांवर प्रभुत्व, ऐतिहासिक भाषा शास्त्राची भक्कम बैठक, शब्दार्थ-निर्णय करताना व्याकरण, निर्वचनशास्त्र, संदर्भ व प्रत्यक्ष वापर या निकषांचा आग्रह, गुजराती-हिंदीचे आकलन आणि पूर्वग्रहरहित शास्त्रीय दृष्टिकोण यांमुळे या लेखनाला विशेष रूप प्राप्त झाले आहे.



जया दडकर/ २००२
वि. स. खांडकर यांचा सचित्र चरित्रपट साकार करण्याच्या कामात लेखक जयवंत केशव दडकर यांनी वाङ्मयाभ्यासकाची, चरित्रलेखकाची तटस्थ, वस्तुनिष्ठ दृष्टी दाखवलेली आहे. म्हणून हा 'सचित्र चरित्रपट' एखाद्या चांगल्या, संवेदनक्षम दिग्दर्शकाने एखाद्या कलावंतावर चरित्रपट करावा, तसा वाटतो. हा चरित्रपट खांडकरांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व साकार करतो.

# ग्रंथ अ-पारंपरिक



**जमादार/ १९९४**

द' ही हुसेन जमादार यांची यकृती म्हणजे दारिद्र्य ली जीवन जगणाऱ्या म समाजाची एका ादी कार्यकर्त्याने मांडलेली त आहे. 'जिहाद' हे ाचे आत्मकथन. एका ाळाच्या मुस्लीम ातील हे ताणाबाणांचे य मराठी साहित्याला र अज्ञात असलेला प्रदेश करते.



**भीमराव गस्ती/ १९९५**

'आक्रोश' या भीमराव गस्ती यांच्या पुस्तकामध्ये १९८२ नंतरच्या काळातील बेरड समाजाच्या चळवळीच्या लढ्यातील काही निवडक घटनांचा मागोवा घेत गेल्या दहा वर्षांत यशापयशाच्या चढउतारांनी, भोवतालच्या बदलणाऱ्या राजकीय वास्तवानुरूप वेगवेगळी वळणे घेत चळवळीने कसा प्रवास केला, याचे चित्रण केले गेले आहे. भीमराव गस्तींनी एक कार्यकर्ता म्हणून चळवळीची ही कहाणी प्रत्ययकारी पद्धतीने सांगितली आहे.



**बाबा भांड/ १९९६**

'दशक्रिया' ही श्री. बाबा भांड यांची कादंबरी म्हणजे भानुदास या शाळकरी मुलाची कहाणी. रोगट रूढींनी काळवंडलेला धर्म, जुनाट जातिव्यवस्था, पोटासाठी एकाच पातळीवर झगडणारी उच्चनीच वर्णाची माणसे, जन्म-मृत्यू यासंबंधीचे प्राचीन चिंतन आणि तो डोलारा सांभाळणारी सर्वस्वी स्वार्थी, दांभिक बनलेली आधुनिक समाजव्यवस्था यांचे भेदक दर्शन या कादंबरीत घडते.



**अतुल देऊळगावकर/ १९९७**

किल्लारी-लातूर येथे झालेल्या जोरदार भूकंपानंतरच्या पुनर्बांधणीच्या संदर्भात लॉरी बेकर या मूळ इंग्रज पण गांधीजींच्या सूचनेनुसार भारतात आलेल्या वास्तुतज्ज्ञाचे नाव मराठी वाचकाला प्रथम समजले. या असामान्य प्रतिभा लाभलेल्या ऋषितुल्य वास्तुतज्ज्ञाच्या जीवनाचा आणि वास्तुकलेचा परिचय अतुल देऊळगावकर यांनी 'लॉरी बेकर' या पुस्तकात करून दिला आहे.



**लक्ष्मण माने/ १९९८**

सर्वस्वी दुर्लक्षित असलेल्या, गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्या महाराष्ट्रातील विमुक्त जमातींचा चिकित्सक अभ्यास करून लक्ष्मण माने यांनी 'विमुक्तायन' हा संशोधन-प्रबंध अपार कष्टाने साकार केला आहे. या दस्तऐवजातून त्यांनी विमुक्तांच्या पर्यायी विकासनीतीची मांडणी केली आहे. हा इतिहास अनेक संदर्भात मूल्यवान ठरावा असाच आहे.

# पडद्यामागचे कर्तबगार



[illegible] नितीन दादरावाला (चित्रकार), माधवी विचारे (मुद्रितशोधक), नयना सातम (हिशोबनीस), बी. डी. परब (निवृत्त मुद्रण पर्यवेक्षक),
[illegible] (चित्रकार), अंजली मुळे (पत्रकार), अरुणा दुभाषी (संपादन सहायक), अविनाश परब (मुद्रण पर्यवेक्षक),
[illegible] मंगेश जाधव (सहायक मुद्रण विभाग), विजय सामंत (व्यवस्थापक), विजय तारी (छायाचित्रकार),
[illegible] (छायाचित्रकार), शैलेश हळदणकर (कार्यालय सहायक), नीलकंठ कदम (कवी), सुदर्शन सुर्वे (संगणक विभाग),
[illegible] भास्कर बोरकर (संगणक विभाग), महेश गुजर (दृश्यचित्रण), नितीन शिंदे (कवी-संपादन सहायक)
[illegible] सूर्यकांत वराडकर (कार्यालयीन सहायक), कमलेश देसाई (संगणक विभाग), पाशा पिपळापुरे (व्यवस्थापक),
[illegible] सुधाकर बोरकर (संपादन सहायक), श्याम पिंगे (मुद्रण प्रक्रिया), आनंद अवधानी (पत्रकार), राजन बावडेकर (व्यवस्थापक),
[illegible] (बांधणी विभाग प्रमुख), सुहास मोरे (संगणक विभाग), जयप्रकाश सावंत (व्यवस्थापक), केतन शिंदे (संगणक विभाग)

# पडद्यामागचे कर्तबगार



**डावीकडून बसलेले :** भरत चव्हाण (चित्रकार), नितीन दादरावाला (चित्रकार), माधवी विचारे (मुद्रितशोधक), नयना साटम (हिशोबनीस), बी. डी. परब (निवृत्त मुद्रण पर्यवेक्षक), बाळ ठाकूर (चित्रकार), अशोक नायगावकर (सूत्रसंचालक-कवी), षांताराम पवार (चित्रकार), अंजली मुळे (पत्रकार), अरुणा दुभाषी (संपादन सहायक), अविनाश परब (मुद्रण पर्यवेक्षक), विजय तारी (छायाचित्रकार),

**मधली रांग (उभे डावीकडून) :** झबींद्रराजा खडका (सुरक्षा), गंगाधर जाधव (सहायक मुद्रण विभाग), विनय सामंत (व्यवस्थापक), शरद पालकर (कार्यालय सहायक), विठोबा पांचाळ (छायाचित्रकार), शैलेश हळदणकर (कार्यालय सहायक), नीलकंठ कदम (कवी), सुदर्शन सुर्वे (संगणक विभाग), सुधीर शेणॉय (सहायक), प्रदीप मुळ्ये (नेपथ्य-चित्रकार), भास्कर बोरकर (संगणक विभाग), महेश गुजर (दृश्यचित्रण), नितीन रिंढे (कवी-संपादन सहायक)

**मागील रांग (उभे डावीकडून) :** सुधाकर गंगापूरकर (हिशेब तपासनीस), सूर्यकांत वराडकर (कार्यालयीन सहायक), कमलेश देसाई (संगणक विभाग), पाशा पिपळापुरे (व्यवस्थापक), दत्ता बाळसराफ (निवेदक), सुधाकर बोरकर (संपादन सहायक), श्याम पिंगे (मुद्रण प्रक्रिया), आनंद अवधानी (पत्रकार), राजन बावडेकर (व्यवस्थापक), दत्ताराम गवाणकर (बांधणी विभाग प्रमुख), सुहास मोरे (संगणक विभाग), जयप्रकाश सावंत (व्यवस्थापक), केतन शिंदे (संगणक विभाग)

# निवड समिती (अमेरिका)



सुनील देशमुख
१९९४-२००३



दिलीप चित्रे
१९९४-२००३



संध्या कर्णिक
१९९४-२००३



विद्युल्लेखा अकलूजकर
१९९४-२००३



राजन गडकरी
१९९४-२००३



ललीता गंडभीर
१९९५-२००१



अशोक सबनीस
१९९४-२०००



पद्मजा फाटक
१९९८-२००१

# पुरस्कार सल्लागार समिती (भारत)



कांत केळकर
९४-१९९७



दिगंबर पाध्ये
१९९४-२००३



अरुण टिकेकर
१९९४-१९९५



चंद्रकांत बांदिवडेकर
१९९४-१९९६



दया पवार
१९९४-१९९५



सतीश काळसेकर
१९९४-२००३



धीर पानसे
९४-२००३



नारायण सुर्वे
१९९६-२००३



वसंत आबाजी डहाके
१९९६-२००३



नागनाथ कोत्तापल्ले
१९९७-२००३



विजया राजाध्यक्ष
१९९८-२००३



मृणाल गोरे
१९९८-२००३



उदय मेहता
-१९९८



डॉ. जे. व्ही. नाईक
१९९६-१९९८



डॉ. शि. स. अंतरकर
१९९४-१९९५



डॉ. ललित देशपांडे
१९९५-२००३



वामन केंद्रे
२००१-२००३



शफाअत खान
२००३

